म. ग्रं. सं. ठाणे.
विषय काव्य
सं. क्र. २५८७

# मराठी गौळण

डॉ. वसंत जोशी

REFBK-0025862
REFBK-0025862

संदर्भ काव्य
२५९१

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :–खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

JUN 1987

( क्र. मा. पहा )
५०००–११–८६

# मराठी गौळण

डॉ. वसंत स. जोशी

REFBK-0025862

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे ३०

प्रकाशक
अनिलकुमार मेहता
मेहता पब्लिशिंग हाऊस
१२१६, सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०

© सौ. साधना वसंत जोशी
१७३० ई, सहावी गल्ली
राजारामपुरी, कोल्हापूर ४१६ ००८

पहिली आवृत्ति
ऑक्टोबर १९८८

मुद्रक
सौ. कमल रामचंद्र घळसासी
संजीव मुद्रणालय
४६९ सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०

मूल्य
रुपये तीस

प्रिय राम
( श्री. रामकाका कुलकर्णी ) आणि
सौ. शालिनी
( सौ. शालिनी राम कुलकर्णी )
यांच्या स्नेहभावास—

# प्रास्ताविक

' गौळण ' हा प्राचीन मराठी साहित्यातील एक रंजक लघुवाङ्मयप्रकार आहे. बऱ्याच दिवसांपासून माझा त्याविषयीचा अभ्यास सुरू होता. त्या निमित्ताने विविध प्रकारच्या गौळणींचे वाचन झाले. त्यातून जाणवलेल्या वैशिष्ट्यांचा परिचय प्रस्तुत पुस्तकरूपाने केला आहे. पूर्वार्धात् या लघु-वाङ्मयप्रकारांच्या स्वरूपाची चर्चा असून उत्तरार्धात काही निवडक गौळणी दिल्या आहेत.

अभ्यास व लेखन चालू असताना माझ्या अनेक मित्रांचे प्रोत्साहन व त्यांच्याशी झालेली चर्चा उपयुक्त ठरली. प्रा. गो. य. कुलकर्णी, डॉ. सरोजिनी बाबर, डॉ. अरविंद वामन कुलकर्णी, प्रा. यशवंत कळमकर, प्रा. विजयकुमार फरांदे आणि प्रा. प्र. म. बांदिवडेकर यांचा आवर्जून उल्लेख करावयास हवा. त्यांचा मी फार आभारी आहे.

' मेहता पब्लिशिंग हाऊस 'चे संचालक व माझे स्नेही श्री. अनिल-कुमार मेहता यांनी अगत्याने या पुस्तकाचे प्रकाशन स्वीकारले. त्यांचे सुपुत्र श्री. सुनील मेहता यांनी ते आकर्षक स्वरूपात प्रसिद्ध केले. ' संजीव मुद्रणालया 'चे श्री. बंडोपंत (मधुसूदन) घळसासी यांनी सुबक मुद्रण करून त्याची शोभा वाढविली. या सर्वांचा मी ऋणी आहे.

' मराठीतील गौळणी विपुल प्रमाणात उपलब्ध आहेत. या निमित्ताने वाचक त्या सर्व गौळणी वाचण्यास प्रवृत्त झाले, तर मला आनंद वाटेल.

गणेश चतुर्थी
भाद्रपद शुद्ध ४, शके १९१०
३८६ मधली आळी
वाई, (जि. सातारा) ४१२ ८०३

—वसंत स. जोशी

# अनुक्रम

**पूर्वार्ध** पृष्ठे १ ते ५२

राधाकृष्ण भक्तीचा मागोवा– राधा : व्युत्पत्ती व तिची भिन्न रूपे– राधेचे आध्यात्मिक स्वरूप– ज्योतिषशास्त्रदृष्ट्या– राधेचे धार्मिक स्वरूप– राधेचे वैज्ञानिक स्वरूप– ज्ञानदेवांची गौळण– नामदेवांच्या गौळणी– एकनाथांच्या गौळणी– तुकारामांच्या गौळणी– निळोबांच्या गौळणी– पंडिती काव्यातील गौळण– संत कवयित्रींची गौळण– शाहीर कवींची गौळण– लोकगीतांतील गौळण.

**उत्तरार्ध : (निवडक गौळणी)** पृष्ठे ५३ ते १०६

| | |
|---|---|
| १) ज्ञानदेव | ५३ |
| २) नामदेव | ६० |
| ३) भानुदास | ६५ |
| ४) एकनाथ | ६५ |
| ५) तुकाराम | ७० |
| ६) निळोबा | ७८ |
| ७) रामजोशी | ८१ |
| ८) होनाजी बाळा | ८५ |
| ९) प्रभाकर | ८८ |
| १०) परशराम | ८९ |
| ११) पठ्ठे बापूराव | ९० |
| १२) मध्वमुनीश्वर | ९४ |
| १३) अमृतराय | ९४ |
| १४) रमणात्मज | ९५ |
| १५) कृष्णकिंकर | ९५ |
| १६) माणिकप्रभु | ९५ |
| १७) लोकगीतातील गौळणी | ९६ |
| १८) कठीण शब्दांचा कोश | १०४ |
| १९) संदर्भ ग्रंथ | १०७ |

## शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| प्रास्ताविक | ८ | गो. य. कुलकर्णी | गो. म. कुलकर्णी |
| प्रास्ताविक | ११ | या ओळीत पुढील वाक्य हवे. या पुस्तकाची मुद्रणप्रत सौ. मृणाल अनिल जोशी, एम्. ए. यांनी तयार केली. | |
| १४ | २६ | अदैताकडे | अद्वैताकडे |
| २१ | २० | मंजिण्या | मंजिऱ्या |

# पूर्वार्ध

काव्य
२५९१
२५८९२
११/३/८९

प्राचीन मराठी वाङ्मय हे अनेकविध वाङ्मयप्रकारांनी समृद्ध आहे. त्यातील भाष्य, आख्यानकाव्य, महाकाव्य यांसारखे वाङ्मयप्रकार संस्कृताधिष्ठित असले तरी मराठी भूमीतून उदयास आलेले स्तोत्रे, अभंग, भारुडे, पदे, पाळणे, धुवे, धावे, आरत्या, गौळणी, जोहार, अर्जदास्त, भूपाळ्या, लावण्या यांसारखे स्फुट वाङ्मयप्रकार आणि बखर, स्मृतिचरित्रात्मक ग्रंथांसारखे दीर्घ वाङ्मयप्रकार आपापले विशेष घेऊन साकार झालेले आहेत.

स्फुटकाव्य गायनाच्या अंगाने मुख्यतः लिहिले गेलेले असल्याने गेयता, तालबद्धता, वाद्यापेक्षता, गायनकाल आणि प्रसंग यांशी निबद्ध आहेत. भावार्तता हा त्यांचा विशेष आहे. व्यक्तिमनाचे नितळ दर्शन त्यात घडू शकते. आधुनिक भावगीतांशी त्यांचे निकटचे नाते आहे. ही कविता अल्पाक्षररमणीय, भावमधुर आणि अर्थबहुल आहे. व्यक्तिसापेक्षता हा तिचा विशेष असला तरी ती समूहमनाचेही प्रतिनिधित्व करते. त्यामुळे ती समूहाकडून एकत्रितरीत्याही गायिली जाते. आध्यात्मिकता आणि भक्तिप्रवणता हे या कालखंडातील काव्याचे प्रातिनिधिक स्वरूप असल्याने या स्फुटकाव्यातही ते प्रतिबिंबित झालेले आहे. परमेश्वरगुणगानात रमणारी भक्ताची भावुक अवस्था काव्यरूप घेऊन अवतरते. आणि ही मराठी समाजमनाच्या तत्सदृश भावनेचा आविष्कार करणारी असल्याने ती केवळ व्यक्तिगत पातळीवर न राहाता सामूहिक पातळीवर आविष्कृत होते. या गीतातील प्रमुख भाव टाळ, वीणा, मृदंग, एकतारी यांसारख्या वाद्यांच्या साक्षीने प्रकट होत राहातो. यातील भारूड, गौळण आणि लावणी हे प्रकार नाट्यानुकूल आणि श्रोतृसापेक्ष आहेत. त्यामुळे त्यांचे आकर्षण समूहमनाला मोठे असते. नाट्यानुकूल रचनेमुळे ही कविता काही वेळा वस्तुनिष्ठ पातळीवरही येते. नाट्याभिनयाला संगीत आणि नृत्याची जोड मिळाल्यामुळे त्याला एक वेगळे कलात्मक रूपही प्राप्त होते. भारुडांचा प्रसार या साथीनिशी समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत करण्याचे कार्य गोंधळी, भराडी, भुत्ये, वासुदेव यांसारख्या लोकसंस्कृतीच्या उपासकांकडून झाले, तर लावणीला तमाशासारख्या कलापीठाचे माध्यम लाभले. गौळण हा प्रकार मात्र भजन-कीर्तनांशी निगडित राहिला. भजन-कीर्तनातील तात्त्विक विचार, भाव आणि नाट्यरूप मूळ

गौळणीत साकार होताना श्रोत्यांच्या मनीमानसी मुरतो. वेदान्ताने जडावलेले त्यांचे मन मोकळे होते. राधा किंवा गोपींच्या रूपात परमेश्वराराधन करू लागते. सोंगी भजनाने या गौळणींना नाट्यरूप लाभते. ताल आणि सूर यांनी नटलेला भक्तिभाव सहृदयाला भारून टाकतो.

अभंग हा तसा मराठी लोकमानसात रुजलेला लोकप्रिय वाङ्मयप्रकार आहे. तोही स्फुट आणि भावमधुर असतो. अनेक संतकवी–कवयित्रींनी आपल्या जीवीचे आर्त अभंग माध्यमातून व्यक्त केले आहे. त्यात उत्कट भाव असतो तशी काहीशी वैचारिकताही असते. त्यातील सामान्य व्यक्तिभावना ही उदात्ताशी एकरूप झालेली असते. मनाचे आणि परिसराचे मांगल्य ती उजळून टाकते. भक्तिभावाच्या उत्कट अवस्थेने एखादा ' अणुरणिया थोकडा ' असणारा तुका ' आभाळाएवढा ' होतो.

हा साक्षात्कार अभंगातून अभिव्यक्तही होतो. अभंगरचना करणारा कवी गौळणही रचतो. परंतु गौळणीतील मुग्ध शृंगार, वात्सल्यासारख्या मधुराभक्तीच्या छटा संतांच्या जीवीच्या जिवलगाशी जवळीक साधतात. लौकिक प्रेमभावनेचा मधुर आविष्कार गौळणीच्या रूपाने त्यांना घडविता येतो. अभंगात भरून राहिलेला निराकार, निर्गुण, अव्यक्त परमेश्वर सामान्यांच्या आकलनाबलीकडे राहातो, परंतु गौळणीत साकार होणाऱ्या त्याच्या सगुण, साकार, प्रेमळ रूपाशी त्याच्या भावजीवनाची तार जुळते. त्यात अरूपाला रूप मिळालेले असते. जीवीचे गुज सांगायला त्यांना आधार मिळतो. तो त्यांच्या घरादारात बालरूपात वावरतो. तो त्यांचा सखा, सोबती, प्रियकर, माऊली, रांगता बाळ सर्व काही असतो. आणि त्या त्या स्वरूपात त्याशी तदाकार होत विविध भावछटा गौळणीत व्यक्त होत राहातात. या सर्व विशेषांमुळे ' गौळण ' हा आकृतिबंध मराठी काव्यात लोकप्रिय होऊन राहिला आहे.

मराठीमध्ये गोपी–कृष्ण किंवा राधा–कृष्णविषयक रचना ' गौळणी ' या नावाने रूढ झाली आहे. या शब्दाची व्युत्पत्ती गोपालिनी (सं) > गवळण (म.) गौळण अशी आहे. ( महाराष्ट्र शब्दकोश : विभाग ३ : पृष्ठ ९६१. ) गाथासप्तशती व जयदेवादि कवींची ' गीतगोविंदा ' सारखी काव्ये ही मराठी गौळणीची प्रेरणास्थाने असे म्हणावयास हरकत नाही. परंतु उत्तरेकडील मधुराभक्तीतील अतिरिक्त शृंगार अध्यात्मप्रधान महाराष्ट्राने स्वीकारल्याचे दिसत नाही. परमेश्वराराधनेचे एक ललितरम्य व आकर्षक माध्यम या दृष्टीने कवी व वाचक यांना हा प्रकार आवडला असावा. उत्तरेकडील काव्यातील कृष्ण ' स्वकीया ' नारींपेक्षा ' परकीया 'नारींच्या क्रीडात अधिक रमलेला दिसतो. परंतु महाराष्ट्रामध्ये ' स्वकीया ' रुक्मिणीचे स्थान अधिक श्रेष्ठ मानले गेले आहे. हा आध्यात्मिक दृष्टिकोनातील फरक हिंदी व मराठी काव्यातील एतद्विषयक रचनेचा गाभा बदलविण्यास कारणीभूत ठरला आहे. निखळ आध्यात्मिक भूमिकेपासून अलग होऊन लौकिक प्रेमकथेचे स्वरूप जेव्हा काही कवी गोपी किंवा राधा–कृष्ण संबंधांना देतात, तेव्हा याच मराठी कवितेतही अध्यात्मापेक्षा शृंगारभावनेचाच उत्कर्ष साधण्यात

आल्याचे दिसून येते. याची बीजे मानवाच्या मूलभूत प्रवृत्तीतच आहेत. प्रेमभावना ही मानवी जीवनाला अंतर्बाह्य व्यापून राहिलेली आहे. अध्यात्मविचाराच्या बंधनात अडकलेली कविता सामान्यजनांना फारशी आकृष्ट करू शकली नाही. अध्यात्म हा प्राचीन काळी सामाजिक प्रतिष्ठेचा विषय होता. प्रेम हा मानवी जीवनाचा स्थायीभाव असल्याने प्रतिष्ठित वा अप्रतिष्ठितांना शृंगाराचे वावडे होते असे नाही. समकालीन समाजाची अभिरुची लक्षात घेऊन कित्येक कवींना स्त्री-पुरुषविषयक प्रेमभाव राधाकृष्ण-प्रेमाच्या अवगुंठनाखाली साकार करावा लागला. त्यांची काव्यशक्ती या विषयाचा आविष्कार करण्यातच अधिक रंगली. त्यामुळे ज्ञानेश्वर-नामदेवांच्या 'विरहिणी' 'गौळणी'तील संयम पुढील काळातील कवीत राहिलेला दिसत नाही. अध्यात्मप्रतिपादन करीत असतानाही त्यांच्या मूळ प्रवृत्तीचा आविष्कार मधून मधून 'गौळणीं'च्या रूपाने होतच राहिला.

राधेचे मूळ महाभारत-भागवतात सापडत नाही, परंतु प्राकृत भाषात, लोक-वाङ्मयात, कृष्णाच्या संदर्भात तिचे स्थान महत्त्वाचे मानले गेले आहे. राधा हे एक प्रकारे लोकमानसाचे प्रतीक आहे. कृष्णविषयक अतीव भक्ती राधेच्या रूपात प्रकटली आहे. मधुराभक्तीचाही तो एक आविष्कार आहे. राधेने भारतीय जीवन किती व्यापले आहे याची कल्पना विविध कलांचा विचार केला असता येऊ शकेल. कुचीपुरी, मणिपुरी इ. भारतीय नृत्यकलेत, प्राचीन व मध्ययुगीन चित्रकलेत, संगीतकलेत (अनेक रागदारीतील पदे, चीजा) शिल्पकलेत, साहित्यकलेत (गाथासप्तशती, सूरदास, मीरा इ. ची काव्ये) सर्वत्र राधा भरून राहिली आहे. किंबहुना असेही म्हणता येईल की, या सर्व कलातून राधा वगळली तर हाती शून्य येईल! राधेच्या अनुरक्तीच्या विविध छटा साहित्यकृतीतून व्यक्त झालेल्याच आहेत. लोकगीतेही त्याला अपवाद नाहीत. महाराष्ट्रात राधेचे गोडवे फारसे गायिले गेले नसले, तरी विठ्ठलाच्या समवेत ही राधा 'राही' च्या स्वरूपात उपलब्ध आहेच. (राही रखुमाई दिसे दिव्य शोभा – नामदेव.)

संगीत, चित्र, शिल्प, नृत्य इ. कलांची निर्मिती व उपासना भारताच्या अन्य प्रांतातूनच विशेषत्वाने झाली आहे. महाराष्ट्राचा वाटा यात जवळजवळ नाहीच. संगीताच्या बाबतीत मात्र महाराष्ट्राने ते दत्तक घेतले असे म्हणता येईल. पण त्याचेवर जनकपुत्रापेक्षाही अधिक प्रेम त्याने केले. गायकीतला ख्याल हा प्रकार महाराष्ट्राच्या प्रकृतीला मानवला, परंतु ठुमरी मात्र त्याच्या जीवनात रुजू शकली नाही. अन्य प्रांतीयांनी केले नसेल इतके प्रेम महाराष्ट्रीयांनी संगीतावर केले आहे. एक गोष्ट खरी की, दाक्षिणात्यांच्या कुटुंबात नृत्य-संगीतास जी प्रतिष्ठा आहे, ती आपल्याकडे नाही. महाराष्ट्रात अशी संगीताची प्राचीन घराणी नसली, तरी पंधरा-सोळाव्या शतकापासून त्याचा अभ्यास जाणकारांकडून होत असावा असे वाटते. दासोपंत—रामदासादिकांच्या काव्यातील उल्लेख याचे निदर्शक आहेत. कीर्तनपरंपरेत रागदारीयुक्त पदे म्हटली जात असावीत. पेशवाईच्या काळात कीर्तन हा करमणुकीचा प्रकार बनला, तेव्हा त्यात नाट्यात्मकता

आणि संगीत याला प्राधान्य मिळत गेले. गौळणी हा वाङ्मयप्रकार अशा आविष्काराला उपयुक्त ठरला.

'मराठी गौळणी'ची एकंदर वाटचाल विविधरंगी आणि विविधढंगी झाली आहे. राजकीय व सामाजिक परिवर्तनाच्या अनुषंगाने ऐहिक जीवनाविषयीची आस्था वाढीस लागली आणि तिचा परिणाम 'गौळणी'सारख्या वाङ्मयप्रकारावरही झाला असे म्हणता येईल. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथादि कवींच्या गौळणीत त्यांच्या व्यक्तित्वाचाही प्रभाव पडला आहे. ज्ञानेशांची योगानुभवातून प्रकटलेली काव्यसृष्टी, नामदेवांची भावुकता, एकनाथांचा हरिदासी विनोद इ. तून गौळणींना विशिष्ट रंगरूप प्राप्त होत गेले आहे. 'मराठी गौळणी'चे स्वरूप पारलौकिकाकडून लौकिकाकडे बदलत गेले आहे. गौळणीतील प्रतिकात्मक अर्थ बाजूस राहून त्यांचा वाच्यार्थ रूढ झाला. शाहिरांच्या गौळणी हा प्रेमकाव्याचाच आविष्कार होय.

श्रीकृष्णचरित्राचे आकर्षण सामान्यांना रामचरित्राहून अधिक आहे. 'रामायण' व 'महाभारत' या दोन ग्रंथांतून साकार झालेली श्रीराम व कृष्ण या अवतारी पुरुषांची जीवने भारतीय जनमानसावर दीर्घकाळापासून प्रभाव गाजवीत आहेत. 'रामायणा'त मर्यादापुरुषोत्तम रामाचे चित्रण आहे, तर 'महाभारता'त व्यवहारकुशल, मुत्सद्दी, जीवनातील अनेक नाती सांभाळणारा पूर्णपुरुष श्रीकृष्णरूपात उभा आहे. आत्यंतिक आदर्शवाद हा रामायणाचा विशेष आहे, तर 'महाभारता'त व्यवहारी जगाचे दर्शन आहे. प्रापंचिक जीवनातील मर्यादित कक्षेत वावरणाऱ्याला 'रामायणा'तील आदर्शाचे शिवधनुष्य पेलण्यासारखे नव्हते. 'महाभारता'तील श्रीकृष्ण मानवी जीवनातील विविध भावभावनांना आवाहन करणारा आणि प्रतिसाद देणारा आहे. त्याचे लौकिक स्वरूप प्रापंचिकांना सुख देणारे आहे. श्रीकृष्णाच्या बाळलीला त्यांचा वात्सल्यभाव जागृत करतात, तर त्याच्या रासक्रीडा तरुण मनाला उत्तेजित करतात. त्याच्या शौर्यकथा त्यांना उत्साहित करतात, तर 'रुक्मिणी-स्वयंवरा'तला त्याचा बेगुमानपणा त्याला चित्तथरारक वाटतो. कौरव-पांडवांच्या राजकारणातील त्याचा मुत्सद्दीपणा विचारवंतांना आकर्षित करतो, तर कुरुक्षेत्रावर कर्मयोगाचा उपदेश करणारे त्याचे दैवीस्वरूप भव्योदात्त वाटते. विशिष्ट आदर्शासाठी सर्वस्वाचा त्याग करणारी रामायणातील पात्रे त्याला एकसुरी वाटतात. त्यांचा त्याग त्याला गुदमरून सोडतो. रामायणातील रीस-वानरांची, जंगलांची आणि राक्षसांची सृष्टी त्याला अद्‌भुत वाटते, तर महाभारतातील पात्रे आणि प्रसंग वास्तवाच्या भूमीवर वावरत असताना त्याला दिसतात. त्यामुळे 'महाभारता'तील पात्रांची सुख-दुःखे, त्यांचे राग-लोभ, त्यांची ईर्षा, त्यांची कपटकारस्थाने यांच्याशी त्यांच्या जीवनातील घटनांचा धागा कुठे ना कुठे जुळत असल्याचा प्रत्यय त्यांना येत राहातो.

मराठीमध्ये एकनाथांनी रामचरित्रावर 'भावार्थरामायणा'सारखा बृहद् काव्यग्रंथ लिहिला. रामदासांनी रामोपासनेचा संप्रदाय महाराष्ट्रात रूढ केला. त्या संप्रदायातील

काही कवींनी रामचरित्रावर काव्यलेखन केले. श्रीधर-मोरोपंतादि कवींनीही अनेक प्रकारे रामचरित्रगायनाचा प्रयत्न केला. काव्यदृष्ट्या या सर्वांचे प्रयत्न कितीही मोलाचे असले, तरी श्रीकृष्णचरित्राचा जनमानसावरील प्रभाव त्यामुळे कमी झाला नाही. इतकेच नव्हे तर श्रीकृष्णचरित्रावरही याच कवींनी उत्तम प्रकारचे काव्यलेखन केलेले आहे. श्रीकृष्ण-चरित्रात त्यांना विविध रसांचा आविष्कार करता येत होता. त्यांच्या काव्यशक्तीला ते मोठे आव्हान होते. कवी आणि वाचक यांच्या मानवी भावनांना त्यात उत्कट प्रतिसाद मिळत होता. पारमार्थिकदृष्ट्या त्यांचे लेखन 'काही तरावया गाण्या'साठी झाले असले तरी 'जनमानसरंजना'ची भूमिकाही त्यातून त्यांना पार पाडता येण्यासारखी होती.

मध्ययुगीन काळातील पाचसहा शतके महाराष्ट्रातील समाजजीवन अध्यात्म विचाराने भारून गेले होते. स्वतंत्र तत्त्वज्ञान सांगणारे ग्रंथ, भाष्यग्रंथ, स्फुटकाव्ये, एवढेच नव्हे तर 'रुक्मिणी-स्वयंवरा'सारखी आख्यानकाव्येही अध्यात्मरंगात रंगून निघाली होती. तत्कालीन वाङ्मयाभिरुची सामाजिक प्रतिष्ठेच्या दृष्टीने ठीक असली तरी वैयक्तिक जीवनात अशा काव्यांच्या वाचकांचे मन दुसऱ्याच रसाविष्काराच्या शोधार्थ तळमळत होते. राम-सीता किंवा कृष्ण-रुक्मिणी या आदर्श दांपत्यांच्या शृंगारकथांची अपेक्षा हे औचित्यहीनतेचे लक्षण ठरले असते. म्हणूनच कृष्णचरित्रातील गोपी किंवा राधा यांचे प्रेमसंबंध प्रणयभावनेस योग्य असे या कवींना वाटले असावेत. संत, पंत किंवा शाहीर या सर्व पठडीतील कवींनी 'गोपीगीते' किंवा 'गौळणी' लिहिल्या यामागे हीच प्रेरणा असावी. अध्यात्माच्या ओझ्याने अवघडलेले सांसारिकाचे मन 'गौळणी'च्या शृंगारात रमते, ही मानवसुलभ वृत्तीच म्हटली पाहिजे.

## राधा-कृष्ण भक्तीचा मागोवा :

'भागवता'त प्रत्यक्ष राधेचा उल्लेख नसला तरी तत्सम कृष्णचरित्रातील अन्य घटनांची वर्णने आहेत. 'रासपंचाध्यायी'च्या रचनेने गोपी-कृष्ण संबंधांची शृंगारपूर्ण वर्णने पुढील काळात निर्माण होऊ लागली. प्रारंभीच्या पुराणग्रंथात राधेचा उल्लेख नसला तरी तो पुढील काळातील वैष्णवपुराणातून होऊ लागला. ब्रह्मखंड, पद्मपुराणादि ग्रंथातील राधा अनेकांच्या काव्याची स्फूर्तिदात्री ठरली. देवीभागवत, नारदपुराणादि ग्रंथही राधेचा उल्लेख करतात. प्राकृत ग्रंथातील 'गाथासप्तशती' ग्रंथात राधा लौकिक रूप धारण करून अवतरली आहे. पुराणग्रंथांप्रमाणेच अन्यत्रही राधेचा उल्लेख आढळतो. इ. स. ८५० च्या सुमारचा 'ध्वन्यालोक' हा ग्रंथ आणि इ. स. ९८० च्या सुमाराचा अमोघवर्षाच्या धारा येथील एक शिलालेख यात असे उल्लेख आहेत. इ. स. ११४० च्या सुमारास निंबार्कस्वामींनी राधा कृष्णांना आपल्या वैष्णवधर्मात चिरस्थायी केले. चैतन्य, वल्लभ हे वैष्णव भक्तही याच परंपरेतील होत. दक्षिणेकडील अलवार स्त्री-पुरुष संतांनी ही राधा-कृष्ण भक्ती अधिक लोकप्रिय केली. समाजाच्या विविध थरातील कवींनी या विषयावर लेखन केले हे विशेष होय.

## राधा : व्युत्पत्ती व तिची विभिन्न रूपे :

'राध' संसिद्धी धातूपासून राधा शब्द बनला.

श्रीमत् भागवत पुराणात पुढीलप्रमाणे उल्लेख आढळतो :

अनयाऽऽराधितो नूनंभगवान् हरिरीश्वरः ।
यन्नो विहाय गोविंदः प्रीतो यामनयद्रहः ॥
(१०-३०-२०)

कृष्ण राधेची किंवा राधा कृष्णाची सदैव आराधना करते म्हणून तिला राधा म्हटले जाते. प्रेमाधिक्यामुळे उपासक आणि उपास्य यांमध्ये एकरूपता होते. राधा शब्दाचा अर्थ तद्रूप होणे असाच आहे.

श्री नारद पाञ्चरात्र ग्रंथात म्हटले आहे :

अनयाऽराधितः कृष्णो भगवान्हरिरीश्वरः
लीलया रसवाहिन्या तेनराधा प्रकीर्तिता ॥

भगवान् श्रीकृष्णाची प्रेमपूर्वक आराधना केल्यामुळे व लीलारसात परिपूर्ण मग्न झाल्यामुळे तिला राधा म्हटले जाते. ब्रह्मवैवर्तपुराणात राधा शब्दाची व्युत्पत्ती अनेक प्रकारे सांगितली आहे. 'रा' चा अर्थ 'प्राप्त करणे' आणि 'धा'चा अर्थ 'निर्वाण (मोक्ष)' असा आहे. भक्त तिच्यापासून निर्वाण-मुक्ती प्राप्त करीत असल्याने तिला राधा म्हटले जाते. (ब्र. वै. पु. प्रकृतिखंड अ. ४८ : ३९ : ४३) राधा श्रीकृष्णाची प्राण-प्रिय प्रिया असल्याने योगमाया पराप्रकृतिरूपा राधाचे नाव पुरुषरूप परमात्मा श्रीकृष्णाच्या नावाशी संयुक्त आहे. पराप्रकृतीचे नाव पुरुष- नामापूर्वी लावण्याची पद्धती शास्त्रमर्यादेस धरूनच आहे. (ब्र. वै. पु. श्रीकृष्ण जन्म खंड अ. १११ : श्लो. ५७, ५८.)

## राधेचे आध्यात्मिक स्वरूप :

स्कंध पुराणात श्रीमत् भागवत माहात्म्य वर्णन करताना शांडिल्यांनी म्हटले आहे. भगवान श्रीकृष्णाचा आत्मा राधिका आहे. त्यांच्याशी रमल्याने रहस्य-रस जाणणारे त्यांना आत्माराम म्हणतात.

आत्मा तु राधिका तस्य तदैव रमणारसौ
आत्मारामतया प्राज्ञैः प्रोच्यते गूढवादिभिः ॥

(श्री स्कंध महापुराण संहिता : द्वितीय वैष्णव खंड : श्रीमत्भागवत माहात्म्य अध्याय १, श्लोक २२.)

## ब्रह्मसंहिता :

यः कृष्णः सापि राधा या राधाकृष्ण एव सः ॥

'देवी-भागवता'च्या नवव्या स्कंधातील दुसऱ्या अध्यायात राधेस भगवानाची प्रकृती म्हटले आहे.

बृहद्-ब्रह्मसंहितेच्या द्वितीय पाठातील पाचव्या अध्यायात भगवान नारायण आपली प्रेयसी महालक्ष्मीस वृंदावनरहस्य वर्णन करताना म्हणतात :

गोपनादुच्यते गोपी श्रीलीला राधिकाभिधा
देवी कृष्णमयी ज्ञेया राधिका परदेवता ॥ ५ ॥

वैष्णवधर्मातील राधा आपल्या मूळ स्वरूपात सांख्यांची प्रकृती आहे. ब्रह्मवैवर्त पुराणात राधा-कृष्णांचा समन्वय केला आहे. राधा-कृष्ण भिन्नही आहेत व अभिन्नही आहेत.

व्रजलीलेतील वर्णनात श्रीकृष्णाचा अनेक गोपींशी संबंध दाखविण्यात आला आहे. राधा ही त्यातील एक आहे. स्वकीया आणि परकीया अशा दोन प्रकारच्या कृष्णवल्लभा मानल्या जातात. रुक्मिणी, सत्यभामादि विवाहिता ह्या 'स्वकीया' आणि गोपी ह्या 'परकीया'. वस्तुतः श्रीकृष्णाच्या सर्व प्रेयसी 'स्वकीया' म्हटल्या पाहिजेत !

**ज्योतिषशास्त्रदृष्ट्या :**

रासलीलेचा चंद्राशी निकट संबंध आहे. चंद्र राशीशी रासलीला करतो. प्राचीन काळात नक्षत्रांची गणना कृत्तिकेपासून होत असे. कृत्तिकेपासून गणना केल्यामुळे विशाखा नक्षत्र सर्व नक्षत्रांच्या मध्यभागी येते. (आणि विशाखा नक्षत्राचेच दुसरे नाव राधा असे आहे.) म्हणूनच तिला 'रासेश्वरी' असे म्हटले जाते.

राधाच्या पुढील नक्षत्रास 'अनुराधा' म्हणतात. कार्तिकी पौर्णिमेस सूर्य विशाखा नक्षत्रात असतो. राधेचे सूर्याशी अदृश्य मीलन होते. ज्या प्रकारे सूर्याच्या चारही बाजूंस मंडलाकार तारे आहेत, त्याप्रमाणे कृष्ण 'रासक्रीडे'च्या मध्यभागी आहे आणि गोपी मंडलाकार आहेत. संस्कृतात 'चंद्रमा' पुल्लिंगी नसल्याने त्यास राधेची प्रतिनायिका मानण्यात आले आहे. अमावास्येच्या रात्री चंद्र-सूर्याचे मीलन होते. याचा अर्थ असा की, कृष्ण गुप्तरूपाने चंद्रावलीच्या कुंजात जातो. वृषभानु म्हणजे वृष राशिस्थ भानु-सूर्य असल्याने राधेला वृषभानूची कन्या मानण्यात आले आहे. पद्मपुराणात राधेच्या आईचे नाव 'कीर्तिदा' असे देण्यात आले आहे. या प्रकारे ज्योतिषतत्त्वानुसार कृत्तिका वृष राशीत सांगितल्यामुळे राधेच्या मातेचे नाव 'कृत्तिका' मानण्यात आले आहे. 'अयने भवः आयनः'. उत्तरायणाच्या काळात जन्म झाल्याने 'आयन' नाव पडले. म्हणून राधेच्या पतीचे नाव 'आयान'. अशा तऱ्हेने ज्योतिषशास्त्रातील तत्त्वे कविकल्पनेने रूपकाश्रयी बनली. पौराणिक काळानंतरच्या लोकांनी हे रूपकच सत्यस्वरूप मानले. राधा-कृष्णाच्या लीलांचा विकास-विस्तार या रूपकांमुळेच झाला. पुराणातील कृष्ण इ. स. पूर्व तिसऱ्या शतकातला आणि राधा इ. स. च्या तिसऱ्या शतकात काव्यरूढ झाली असावी.

## राधेचे धार्मिक स्वरूप

राधेचे स्वरूप बाराव्या शतकापर्यंत धर्ममतांशी मिळतेजुळते राहिलेले दिसते. तथापि कोणत्याही तत्त्वप्रणालीचे चित्रण त्यात झालेले दिसत नाही. बाराव्या शतकातील साहित्यात, विशेषतः जयदेवाच्या ' गीतगोविंदा 'पासून राधेस प्राधान्य मिळालेले दिसते. धर्मक्षेत्रात जयदेवाच्या काव्याने प्रवेश केला. लीलामय कृष्णाचे माहात्म्य सर्वत्र गायिले जाऊ लागले. राधा मधुररसाचे घनीभूत प्रतीक मानून मधुररसाच्या आधारावर तिची प्रतिष्ठापना होऊ लागली. गौडी वैष्णव संप्रदायाचा प्रचार होऊ लागला. निंबार्क संप्रदायात श्रीकृष्णास परब्रह्म मानण्यात आले आणि लक्ष्मीच्या स्थानी गोपिका राधेसच कृष्णाची शक्ती मानण्यात येऊ लागले.

## राधेचे वैज्ञानिक स्वरूप

ज्याचे आपल्याला ज्ञान होऊ शकत नाही ते कृष्ण आणि ज्ञान होऊ शकते त्याला शुक्ल म्हणतात. न दिसणाऱ्या वस्तूस काळी व प्रकाशवान वस्तूस श्वेत म्हणतात. सृष्टीच्या प्रथमावस्थेस कृष्ण म्हणतात.

सर्व जगताचे कारण भगवान विष्णू व आद्यशक्ती कृष्णवर्ण म्हटली जातात.

भक्तिसंप्रदायाचा प्रसार जसजसा वाढत चालला, तसतशी त्याची विविधांगेही साकार होत चालली. द्वैतभावातून प्राप्त होणारे भक्तिसुख अनुभवण्याची जणू अहमहमिका चालली. पौराणिक रूपक निर्माण झालेल्या विविध कथा जनसामान्यांकडून जशा वास्तव स्वरूपाच्या मानल्या जाऊ लागल्या, त्याचप्रमाणे परमेश्वराची मानसिक भक्ती वास्तवात उतरविण्याचाही प्रयत्न होऊ लागला. भागवतात निष्काम भक्तीचा पुरस्कार करण्यात आला असून त्याप्रीत्यर्थ संतसमागमादि उपाय सांगितले आहेत. भक्ती ही नवविधा स्वरूपाची असल्याचे भागवतात प्रतिपादन आहे.

> श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम्
> अर्चनं वंदनं दास्यं सख्यमात्म निवेदनम् ।।

ही नवविधा भक्ती आचरणारे अनेक आदर्श भक्तही होऊन गेले.

परंतु परमेश्वराशी आत्यंतिक एकता साधणाऱ्यांसाठी स्त्री-पुरुष मीलनातील उत्कटावस्थाच पुढे आदर्श मानण्यात येऊ लागली आणि त्यातूनच मधुराभक्तीचा उदय झाला. ' मधुराभक्ती ' म्हणजे शृंगारभक्ती. परमेश्वराशी पती–पत्नी वा प्रियकर–प्रेयसीचे नाते जोडून जी भक्ती केली जाते, तीस उज्ज्वल वा मधुराभक्ती असे नाव वैष्णव शास्त्रकारांनी दिले आहे.

श्रीकृष्ण व गोपी यांची भक्ती ही या मधुर प्रकारची होती. मानवी अनुरागाची व मीलनाची शेवटची पायरी म्हणजे स्त्री-पुरुषाचे, पती–पत्नीचे प्रेम हीच होय. त्यांच्या मीलनातील अभेद परमेश्वरभक्तास अधिक सुखद वाटतो. " आत्म्याने परमात्म्याशी,

जीवाने शिवाशी, ससीमाने असीमाशी हा जो शृंगारमूलक संबंध स्थापन करण्याचा अनुरागयुक्त प्रयत्न केलेला असतो, त्याच वृत्तीतून मधुराभक्तीचा उगम झालेला आहे." ( डॉ. प्र. न. जोशी : मराठी साहित्यातील मधुराभक्ती : पृष्ठ ३ व १२.)

या मधुराभक्तीचा आविष्कार उत्तरेत व हिंदी काव्यात प्रामुख्याने आढळतो. मराठी काव्यात विशेषतः 'गौळणीं'च्या स्वरूपात तिचा आविष्कार झाला आहे. बाराव्या शतकात निर्माण झालेल्या जयदेवाच्या 'गीतगोविंद' या काव्याचा प्रभाव हिंदी तसाच मराठी कवींवरही पडला. ज्ञानेश्वरांच्या विरहिणी जयदेवाशी नाते सांगणाऱ्या आहेत. तथापि ज्ञानेश्वरांनी उच्च आध्यात्मिक पातळीवरून गोपी-कृष्णांची मधुराभक्ती रंगविली आहे. राधा-कृष्ण संबंध लौकिक शृंगारभावनेतूनही रंगविले जात होतेच. 'गाथा-सप्तशती'-मध्ये अशा संबंधांचे दर्शन घडविणाऱ्या काही गाथा आहेत. उदा. 'अहो, अजूनही माझा दामोदर बालक आहे.' असे वारंवार यशोदेने म्हणताच कृष्णमुखावर दृष्टी टाकणाऱ्या व्रजवधूंच्या मुखावर चोरटे हास्य उमटत असे. येथे व्रजवधूंनी कृष्णाशी पूर्वी सुरतानुभव घेतला होता असे सूचित करण्यात आले आहे ! (गा. स. श. : शतक दुसरे : १२.१२.)

बाजूला उभ्या असलेल्या, नृत्यामध्ये निपुण असलेल्या अशा गोपी नृत्याचे कौशल्य सांगण्याच्या मिषाने सदृश गोपींच्या गालाचे चुंबन घेतात, पण खरोखर प्रतिमारूपाने दिसणाऱ्या कृष्णाचेच चुंबन घेतात. (गा. स. श. : शतक दुसरे : १४.)

कृष्ण मोठा झाला व त्याच्या विवाहाचा विचार सुरू झाला, तेव्हा तरुण गोपी यशोदेशी असलेले आपले नाते लपवू लागल्या. कारण कृष्ण सर्वांनाच हवा होता. निकटसंबंधाचे अथवा विवाहसंबंध निष्प्रतिबंध व्हावा म्हणून गोपी नाती लपवू लागल्या, की कृष्णाशी असलेला आपला संबंध त्या यशोदेपासून लपवू लागल्या ? ( गा. स. श. : शतक दुसरे : ५५.)

गाथासप्तशतीतील काव्य व त्याचा आशय लोकभाषेतील व लोकजीवनाशी जवळचा असा असल्याने त्याचे उत्कट प्रतिबिंब मराठी शाहिरांच्या लावणीकाव्यात किंवा गौळणीत उमटल्याचे दिसते. परंतु राधा-कृष्ण कल्पनेस दिलेल्या पारमार्थिक स्वरूपाचा आविष्कार मात्र संतकवींच्या काव्यात आढळतो. भक्तीच्या उत्कट क्षणी परमेश्वरचरणी आत्मार्पण करण्याची, सायुज्यमुक्ती साधण्याची साधकाची इच्छा संतकवींनी गौळणीच्या माध्यमाद्वारे काव्यबद्ध केली आहे. आपल्याजवळ असणारे जे जे उत्कृष्ट ( पत्रं, पुष्पं, फलं, तोयंसुद्धा) ते ते परमेश्वरार्पण करण्याची भक्ताची भावना असते. त्यामुळे स्वदेहार्पण करण्याचीही तयारी कित्येक भाविकांनी केली. इहलोकात गुरू किंवा ब्राह्मण हे देवाचे प्रतिनिधी मानले जातात. त्यामुळे पारमार्थिक क्षेत्रातील हे आत्मनिवेदन लौकिक जीवनात अवतरले आणि त्यातून चमत्कारिक रूढी, परंपरा निर्माण झाल्या. देवदासी, भाविणी, जोगतिणी, मुरळी इ. हे लोकसंस्कृतीतील परमेश्वरार्पित घटक आहेत. परमेश्वर हाच पती मानून राहाणाऱ्या स्त्रिया व पुरुष यांचा यात समावेश होतो. परमेश्वराशी

एकरूपता साधण्याचा हा लौकिक प्रयत्न होय. खंडोबाची स्त्री होऊ इच्छिणारी मुरळी पुढे निःस्संग बनते, आणि तिला परमात्म्याचा विसर पडतो. स्वतः उभारलेल्या मंदिरात नृत्यगायन करीत देह परमेश्वरार्पण करणारी राणी मुरळी ही पहिली देवदासी होय. परंतु नंतरच्या देवदासी या पुजाऱ्यांच्या उपभोग्य स्त्रिया बनल्या. मरीआई आणि यल्लम्मा यांच्या उपासकात त्यांच्यासाठी सोडलेल्या स्त्रिया तसेच स्त्रीवेषधारी पुरुषांचाही समावेश होतो. यात नवसाने देवीस वाहिलेले पुरुष ते जोगती व स्त्रिया त्या जोगतिणी होत. या स्त्रिया अविवाहित राहातात व पुरुष प्राधान्याने नपुंसक असतात. पोतराज हा मरीआईचा उपासकही याच परंपरेतील आहे. या सर्व लोकसांस्कृतिक संस्थात आचारहीनतेचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. मधुराभक्तीची परमार्थाकडून स्वार्थाकडे चाललेली उलटी वाटचाल या परंपरेत आढळते. एकनाथांनी रचलेल्या वरील घटकांवरील आख्यानात आणि लोकगीतात त्यांच्या ऐहिक व पारमार्थिक जीवनाचा चांगला प्रत्यय येतो. उदाहरणार्थ हे एक वाघ्या-मुरळीचे गाणे पाहा :

करमेना चांदनी रात देवा । विना करमेना चांदनी रात
समई जळती मंदिरात देवा । विना करमेना चांदनी रात
शेज मी कुसुमाची केली । शेज मी कुसुमाची केली
रात्र मला वैऱ्याची गेली । रात्र मला वैऱ्याची गेली
चला चला महाराज महाली चला की
काय हे केलेस धन्य तू मल्हारी रे धन्य तू मल्हारी
भल्या भल्याला रे केले वाघे गळ्यात भंडारी रे
गळ्यात भंडारी
आहेव नारी केल्या मुरळ्या नाचे दारोदारी
नाचे दारोदारी
धन्य तू मल्हारी रे धन्य तू मल्हारी ॥

देवाशी लग्न लागलेल्या स्त्रियांचा भक्तिभावाविष्कारही त्या भूमिकेतून झालेला आहे. परब्रह्माच्या आध्यात्मिक स्वरूपाचा येथे लोप झाला आहे. ऐहिक स्वरूपातील प्रेमव्यवहारांचे स्वरूप अशा मधुराभक्तीने भारलेल्या काव्यात प्रकट झाले आहे. राधा-कृष्णांच्या, गोपी-कृष्णांच्या लीळांची आध्यात्मिक परिभाषेत जीव-शिव, चित्-अचित्, माया-ब्रह्म अशा तऱ्हेने मांडणी होत असली तरी त्यातील लौकिक भावच सामान्यांच्या नजरेत अधिक भरण्यासारखा होता. आध्यात्मिक उंची गाठता न आल्याने त्या रूपकातील विशुद्धभाव जाणणे सामान्यांना कठीणच होते. 'कामी स्वतां पश्यति' या उक्तीप्रमाणे त्यातून आपल्या वैयक्तिक जीवनातील प्रेमभाव, शृंगार यांचेच दर्शन त्यांना होणे स्वाभाविक होते. मातृ-पितृ प्रेम, बंधु-भगिनी प्रेम याप्रमाणेच भक्ती हाही प्रेमभावनेचाच एक आविष्कार आहे. तीत कधी शृंगार तर कधी वात्सल्य प्रकट होते. त्याचा विविध

रूपातील आविष्कार संतकवींच्या काव्यात उत्तम प्रकारे झाला आहे. मात्र मराठी संत-कवींच्या ' गौळणी 'त या मधुराभक्तीचे भावपूर्ण आणि उन्नत स्वरूपच प्रत्ययास येते. पती-पत्नी किंवा प्रियकर-प्रेयसीच्या लौकिक शृंगारभावास तीत थारा नाही. एक विशुद्ध वात्सल्यभाव, निरागसभाव घेऊन ती साकार झाली आहे.

संस्कृतपासून प्राकृत मार्गाने मराठी वाङ्मयाने स्वतःची म्हणून जी विशिष्ट अंगे नव्याने अथवा नव्या ढंगाने उभी केली, त्यात ' गौळणी ' हा एक अपूर्व काव्यप्रकार येतो. बाराव्या शतकापासून सतराव्या शतकापर्यंतच्या पाचशे वर्षांत मराठी काव्य प्रामुख्याने धार्मिक भावनांवर आधारलेले होते. शृंगारादी लौकिक भावसुद्धा धार्मिक वा पारमार्थिक आवरणाखेरीज व्यवहारात मिरवू शकत नव्हते. अशा अवगुंठनविरहित लौकिक काव्याला समाजात मान्यता मिळू शकत नव्हती. मुकुंदराजापासून संत निळोबां-पर्यंत मराठीची वाटचाल ' रामकृष्णहरी ' या नामघोषाच्या तालावर झाली आहे. या तालावरील ' गौळणीं 'चे संगीत ज्ञानोबांपासून निळोबांपर्यंतच्या सर्व संतांनी मोठ्या रसिकतेने छेडलेले आढळते. रामदासासारख्या रांगड्या कवीनेसुद्धा नाजूक गौळणी लिहिलेल्या आहेत. वीतराग ज्ञानेश्वरांच्या ' विरहिणी ' (विराण्या) योग्य दृष्टिकोनातून पाहाता न आल्यामुळे, अनेक टीकाकारांनी, त्या ज्ञानेश्वरांच्या नव्हेत, असे प्रतिपादन केले असले तरी सांप्रदायिक वारकरी मात्र त्यांना आपल्या संग्रहातून टाळू इच्छीत नाहीत. एकनाथांच्या गौळणी तर भजनांच्या उत्तररंगाचे प्रमुख आकर्षण असते. कथा-कीर्तनांच्या पूर्वरंगातील अध्यात्म-विवरण उत्तररंगात कथानिरूपणाने आणि साभिनय गौळणींनी साकार होते. नामदेव व तुकाराम यांच्या गौळणीत त्यांचे व्यक्तिविशेष आकारले आहेत. मात्र या सर्व कवींच्या गौळणीत या काव्यप्रकाराचे सर्वसामान्य स्वरूप सारख्याच तऱ्हेने स्पष्ट झालेले आहे. संतांच्या भक्तिभावनेचे आधारस्थान जे ' भागवतपुराण ', त्यातच या मराठी गौळणीचे मूळ आहे. भागवताच्या दशम स्कंधात ' गोपी-गीत ' आणि ' भ्रमरगीत ' ही दोन अत्यंत रसाळ प्रकरणे आहेत. ' काव्येषु नाटकं रम्यं ' याप्रमाणे पुराणात भागवत, भागवतात दशम स्कंध आणि दशम स्कंधात ही दोन गीते असा रम्यतेचा चढता क्रम लावता येईल. महाराष्ट्रात प्रसृत झालेल्या महानुभाव, वारकरी इ. भक्तिसांप्रदायिकांनी ' भागवता 'चा धर्मग्रंथ म्हणून स्वीकार केला. त्याची पारायणे झाली. त्यावर भाष्यग्रंथ लिहिण्यात आले. उत्तरेतील भक्ति-संप्रदायातील राधा-कृष्णांच्या, गोपी-कृष्णांच्या शृंगारलीलांना मात्र इकडे स्थान मिळाले नाही. श्रीकृष्णविषयक भक्तिभाव हा लौकिक प्रेमभाव न राहाता वारकरीपंथीय संत-कवींच्या काव्यात त्याला अलौकिक, विशुद्ध आणि दैवी स्वरूप प्राप्त झाले. म्हणूनच ' मराठी गौळणी 'त हिंदी काव्यातील प्रेमभावनेतील कामुकतेऐवजी भक्तिभावनेतील वत्सलतेचा, पावित्र्याचा, सात्त्विकतेचा प्रत्यय येत राहिला.

## ज्ञानदेवांची गौळण :

ज्ञानदेवादि संतकवींच्या स्फुट काव्यात त्यांचा आत्मानुभव उत्कटपणे आविष्कृत झालेला दिसतो. ओवीबद्ध सलग ग्रंथरचनेत त्यांच्या प्रतिभेचे उन्मेष विविध तऱ्हांनी प्रकट होत असले, तरी परमेश्वरविषयक उत्कट भक्तिभाव त्यांच्या अभंगादि स्फुटकाव्यात विशेषत्वाने प्रकट झाले आहेत. आपल्याला प्राप्त झालेल्या वाणी आणि लेखणीच्या दैवी देण्याचा वापर परमेश्वरगुणगानासाठीच त्यांनी मुख्यत्वे केला. परमेश्वराशी आत्यंतिक एकरूपता साधून त्याच्याशी रममाण होण्याचा त्यांचा प्रयत्न 'गौळणी'च्या स्वरूपात साकार झाला आहे. मराठी गौळण हा एक वैशिष्ट्यपूर्ण गीतप्रकार असून कवीपरत्वे त्याच्या भिन्न भिन्न छटा प्रकट झाल्या आहेत. वास्तविक मनाने आणि शरीराने परमेश्वराशी एकरूप होण्याच्या अवस्थेत त्रयस्थाचे भान असण्याची शक्यता नसते, आवश्यकताही नसते; तथापि ज्ञानदेवोत्तर संत व शाहीर कवींच्या 'गौळणी'त अवतरलेले नाट्य श्रोतृसापेक्ष आहे. ज्ञानदेवांची गौळण जनमनाशी संवाद साधणारी नसून ती मनमोहनाशी सुखसंवाद करते. ती त्याच्या मीलनाच्या कल्पनेने सुखावते. विरहाने हिंपुटी होते. बाललीलात रमते. खोड्यांनी कातावते. आत्मपीडनाच्या अनेकविध भावच्छटा ज्ञानदेवांची गौळण प्रकट करते. ही त्यांची एक प्रकारे आत्मरतीच आहे. आत्मरंगात मुसावलेले अपूर्व सुख 'स्वसंवेद्य'च असते, याची जाणीव ज्ञानदेवांची गौळण वाचताना जितकी होते, तितकी अन्य कवींच्या 'गौळणी'मुळे होत नाही. ज्ञानदेवांची गौळण अनेकविध रूपे धारण करीत असली तरी तिचे आंतरिक रूप परमात्मवेड्या ज्ञानदेवांचेच असते.

ज्ञानदेवांची काव्यसृष्टी योगानुभवातून स्फुरलेली आहे. त्यामुळे यौगिक गूढता त्यांच्या काव्यात अवतरली आहे. विश्वचिद्‌विलासवादाचे स्वरूप 'अमृतानुभवा'त त्यांनी विशद केले. हा चिद्‌विलास म्हणजे ज्ञानदेवांचा आत्मानुभवच होता. भक्त परमेश्वराच्या मीलनातही त्या चित्‌–चैतन्याचा साक्षात्कार त्यांना होत राहातो. ते चैतन्यच उभयरूपांनी नटले असल्याची जाणीव त्यांना होते.

> जो प्रियूची प्राणेश्वरी । उलथे आवडीचे सरोभरी ।
> चारुस्थली एकाहारी । एकांगाची ॥ (अमृ. १-३)

द्वैतातून अद्वैताकडे, साकाराकडून निराकाराकडे त्यांची वाटचाल आहे. ज्ञानोत्तर भक्तीचा पुरस्कार ज्ञानदेवांनी आग्रहाने केला आहे. भक्तिप्रेमाची मातब्बरी त्यांना कैवल्यप्राप्तीपेक्षाही मोठी वाटते. नदी सागराला एकसारखी मिळतच असावी किंवा वर्षाऋतूत ती वाढताना दिसावी, तसे हे भक्तिसुख सातत्याने वाढणारे आणि परमेश्वररूपात मिळणारे असते. त्याला ओहोटी अशी नाहीच. भक्ताने त्यात सातत्याने डुंबत राहून आकंठ तृप्त व्हावे, अशीच त्यांची स्थिती असते. परब्रह्माचे निर्गुण रूप विठ्ठलाच्या रूपाने सगुण साकार झाले आहे. गोपी व कृष्ण यांच्यातील अतूट व अलौकिक प्रेमभाव

प्रतीकात्मक रूपाने ज्ञानदेवांसमोर उभा आहे. प्रपंचात राहून परमात्मसाधना करणाऱ्या भक्ताचे उत्कट रूप त्यांना गौळणींच्या ठायी आढळले असावे. त्यांच्या गौळणीत, विरहिणीत ' राधा ' नाही. राधा–कृष्णांचे ' गाथासप्तशती 'त, ' गीत-गोविंदा 'त किंवा अन्य संतकवींच्या काव्यात आढळणाऱ्या संबंधांचे चित्रण त्यांच्या काव्यात नाही, हा एक विशेष म्हणावा लागेल. त्यांचा कृष्णसुद्धा पंढरीनाथ विठ्ठलाच्या रूपात प्रकटला आहे. आपल्या आराध्यदैवतावरील अव्यभिचारी निष्ठाच यात दिसून येते. प्रापंचिक जीवाची परमेश्वरप्राप्तीसाठी आत्यंतिक ओढ, तळमळ आणि त्याच्या अभावी होणारे असह्य विरहदुःख विरहिणीतून प्रकट झाले आहे. प्रापंचिक बंधने आणि व्यावहारिक नीतिनियम यांनी जखडलेली सासुरवाशीण आपल्या हृदयाधिष्ठित प्रियकराच्या चिंतनात, त्याच्या मीलनाची सुखस्वप्ने रंगविण्यात, प्रसंगी व्यावहारिक बंधने तोडून त्याच्याशी एकरूप होण्यात सुखसर्वस्व मानीत असते. जीवाची शिवाशी मीलनासाठी अशीच धडपड चाललेली असते. परब्रह्माच्या त्या रूपाशी एकरूप होण्यासाठी तो आर्त, व्याकुळ झालेला असतो. परंतु परब्रह्माच्या प्राप्तीनंतर संपूर्ण मोक्षप्राप्तीची अपेक्षा भक्तिसुखात डुंबणाऱ्या भक्ताची असत नाही. पती-पत्नीच्या मीलनातील द्वैतभावयुक्त अवीट सुख भक्तिप्रेमाने तो भोगू इच्छितो.

शृंगाराच्या माथा पाय ठेवणाऱ्या शांतरसाचा प्रभावी आविष्कार ज्ञानदेवांनी ' ज्ञानदेवी 'त केला असला, तरी अन्य रसांचाही यथोचित आविष्कार त्या ग्रंथात झाला आहे. ( येथ शांताचिये घरा । अद्‌भुत आलासे पाहुणेरा । परी येरांही रसां पांतिकरां । जाहला मानु ।।) ज्ञानदेव हे काव्य व तत्त्वज्ञान यांचा सुरेख मेळ घालणारे तत्त्वज्ञ कवी होते. त्यामुळे शृंगारावर त्यांच्या काव्यात अतिरिक्त भर नसला तरी तसे चपखल दृष्टान्त वेळोवेळी त्यांनी अवश्य दिले आहेत. ज्ञानदेवांच्या आयुर्मानाचा विचार करता त्यांनी स्त्री-पुरुष संबंधातील शृंगाराचे वर्णिलेले अनेकविध बारकावे त्यांच्या सूक्ष्म, मार्मिक निरीक्षणाची साक्ष पटवितात. लौकिकाचारात राहूनही अलौकिकत्व राखणाऱ्या या थोर पुरुषाची तुलना स्थितप्रज्ञाशीच होण्यासारखी आहे. ज्ञानदेवी, अमृतानुभव आणि स्फुट अभंग यातून अवतरणारे शृंगारिक दृष्टान्त मूळ विषयाची उत्कटता वाढविणारे असेच आहेत. गुरु-शिष्यसंबंध किंवा परमेश्वर-भक्तसंबंधही ते याच भूमिकेवरून, त्यांची आत्यंतिक जवळीक आणि परस्परानुरक्ती दर्शविण्याकरिता, वल्लभाकांतस्वरूपात मांडतात.

ना तरी जीवाचिये सेजे । गुरू कांतु करूनि भुंजे । ऐसे प्रेमाचेनि भोजे । बुद्धि वाहे ।। (ज्ञा. १३–३९१) किंवा आत्मज्ञाने चोखडी । संत जे माझी रूपडी । तेथ दृष्टी पडो आवडी । कामिनी जैसी ।। (ज्ञा. १८. १३५६)

परमेश्वरमीलनातील आत्यंतिक उत्कटता मानवी शृंगारकल्पनेनेच अधिक प्रत्ययकारी होऊ शकते, अशी अनेक भक्तकवींची भावना आहे. भक्त–परमेश्वर संबंधात पतिव्रतेची एकनिष्ठता असते. या लौकिक संबंधाद्वारे अलौकिकाचे सूचन होते. अहेतुकें चित्तें । अनुष्ठी पां ययातें । पतिव्रता पतीते । जियापरी ।। ( ज्ञा. ३.९२ ) आपल्या आवडत्या

विश्वचिद्विलासाच्या संदर्भात ज्ञानदेव असा दृष्टान्त देतात : स्त्रीपुरुष नामभेदें। शिवपण एकले नांदे। (अमृ. १.१७) जीव–शिवैक्याच्या संदर्भात स्त्री-पुरुषसंबंध प्रतीक रूपाने त्यांच्या काव्यात अवतरतात. ज्ञानदेवांच्या अभंगातील विरहार्त, मीलनोत्सुक गौळण ही भक्ताची प्रतीकरूप आहे. सर्वभावाने भगवंतास शरण जाणाऱ्यांना भगवंतांनी अभयदान देऊन ठेविले आहे. गोकुळातील गौळणींची श्रीकृष्णानुरक्तीही त्यांना परमेश्वराशी तदाकार बनविते.

'भक्तिप्रेमाने माझ्याशी मिळणाऱ्या गौळणी माझेच रूप पावतात.' असे भगवंतांनी सांगितल्याचे ज्ञानदेव स्पष्ट करतात. "पाहे पा वल्लभाचेनि व्याजे। तया व्रजांगनांची निजें। मज मीनलिया काय माझें। स्वरूपा नव्हती चिं॥ ज्ञा. अ. ९–४६५" या 'व्रजांगनां'ची प्रीती ज्ञानदेवांच्या गौळणीत उत्कटतेने प्रकट झाली आहे. ज्ञानदेवांच्या 'गौळणीं'चा, 'विरहिणीं'चा परामर्श या संदर्भात घेण्यासारखा आहे.

श्रीकृष्णाविषयी कृतककोपाने तक्रार करणारी ज्ञानदेवांची एक गौळण 'कान्होने मोहलिये। माझी मीच जालिये' असे म्हणून 'पूर्वपुण्य फळले, देहमुक्त जाले। बापरखुमादेवीवरे विठ्ठलें। ऐसे केले गो आइयो' अशी कबुली देते! अशा गौळणीतील शृंगारपूर्ण आशयाला ज्ञानदेव अध्यात्माची डूब देतात. परमेश्वराच्या दर्शनाने मनुष्यपण गळाले, अशी धालेपणाची भावना तीत प्रकट होते. सर्व साजशृंगार करून परमेश्वरास सामोरे जाण्याची भक्ताची इच्छा एका गौळणीत व्यक्त झाली असून या शृंगाराने 'हरी सोयरा व्हावा' अशी तिची अपेक्षा आहे. अंतःकरणापासून आवडणाऱ्या त्या 'गोवळू'-योग्य मला शृंगारा असे ती आपल्या सख्यांना आवर्जून सांगते. त्याच्या प्राप्तीसाठी 'देह पालटावो' असे तिचे सांगणे आहे. कृष्णाविना एकली असणाऱ्या या गौळणीस 'न गमे राती'. त्याचे वालभ तिच्या जीवास जडले असून कृष्ण हाच जीवाचा चैतन्य-चोर असल्याने त्याने आपला अंगीकार करावा अशी तिची विनवणी आहे. त्याच्याशी निकटत्व साधणारी ही गौळण त्याला विचारते : "पृथ्वीवर समुद्राचे पाणी सर्वत्र भरून राहिले आहे. वायू चांगल्या–वाइटाचा विचार न करता सगळीकडे भरून राहिला आहे. आकाश हेच अवकाश बनून राहिले आहे. तुझ्यात हे विश्व किंवा विश्वात तू आहेस. विठ्ठला, आता तू बोलू नकोस. तुझे वर्म मी जाणले आहे. चाळा लावून तू आम्हांला गोवतोस व लपून राहातोस. आता लपून कुठे जाशील?"

श्रीकृष्णाच्या खोड्यांनी कातावलेल्या गौळणींची गाऱ्हाणी हा मराठी गौळणीत आवर्जून येणारा विषय आहे. ज्ञानदेवांच्या गौळणींची कृष्णविषयक गाऱ्हाणी कौतुक-मिश्रित वात्सल्याने भरलेली व अध्यात्माच्या स्तरावर वावरणारी आहेत, 'घरोघरी लेकरे नसतात काय?' पण ही दशा काही वेगळीच आहे. या कान्ह्याने अत्यंत कासावीस केले आहे. 'कटीकर ठेऊनीया उभा। हेचि जाणे गे माये' अशी या गौळणींची भूमिका आहे. ज्ञानदेव म्हणतात, 'गाऱ्हाण्यांच्या मिषाने गौळणी ब्रह्मरसाने उचंबळत आहेत.' तेव्हा त्यात 'भावो की देवो धुरे बैसवाल' असा प्रश्न ते विचारतात.

'दधिव्रत भक्षून या तमाळनिळाने नवल केले.' अशी गाऱ्हाणी गौळणी यशोदेकडे सांगतात. त्याची विविध नावे घेऊन त्या म्हणतात, 'नेणवसी नेणवसी। आकळु तू नाकळसी' परंतु त्यांचे रूपगुणवर्णन करीत असतानाच त्यांना 'जाणितले जाणितले। माझे मज दीधले' असा प्रत्यय येतो आणि 'एकी म्हणती याते उभाचि कवळु' अशी ओढ निर्माण होते.

परमेश्वराच्या प्राप्तीसाठी व्याकुळ झालेल्या आणि त्याच्या विरहाने तळमळणाऱ्या भावुक भक्ताचे अंतरंग 'विरहिणी'च्या भूमिकेतून ज्ञानदेवांनी मांडले आहे. या विरहिणीचा विगणा भाव आर्ततेची तार सतत छेडत राहातो. ज्ञानदेवांची विरहिणी आपले हृद्‌भाव विविध तऱ्हांनी उलगडते. काळया कृष्णाशी निःसंग व निःशंक होऊन ती ओढली गेली आहे. श्रीकृष्णाची कामारी होऊन त्याचे सहवाससुख ती भोगू इच्छिते. त्यासाठी पाचा दामांचा धोंगडा नेसून, उरलेसुरले अन्न खाऊन राहाण्याची तिची तयारी आहे. निरखून पाहाता वृंदावनीचा कृष्ण तिला दिसतो आणि 'मनीं वेधु वो तयाचा। पंढरीरायाचा' अशी अवस्था प्राप्त होते. जागृती, स्वप्न, सुषुप्ती या अवस्थांतून विठ्ठलाची प्रतीती होऊन तुर्यावस्था प्राप्त होते.

'मग बोलो नये ऐसे केले। मन उन्मनी बोधले'

सावळया रूपाची ओढ लागलेल्या आणि सावळया बुंथीतील, सावळयाच्या रूपाने प्रभावित झालेल्या गौळणीस 'सावळेची होणे यासी ध्याता' असा अनुभव येतो. या श्यामतेजाने ती तृप्त होते. दिननिशी अवीट असणारे ते श्यामतेज भाग्ययोगाने पाहावयास मिळाले. ते पाहाताच कल्पनेचाही पडदा उरला नाही. इंद्रियवृत्तींनी त्याचे रूप साठविले. निराशा संपली आणि 'अनादि तनु अमर जाली' असा प्रत्यय आला. तिच्या घरी 'ब्रह्मसुखसोहळे' होऊ लागले.

आपल्या मनाचे कुटिलपण गोविंदाच्या योगे नाहीसे झाले, असे एक गौळण सांगते. आपल्या मनाला त्या सावळियाचे आकलन होत नाही, म्हणून ती खंतावते. त्याला सगुण म्हणून त्याचा पदर धरू गेले, तर तेथे नवल घडले; त्याने माझे मीपण चोरून नेले व आपणाऐसे केले, असे म्हणणारी ही गौळण सगुणाकडून निर्गुणाकडे वाटचाल करणारी आहे. कृष्णाकडे वेधल्या गेलेल्या विरहिणीला चंद्रामुळेही उबारा वाटू लागला. चंदन-लेपन आणि विंझणवाराही अशा वेळी निरुपयोगी ठरतात. हरीविना शेजार शून्य वाटू लागतो. नंदनंदनाशिवाय आपले प्राण वाचणार नाहीत असे तीव्रतेने तिला वाटते. कातर-वेळेला अंगणात उभी राहून येणाऱ्या–जाणाऱ्यांना 'विठ्ठल केउता गे माये' असे ती विचारू लागते. तहानभूक तिला समजत नाही. लज्जा, अभिमान यांची तिला फिकीर नव्हती. तो 'जीवीचा जीवन माझे मनीचे मनोरथ पुरवील' असा तिला विश्वास होता. निळया रंगाने वेडावलेली ही विरहिणी 'निळियेच्या निशी' पिशी झाली आहे.

कुसुमकोमल शय्येवरही ती विव्हळ झाली असून विरहज्वरामुळे तिच्या अंगी लावलेले

चंदनही तिला पोळत आहे. ब्रह्म भक्तांच्या भाग्याने साकार झाले, कृष्णरूपाने ते सर्व भूतमात्रात विरघळले, आकार नाहीसा होऊन कृष्ण सर्वत्र भरून राहिला. वेद जेथे अबोल झाले ते सावळे परब्रह्म तिचे दैवत असून तिच्या मनाने त्याच्या चरणी घर केले आहे. परमेश्वराच्या मीलनाचा शुभक्षण जाणवून तिच्या वृत्ती मोहरून येतात. ती म्हणते, " अंगी अलंकार लेववा, चंदन चर्चेवा, जाई, जुई, शेवंती, पारिजातकाची आरती करा. मेचूचा शेला काढा. गुढ्या उभारा. मखरे शृंगारा. आलिंगनासाठी माझे बाहू स्फुरण पावत आहेत. अंगात काचोळी सामावत नाही. आज त्याने वेळ का लावला ते कळत नाही. तो वाटेत शिणला असेल काय ? " त्या चित्तचैतन्याने तिचे लोचन भरून राहिले आहेत. विठ्ठलाशी ' सुमन संयोग ' होताच तिचे स्वप्न सत्य, साकार होते.

विटेवरचे सावळे परब्रह्म पाहाताच तिच्या मनाची अवस्था सागराला भरते यावे तशी रात्रंदिन त्याचे दर्शन घेतले तरी तिची तृप्ती होईना पण पूर्ण प्रकाशातच कुमुदिनी विकसित व्हावी, तशी तिची अवस्था झाली. पंढरपूरचा निळा, लावण्याचा पुतळा, तो विठो तिने डोळा देखिला. त्याच्या गुणी तिचे मन वेधले, पौर्णिमेचे चांदणे क्षणाक्षणाने उणे होत जावे, त्याप्रमाणे एका विठ्ठलावाचून तिचे जिणे झाले आहे. " पैल तो गे काऊ कोकताहे " ही विरहिणी स्त्रीसुलभ उत्कट भावनांच्या आविष्कारामुळे अत्यंत हृद्य बनली आहे. कावळ्याचे ओरडणे हे प्रियाच्या आगमनाचे संसूचन, त्यामुळे तिची स्थिती हर्षोत्फुल्ल झाली आहे. त्या कावळ्याला ती दहीभाताची उंडी देऊ करते. त्याचे पाय सोन्याने मढवू इच्छिते. कारण तो ' भेटती पंढरीराणे हा शकुन सांगतो आहे. ' ती म्हणते, " ज्याच्या लाभासाठी जीव वेचला, त्याचे सगुणरूप अवचित नजरेत भरले. त्याच्या चारी भुजा उचलून मी त्याला क्षेम देईन. आता कोणत्याही उपचारात माझे मन रंगत नाही. दृष्टीपुढे त्याचे ध्यान ठसावले आहे. अंतरात कान्हो संचारला आहे... वणु घुणघुणा वाजतो आहे. वारा रुणझुणा वाहतो आहे. अशा अवस्थेत त्या भवतारक कान्ह्याची भेट मला घडवा. चंद्र–चांदणे, चाफा–चंदन ही सारी त्या देवकीनंदनावीण मला आवडत नाहीत. ही चंदनाची चोळी माझे सर्वांग पोळत आहे. ही सुमनांची शीतल सेज आगीसारखी झाली आहे. " केशवाविना तिला काहीही आवडत नाही. ती म्हणते, " जीवाभावाने ज्याला अनुसरले तो अजून का येत नाही ! सयांनो, तो माझा प्राण लौकर घेऊन या. " अशा स्थितीत अवचित अळुमाळ परिमळ झळकताच तो गोपाळ आला असे तिला वाटले. चाचरत चाचरत ती बाहेर निघाली, भरल्या नजरेने पाहू लागली, तर वनमाळी दिसेनासा झाला. त्या सुखद विठ्ठलाने तिला काया, वाचा, मने वेधले होते; परंतु लपून राहाणाऱ्या त्या गोवळाने तिचे हे बोल ऐकले, मानले, आणि आपणाला देऊन टाकले. तेव्हापासून ' लपणेची पारुषले ' आणि तो गोवळा ' उभा पंढरिये येणे वेषे ' याचा अनुभव तिला आला. राधेचा कृष्ण हाच ज्ञानदेवांचा विठ्ठल पांडुरंग. विठ्ठलाच्या ठायी त्याची विविध रूपे त्यांना प्रतीत होतात.

ज्ञानदेवांची गौळण निळ्या, मेघश्याम रंगाशी एकरूप होते. कृष्णाचेच स्वरूप साऱ्या

स्थिरचरात भरून राहिल्याचा प्रत्यय येऊन ती तदाकार होते. आर्त विरहिणीची ही अवस्था शारीरिक व मानसिक पातळीवरही अनुभवता येईल, इतके तिचे हृद्य चित्रण ज्ञानदेव करतात. भक्तिसुखाचा अपूर्व अनुभव या विरहिणीद्वारे त्यांनी दिला आहे. विरहाच्या वेदनेतही एक प्रकारचे सुख तिला प्राप्त होत असते. प्रियाच्या प्रतीक्षेतील तळमळ, त्याच्या आगमनाच्या संसूचनेने बहरून आलेल्या चित्तवृत्ती आणि भेटीच्या वेळी झालेले आत्मविस्मरण या साऱ्याच अवस्था रंगविताना ज्ञानदेवांच्या प्रतिभेला नवे धुमारे फुटल्याचा प्रत्यय येतो. 'ज्ञानदेवी' किंवा 'अमृतानुभवा'त अंग चोरून वावरणारे प्रापंचिक, शृंगारपूर्ण दृष्टान्त त्यांच्या 'गौळणी'त 'विरहिणी'त आपले आल्हादकारक स्वरूप मुक्तपणे प्रकट करतात. शिवाच्या मीलनासाठी जिवाला लागलेली तळमळ ज्ञानदेव तितक्याच उच्च पातळीवरून अभिव्यक्त करतात. ज्ञानदेवोत्तर काळातील 'मराठी गौळणी'चे स्वरूप अभ्यासताना ज्ञानदेवांच्या गौळणींचे लोकोत्तरत्व सतत जाणवत राहाते.

## नामदेवांच्या गौळणी

नामदेव हा प्राचीन मराठीतील भावकवी म्हणून प्रसिद्ध आहे. भावोत्कटता हा त्यांच्या काव्याचा तसाच व्यक्तित्वाचाही विशेष आहे. परमेश्वराचा तो लाडका भक्त होता. परमेश्वर त्यांच्याशी बोलतो, त्यांच्या कीर्तनरंगात रंगतो, अशी भाविकांची श्रद्धा होती. कदाचित त्यांच्या काव्यातील भावाविष्काराला हे लौकिक रूपही मिळाले असेल. आपल्या जीवीचे पारमार्थिक आर्त संतकवींनी अभंग वाङ्मयात आळवून आळवून परमेश्वरास सांगितले आहे. ते दुःख जसे पारमार्थिक असते, तसेच त्यात सामाजिक दुःखाचाही सूर क्वचित चोखा मेळ्यासारख्या कवीच्या काव्यातून उमटलेला दिसतो. अंतरंगीचा उमाळा शब्दरूप घेऊन संतकवींच्या काव्यात प्रकट झाला झाला आहे. अभंगातून त्यांचे अंतरंग प्रकट झाले आहे. 'गौळणी' मात्र वस्तुनिष्ठ स्वरूपाच्या वाटतात. तथापि 'गौळण' ही त्यांच्या भावजीवनाचीच एक प्रतिमा मानली पाहिजे. ते काव्य लिहिताना ती भूमिका ते जणू जगत होते. संतांचे काय किंवा गौळणींचे काय ईप्सित हे एकच होते. सामाजिक संदर्भात भावाविष्काराला जी बंधने पडत होती, ती 'गौळणी'च्या रूपाने व्यक्त करीत असताना राहिली नाहीत. अर्थात भक्ताची भूमिका सुटून लोकानुरंजनाचा प्रयत्न जेव्हा तीत दिसतो, तेव्हा असे काव्य स्वाभाविकच वस्तुनिष्ठ स्वरूपाचे ठरल्याशिवाय राहात नाही.

नामदेवांच्या 'गौळणीं'चे स्वरूप आत्मनिष्ठ व वस्तुनिष्ठ असे उभयविध स्वरूपाचे आहे. 'भागवता'च्या दशमस्कंधातील कृष्ण-लीलांची वर्णने पारंपरिक पद्धतीची झाली आहेत. कीर्तनकाराचा लौकिक दृष्टान्तांनी कथा सजवून रंजन करण्याचा प्रयत्नही त्यात दिसतो. केवळ कथाकथन एवढेच स्वरूप 'बाललीला', 'कात्यायनी व्रत', 'रासक्रीडा' यांसारख्या विषयांवरील त्यांच्या काव्यात आढळते. परंतु कृष्णजीवनाशी समरस झालेली

राधा किंवा गोपी पाहिल्यानंतर नामदेवांना त्यांचा हेवा वाटतो. परमेश्वरकृपाभाजन झालेल्या गोपी नामदेवांना अध्यात्मक्षेत्रातील स्पर्धक वाटतात, ही गमतीची गोष्ट आहे. श्रीकृष्णजीवनातील अनेक लीलांचा आस्वाद घेणाऱ्या गोपींना म्हणूनच नामदेव म्हणतात, ' धन्य वो गौळणी सुखी तुम्ही ! '

नामदेवांची देवाशी असलेली सख्यभक्ती अपूर्व अशी आहे. श्रीकृष्णाचे बालरूप पाहाताना त्यांच्या काव्यात वात्सल्याचा शिडकावा होतो. त्याच्या प्रीतीसाठी आणि प्राप्ती-साठी तळमळणाऱ्या त्यांच्या अंतःकरणातून कारुण्याचे पाझर फुटतात. त्याच्या वियोगाने कातावलेले त्यांचे हृदय तडफडते, चिडते, रागावते, पण शेवटी नतमस्तक होते.

पेंद्याची भूमिका घेऊन त्याच्यावर रागावते, रुसते आणि निरागस विनोद निर्माण करते. जनसामान्यांसाठी कथानिरूपण करीत असताना नामदेव शृंगार रसात रंगतात. क्वचित ग्राम्यतेकडे झुकणारे वर्णनही करतात. परंतु आत्मरंगी रंगल्यानंतर मात्र त्यांना ' परब्रह्म निष्काम तो हा गौळियां घरी ' याचीच प्रचीती येते.

श्रीकृष्णाचे हे बालरूप वर्णिताना वत्सल रसाचा आविष्कार होतो. निष्काम परब्रह्म गौळिया घरी नांदत असल्याचे कौतुक त्यांना वाटते. ज्याचे पवाडे अनंत, ज्याचा ठाव कोणास कळत नाही आणि पूर्वपुण्याईनेच ज्याची जोड झाली, त्याची जन्मोजन्मी चरण-सेवा मिळावी, हीच त्यांची प्रार्थना आहे.

' यशोदे घराकडे चाल, मला जेवू घाल ' हे नामदेवांचे पद म्हणजेच एक उत्कृष्ट नाट्यगीत आहे. ते ऐकताना भाविकांची अंतःकरणे कौतुकाने भरून येत असल्यास नवल नाही. एका जसवंती गौळणीचे गाऱ्हाणे असे आहे : तळवे टेकीत डाव्या गुडघ्याने रांगत असणारा रंगनाथ तिने पाहिला. त्याने तिचे नवनीत भक्षण केल्यामुळे ती त्याला खांबास बांधून शिक्षा देते. हा ' पुराणप्रसिद्ध चोर ' म्हणजेच पुंडलिकासाठी विटेवर पंढरपुरात उभा असलेला केशव अशी नामदेवांची धारणा आहे. आध्यात्मिक परिभाषेचा वापर नसल्याने मूळ कथनातील गोडवा साध्या भाषेत मार्मिकपणाने प्रगट झाला आहे. वृंदावनात झालेल्या श्रीकृष्ण दर्शनाने भारावलेल्या गौळणीस त्याचे रूपात परब्रह्माची प्रचीती येते. ' ब्रह्मादिकांनाही हा बोलवेना. ब्रह्मादिक त्याच्या उच्छिष्टासाठी जळात मासे होऊन राहिले. हे त्याचे एक नवल तिने पाहिले. ' तेच परब्रह्म ' हाती शिदोरी वाटत असल्याचे पाहून तिला अधिकच नवल वाटते. ' गोविंद गीती गाणाऱ्या ' गोड भिल्लिणींचे मनोगतही ' विष्णुदास नाम्या 'ने साकार केले आहे. श्रीकृष्णाची अनेकविध रूपे आपल्या ' गौळणी 'त नामदेवांनी रंगविली आहेत. कित्येकदा ती चलच्चित्रांप्रमाणे साकार होतात. राजपथावरून गोपालांच्या समवेत सुदाम्याच्या खांद्यावर हात ठेवून येणाऱ्या सौभाग्यसुंदर, लावण्यगुण रत्नाकर अशा श्रीकृष्णास पाहाण्याकरिता स्त्रिया दुतर्फा उभ्या असल्याचे वर्णन एका पदात त्यांनी केले आहे. त्याच्या गोपाळ-काल्याप्रमाणेच हा ' गोपाळमेळा 'ही त्यांचा आवडता आहे.

' न पुरे धणी डोळियांची '—

कृष्णाचे सावळे, राजस रूपडे पाहाण्यात नामदेवांच्या गौळणी तदाकार होऊन जातात. त्याचे सौंदर्य न्याहाळताना त्यांची तृप्तीच होत नाही, इतके ते अपूर्व आहे. श्रीकृष्णाच्या रूपसौंदर्याची आणि त्याने वेडावलेल्या गौळणींची वर्णने नामदेवांनी अनेकवार केली आहेत. मथुरेस गोरस विकण्यासाठी जाणाऱ्या गौळणींच्या मुखातून 'गोरस घ्या 'ऐवजी 'गोविंद घ्या ' असे शब्द यावेत, त्याचप्रमाणे कृष्णाच्या ठिकाणी नामदेवांना त्याच्या बालरूपातील 'विठ्ठल 'च अधिक स्मरतो. त्यांच्या गौळणी म्हणतात,

'नावेक– विठ्ठल पाहू या साजणी । ना पुरे गे धणी डोळियांची ' लावण्यसागर केशिराजाच्या दर्शनाने त्या लाजावल्या आहेत. आकाशात मेघ दाटले. वीज खेळू लागली. मोर नाचू लागले आणि प्रेमभराने ते नीळकंठ झाले. गोविंद लौकर पाहण्यासाठी आकाश मधुधारांनी वर्षू लागले. कृष्णाच्या वेधाने आणि वेणूच्या छंदाने स्थिरचर आकर्षित होते. वृंदावनात रुणझुणू वेणू वाजतो आणि गोपाळांच्या तनुमनास तिचा वेध लागतो. रुक्मिणीरमण पांडुरंग हाच अंतर्बाह्य भरून राहातो, त्याच्याविना दुजे काही आठवत नाही. गोपाळांची सवे लागून राहाते, ध्यानातगानात तोच राहातो. तीच मूर्ती जागृती, स्वप्न, सुषुप्तीमध्ये सर्वगत दिसते. श्रीकृष्णमय अशी मनाची अवस्था झाल्यानंतर रात्र, वागर, यमुनाजळ, बुंथ, बिलवर, मोती, एकावळी, कास, काचोळी एवढेच नव्हे, तर ती (गौळण ) स्वतःसुद्धा काळी झाल्याची प्रचीती आली. याचे कारण एकच 'कृष्णमूर्ती बहु काळी हो माय. ' ही तदाकारता तिच्या पुरतीच उरत नाही. श्रीकृष्णमूर्तीही त्याच्या रंगाप्रमाणेच आपादमस्तक सावळी झाल्याचा प्रत्ययही तिला येतो. त्याच्या अंगावरची उटी, कपाळावरची कस्तुरी, कटी कसलेली कास, त्याची तनू, वृंदावन, कानातील तुळसीमंजिण्या, कंठीची माळ, हृदयावरील पदक विशाल, त्याच्या भोवतीच्या गोपी, हातीची काठी आणि पाठीवरील कांबळा हे सारेच सावळे सावळे दिसू लागते. त्याच्या गाई मात्र धवळ्या-पिवळ्या आहेत.

त्याची देखणी दृष्टी आणि सावळे तेज आसन, शयन, डोळ्यांपुढून जात नाही. लोण्याचा गोळा हाती असलेल्या मुखावर गौळणी भुलल्या. गोविंदाचे श्रीमुख म्हणजे दुःखाची निवृत्ती आणि सुखाचेही सुख होय. श्रीकृष्णमुख म्हणजे चंद्रबिंब तर श्रीकृष्णमूर्ती म्हणजे कोटिचंद्रप्रभा, रांगताना ते चांदणे धवळते. ते रूप पाहाणाऱ्या गौळणी धन्य होत. त्याचे ते राजसरूप गौळणींना समाधान देते. यशोदा त्याच्या मुखावरून लिंबलोण उतरते. ते सच्चिदानंदघन तान्हुले ती ओवाळते.

अंगणी रांगणाऱ्या श्रीकृष्णावरून गौळणी इडापीडा घेतात. त्याचे मुख त्यांना शिणल्यावर विसावा देते, देह, गेह, सुत, पती त्यांना काहीही आठवेनासे होते. वैखरी कोंदल्याने ते सुख सांगवत नाही. राजीवलोचन, रमारमण, जीवीचा जीवन अशा श्रीकृष्णाचे दर्शन घेण्यासाठी एक गौळण आपल्या सखीला 'चाल सखिये, वेगुकरी वहिला । दिन सरला, काळ थोडा उरला ' अशी घाई करते. बालरूपातील श्रीकृष्णाचे निरागस रूप व क्रीडावर्णन करताना नामयास झालेल्या आनंदातून एक अपूर्व बाल-

नाट्य-गीत प्रकट झाले आहे. त्या बालरूपात सनातन कृष्ण त्यांना दिसतो. 'कृष्णाई'-च्या रूपात नामदेव त्याचे दर्शन घेतात. त्याची सुंदर मूर्ती न्याहाळणे व तिचे वर्णन करणे यात त्यांना मोठा आनंद वाटतो.

'ते सुख काय सांगो' —

नामदेवांच्या गौळणी आध्यात्मिक परिभाषेतही आपल्या भावना व्यक्त करतात. निर्गुण, निराकार परब्रह्मच श्रीकृष्णाच्या रूपाने सगुण साकार होऊन गोकुळात येऊन ते गाई राखते आहे. निगम, अमर आणि मुनिजनांना अप्राप्य असे नित्यपूर्ण ब्रह्म गौळणी लाडे कोडे खेळवितात. जाती, कुळ, शुची अथवा चांडाळ यांचा विचार न करता निर्मल हृदय पाहून तेथे ते प्रीती करते. त्रिभुवनसुखाचे सार, अनाथांचे माहेर, अव्यक्त पण साकार झाले आहे. त्याने नामयास प्रेमसुख दिले. भक्तिमार्गीयांनी प्रेमसुख हा पंचमवेद मानला आहे. धर्म, अर्थ, काम, मोक्ष या पारंपरिक चतुर्विध पुरुषार्थापेक्षा आणि चार वेदांपेक्षा प्रेमसुखाची महती त्यांना मोठी वाटते. या प्रेमसुखासाठी हे भक्तच केवळ नव्हेत, तर त्यांचा परमेश्वरही लालचावलेला असतो.

एरवी श्रीकृष्णाच्या बाललीलांनी सुखावणारी यशोदाही त्याचे परब्रह्मरूप जाणून बाल-कृष्णाविषयी गाऱ्हाणी सांगणाऱ्या गौळणींची खरडपट्टी काढते आणि म्हणते, 'ब्रह्म-विधीचा जनिता असणाऱ्या कृष्णास तुम्ही धरू पाहता, पण तो तुमच्या हाती कसा येईल?' पण गौळणी म्हणतात, 'तुझ्या बाळाला तू आवर. आमच्या मुलांना हा चिमटे घेतो, मोठ्यांचे ऐकत नाही, घरच्या म्हाताऱ्यास हाणतो. मी खोटी असेन, तर नामयाला विचार.' कृष्णाचे सवंगडीही अशीच तक्रार करतात. गोपींच्या स्थितीशी एकरूप झालेले नामदेव एका गौळणीत म्हणतात,

'ही तुझी असली कसली खोड?'

चिमटे घेऊन तू पळतोस. गोपी तुला मोठा द्वाड म्हणतात. वासरे सोडून तू ती गाईंना पाजतोस. यात तू काय मिळवतोस? आडवा होऊन गोपींना धरतोस. वदनाचे चुंबन घेतले, तर 'मला सोड' म्हणतोस. तेव्हा 'अशा ह्या चेष्टा नाम्यासी करिसी' विठ्ठलमाऊलीची प्रार्थना करताना नामदेव म्हणतात, 'माझे माये, रावणाला मारून बिभीषणास लंकेस स्थापून, तू अयोध्येस आलीस काय? तू माझ्या हृदयमंदिरात राहा. रखुमाबाई रुसून आली, तिच्या मागे तू धावलीस काय? गोपाळांना संगे घेऊन तू माझ्या हृदयमंदिरात राहा. द्वारकेचा ठाव सोडून तू आलास काय? त्या धन्य भक्त पुंडलीकाने तुला विटेवर उभे केले काय?' 'नामा म्हणे माझे माय गे। माझे हृदय मंदिरा राहे गे' कृष्णाची विविधरूपे आठवताना सुखावलेले नामदेव येथे दिसतात. आदिपरंपरेने तो त्यांचा सखा, सोयरा आहे. श्रीकृष्णचरणी चित्त गुंतल्याने देहागेहाचे आठव राहात नाही, त्याच्या प्रकाशाने मन सबाह्य वेधले जाते. इंद्रिये वृत्तिसहित परततात आणि कृष्णरूपी मिळून जातात. डोळ्यांनी कृष्णरूप पाहाताच मनाचे मनपण मावळते. ते सुख कोणत्या वाचेने बोलावे? चित्तचैतन्य हे समरस होऊनच भोगावयाचे

असते. परा परतते. पश्यंति तन्मय होते आणि मध्यमा वैखरी लय पावते. कृष्णमूर्ती पाहताना देह दिसत नाही. तेथे आर्तीचा आनंद गोठतो आणि कृष्णरूपाने त्याचा अंकुर उठतो. त्याच्या दर्शनाने अभिनव सुख प्राप्त होते. दृष्टीआड राहून तो तनुमनाला भुलवितो. चिदानंदघन, चिन्मय बाळकृष्णाला खेळवीत असताना मन उन्मन होते. गौळियांचे जन्मोजन्मीचे पुण्यसंचित मूर्तिमंत झाले आहे काय? कृष्णाचे परब्रह्मरूप न जाणता त्याचे लौकिकाचार पाहाणाऱ्यांचे नामदेवांना मोठे कौतुकमिश्रित नवल वाटते. जो भक्तजनांचा करुणाकर, क्षीरसिंधूचा दानी, तो चोरून लोणी खातो. जो भूतळी मावत नाही तो उखळाशी बांधला जातो. एका पायाने जो भूमी आक्रमितो, त्याला गौळणी चालावयास शिकवितात, ज्याच्या मायेने ब्रह्मादिक वेडावतात तो 'बागुल' म्हणताच रडतो, जो सहजी कोट्यवधी दानव नाहीसे करतो त्याला माता भीती दाखविते. नामा म्हणतो, 'हरी विश्वी विश्वंभरी आहे. तो नंदाघरी आहे– म्हणतात हे मोठेच नवल आहे!' चैतन्यात चित्त रंगलेल्या गौळणी मस्तकावर डेरा ठेवून 'गोविंद घ्यावो' असा पुकारा करीत जातात. 'दही' म्हणण्याऐवजी त्यांच्या मुखी 'गोविंद' येतो.

नामदेवांच्या विरहिणी विस्ताराने आपले दुःख सांगतात. संसारात परठिकाणी दिलेली एक विरहिणी म्हणते, "माझे माहेर द्वारकापुरी आहे. तिकडे जाण्यासाठी माझे मन उत्कंठित आहे. त्या माहेराआड गिरीडोंगर उभे ठाकले आहेत. सासरची बोलणी खावीत, तितकी 'विठू बापू माहेरा'चा आठव होतो. निरोप तरी कोण्या हाती पाठवावा? भक्ती ही माझी सखी. तिने माझ्यात शुद्धमती लाविली. सत्य भाव हा माझा सांगाती आहे. त्याचे समवेत माहेरच्या पुण्यमार्गाने मी जाईन. तेथे कृष्ण माउली भेटेल आणि माझा अवघा शीण हरेल." नामदेवाची विरहिणी 'प्रियकराच्या भेटीसाठी तळमळणारी नसून सासुरवासाने तापलेली, माहेरी जाऊ इच्छिणारी लेक आहे.

मध्यान्ह रात्री सुखासनावर झोपलेल्या विरहिणीस आलिंगून शंख, चक्र, गदाधाऱ्याने तिला पाटविले. 'तो कोण त्याची भेट घडवा' असे ती आर्ततेने सांगते. त्याचे वर्णन करते. त्याच्या आपादमस्तक रूपाचे तिचे वर्णन म्हणजे एक स्तोत्रच आहे. ते रूप पाहाण्याकरिता तिचा जीव उल्हसित होतो. विरहज्वराने ती तापली असून तिला मोठा उबारा होतो आहे. ती चंदनाने पोळते आहे. तिला विंजणवाराही नको. चंद्रमा तिला उष्ण, खडतर व दाहणारा वाटतो. भक्ती या मातेने द्वारकापुरीच्या केशिराजाला घरी आणले. त्या सारंगधराची भेट होताच तनु, मन, जीव त्याला (तिने अर्पण केला.) नंतर ती सुखी झाली.

नामदेवांच्या 'गौळणी'त भावगीतातील उत्कटता व गेयता यांचा आविष्कार झाला असला, तरी काही ठिकाणी त्या बऱ्याच पसरट झाल्या आहेत. विशेषतः आध्यात्मिक रूपके मांडताना किंवा त्या परिभाषेत आपले विचार मांडताना नामदेवांच्या कल्पनाशक्तीचा मुक्त आविष्कार होत नाही. ती गुदमरल्याची जाणीव होते.

'नामयाचे बोलणे, नव्हे हे कवित्व' हा नामदेवांच्या अभंगात येणारा प्रत्यय येथेही

येतो. हे सहज सुलभ बोलणे आहे तो सुख-संवाद आहे. ते बोलणे गौळणींच्या सखीशी असते, यशोदेशी असते, बालकृष्णाशी असते, तसेच परब्रह्माशीही असते. त्यामुळे या बोलण्यात ' हृदया-हृदय ' भेटल्याचा प्रत्यय येतो; परंतु नामदेवांच्या अभंगात व गौळणीत जाणवण्यासारखा एक फरक आढळतो. त्यांच्या अभंगांत त्यांच्या अंतरंगीचे सारे भाव उमटून प्रकट झालेले दिसतात. त्यात कृतक कोप, धिक्कार, प्रेम, भक्ती या विविध भावनांचा आविष्कार (काही वेळा एकाच अभंगात सर्व) आहे. त्यात देवाशी वाद आहे, क्वचित् त्याला धमकी आहे. आपला लळा पुरवावा, म्हणून हट्ट करणाऱ्या बालकाची निरागसता आहे. पोरकेपणाच्या जाणिवेतून परमेश्वराचे माऊली स्वरूप उभे राहाते आणि तिच्या वात्सल्याची भीक मागितली जाते. परमेश्वराच्या प्राप्तीसाठी ' तुटोनी आकाश पडेल ही शिरी । न सोडी मी हरी पाय तुझे ' असा आत्यंतिक आग्रह धरला जातो. नामदेवाच्या आत्मनिष्ठ कवितेचा उत्कट आविष्कार त्यांच्या अभंगात प्रामुख्याने झाला आहे.

**एकनाथांच्या गौळणी :**

एकनाथांचे प्रपितामह संत भानुदास यांच्या एक-दोन गौळणी उपलब्ध आहेत. त्यातील ' जमुनाके तट ' या हिन्दी भाषेतील गौळणीत भानुदासांनी कृष्णाचे सावळे रूप थोडक्यात पण मार्मिकपणे रेखाटले आहे. ते भक्तवत्सल कृष्णाचे दर्शन आहे. ' मुख पाहता लोचनी । सुख जाले वो साजणी ' हा ज्ञानेश्वरांचा भावानुभव इतर अनेक संतांनी घेण्याचा प्रयत्न केला, त्यातील हा एक आहे.

' वृंदावनी वेणू वेणू कवणाचा माये वाजे । वेणुनादे गोवर्धन गाजे ' ही भानुदासांची दुसरी सुप्रसिद्ध गौळण. वेणुनादाने झालेल्या तन्मयावस्थेचे वर्णन तीत आहे. त्या मुरलीचे माधुर्य भानुदासांच्या शब्दाशब्दात अवतरले आहे. भानुदासांना हे कृष्णस्तवन करताना प्रेमभक्तीची प्राप्ती झाल्याने अपूर्व समाधान झाले आहे. नाथपूर्वकाळात ज्ञानेश्वरां-नंतरच्या काळातील गौळणींचे स्वरूप भानुदासांच्या या एक-दोन गौळणींवरून समजू शकते. संख्येने अल्प असल्या तरी गुणवत्तेने त्या निश्चितच श्रेष्ठ वाटतात.

एकनाथांच्या कृष्णभक्तिविषयक काव्याचा विचार करताना त्यांच्या द्विविध व्यक्तित्वाचे दर्शन घडते. भागवतात गोपींच्या रासक्रीडात रमणाऱ्या कृष्णाविषयीच्या आक्षेपांना उत्तर देऊन ते कृष्णलीलांचे पारमार्थिकदृष्ट्या समर्थन करतात. कृष्ण उद्धवास म्हणतो, " सकाम भक्तांच्या कामना पुरवून मी त्यांना नित्य निष्काम बनवितो. म्हणून गोपींची कामासक्ती निष्कामस्थितीस आणून मी त्यांना सायुज्यमुक्ती दिली. मी गोपींशी ' कामु केला ' की त्यांचा काम निःशेष हरला, याचा विचार न करता मूर्ख लोक कृष्ण व्यभिचरला असे म्हणतात. " या संदर्भात डॉ. शं. दा. पेंडसे यांनी केलेले विवेचन अत्यंत मार्मिक वाटते. ते म्हणतात, ' भागवतात वर्णिलेल्या गोपींच्या या जारभावामुळे आणि परमेश्वर व गुरू हे एकरूप असल्यामुळे स्त्रीस्त्रियांना गुरूंच्या चरणी उपभोगाकरिता प्रथम

अर्पण करण्याची प्रथा महाराष्ट्राबाहेरील कित्येक भक्तिपंथात पडली आणि जाराशी रममाण होण्याला अप्रत्यक्षपणे प्रतिष्ठा येऊन भक्तिमार्गाचा अधःपात झाला, हे लक्षात घेऊन नाथांनी गोपींच्या अंतःकरणातील कामवासना ईश्वराच्या भक्तीमुळे कृष्णाने नाहीशी केली असा भक्तीचा मोठेपणा सांगून जारभावाची प्रतिष्ठा कमी केली.' (भागवतोत्तम एकनाथ : पृष्ठ १७५.) भागवत धर्माचे तात्त्विक विवरण करताना आराध्य दैवताची प्रतिमा भक्तहृदयात उजळ करण्याचा प्रयत्न एकनाथांनी साक्षेपाने केला आणि वारकरी पंथाच्या प्रमाणभूत म्हणून मानलेल्या या ग्रंथात त्याची आवश्यकताही होती. तथापि स्फुट गौळणी किंवा अभंग या काव्यप्रकारात मात्र नाथ या भूमिकेपासून थोडे दूर गेले आहेत. लोकजीवनाचे आणि लोकमानसाचे प्रतिबिंब असणारी गौळण लोकनाट्याच्या रूपात त्यांनी उभी केली. तीत अतिरेकी शृंगार अर्थातच नाही. तथापि जो थोडाफार ग्राम्य विनोद तीत येतो, तोही लोकजीवनाचे दर्शन घडविणाराच म्हणावा लागेल. भागवताचे श्रोते सुजाण आणि मुमुक्षु होते तर गौळणीचे श्रोते (व प्रेक्षकही) भिन्नाभिरुचीचे होते. दोहोंतही एकाच तत्त्वज्ञानाचे सूत्र खेळविलेले असले, तरी त्यांचा आविष्कार मात्र श्रोतृवर्गाच्या अभिरुचीनुसार वेगळा वेगळा झाला असावा.

कृष्णभक्तिविषयक काव्यात नाथांचे असे द्विविध व्यक्तित्व दिसत असले, तरी त्यांचे अंतर्याम एकच आहे. त्यांच्या 'भारुडा'त लोकसंस्कृतीच्या उपासकांची विविध रूपे त्यांनी साकार केली आहेत. नाथ हे परमार्थ सृष्टीतील बहुरूपीच आहेत. ती ती सोंगे ते उत्तम तऱ्हेने वटवतात, परंतु अंतिम ठसा परमार्थाचा वठावा याबाबतीत मात्र फार जागरूक असतात. 'गौळण' हेही त्यांचे असेच एक रूप आहे. त्यामुळे त्यांच्या काव्याच्या अंतरंगातील दुहेरीपणाविषयी शंका घेण्याचे कारण नाही.

नाथांचे गृहस्थाश्रमातील प्रापंचिक व्यक्तित्व, सौम्य, शांत, संथ, तृप्त आहे. त्यामुळे भावनिक उत्कटतेपेक्षा संयमित विचारदर्शनच त्यांच्या काव्यात अधिक आहे. भावना किंवा विकार यांचा अतिरेक त्यात नाही. ते 'समन्वयवादी' म्हणूनच अधिक ओळखले जातात. परमेश्वरप्राप्तीसाठी झुरणारा नामदेव किंवा त्याच्या उदासीनतेमुळे वैतागलेला तुकाराम यांच्या काव्यातील करुण–रौद्र आविष्कार नाथांच्या काव्यात आढळत नाही. 'विठू'च्या दर्शनार्थ तळमळणारी ज्ञानेश्वरांची गूढ प्रियाही तिथे नाही. या सर्वांच्या विरहातील अवस्थेप्रत जाऊन जीवेश्वराच्या प्राप्तीचा मार्ग दाखविणारे, त्यासाठी संत-संगाचा महिमा सांगणारे आणि अशा प्रकारे उपदेशकाच्याच भूमिकेवर वावरणारे नाथ त्यांच्या गौळणीत प्रकटतात

नाथांच्या गौळणीत शृंगाररसाचा उत्कट आविष्कार असल्याचा अनेकांचा गोड गैर-समज आहे. राधा-कृष्ण रूपाने अंतरंगातील प्रेमभावनांचा आविष्कार प्राचीन मराठी कवी करीत, असेही म्हटले जाते. परंतु अपवादात्मक उदाहरणांवरून नाथांच्या संपूर्ण काव्याची कल्पना करणे योग्य होणार नाही. नाथांच्या दैनंदिन जीवनात प्रवचन, पुराण-कथन, भजन आणि कीर्तन यांना महत्त्वाचे स्थान होते. त्यांचे सारे जीवनच परमार्थमय

झालेले होते. जनसामान्यांना केलेला उपदेश त्यांनी आपल्या वैयक्तिक जीवनात स्वतः आचरणात आणलेला होता. त्यामुळे 'संतसंगे ब्रह्मानंदे सुखेचि डोलावे' ऐशी कीर्तन-मर्यादा सांगणारे नाथ तसा अनुभव आपल्या कीर्तनात देत असतील यात नवल नाही. कीर्तनाचा पूर्वरंग अध्यात्मनिरूपणाचा आणि उत्तररंग आख्यान कथनाने रंगलेला असतो. या कीर्तनानंतर काही ठिकाणी होणारी 'सोंगी भजने' ज्यांनी पाहिली असतील, त्यांना गौळणींचा नाट्याविष्कार किती रंगत आणतो याची कल्पना असेल. 'भारुडा'सारखी उत्कृष्ट नाट्यगीते लिहिणाऱ्या नाथांनी गौळणीही सरस, नाट्यपूर्ण निर्माण केल्या असाव्यात अशी भाविकांची श्रद्धा आहे. परंतु 'वारियाने कुंडल हाले । डोळे मोडीत राधा चाले' अशा एखाद्या गौळणीपेक्षा त्यांची फारशी रसपूर्ण गीते आढळत नाहीत.

बोधप्रधानता आणि वैचारिकता ही एकनाथांच्या काव्याची बैठक असल्याने असे घडले असावे. सूक्ष्म नाजूक शृंगाराच्या छटा त्यांच्या गौळणीत आढळत नाहीत. विरहातून निर्माण होणारी शृंगारातील आर्तता, विव्हलता आणि तदनुषंगी ललितरम्य शैली प्रत्ययास येत नाही, याचे कारणही त्यांच्या व्यक्तिमत्त्वात आणि त्यांच्या समोरील श्रोते व प्रेक्षक यांच्या अभिरुचीत शोधावे लागते.

'आल्या पाच गौळणी' किंवा 'सुंदर बालका म्हणती गोपिका' यासारख्या अपवादात्मक गौळणीत नाट्य, ताल, छंद, गान यांचा उत्कृष्ट आविष्कार झालेला दिसतो. तथापि त्याही नाथांच्या अध्यात्मविचारातून सुटलेल्या नाहीत. 'रुक्मिणी स्वयंवरा'-सारखी सर्वगोड प्रेमकथाही एकनाथांनी अध्यात्म–विचारात गुंफल्याने तीमधील काव्याचा आत्मा हरवला आहे. तीच प्रतीती 'गौळणी'सारख्या त्यांच्या स्फुटकाव्यातही वारंवार येते. श्रोतृवृंदाच्या मनोरंजनासाठी कीर्तनकार प्रापंचिक जीवनातील दृष्टान्त देऊन जी विनोदनिर्मिती करतो, तिची पातळी फार उच्च दर्जाची असते असे नाही. त्यामुळे गोपीकृष्ण किंवा राधा–कृष्ण यांच्या भेटीगाठींच्या किंवा गाऱ्हाण्यांच्या वर्णनात नाथांकडून थोड्या ग्राम्य विनोदाचीही निर्मिती झाली आहे, हे मान्य करावयास हवे. भागवताच्या निरूपणात कृष्णावरील आक्षेपांचे खंडन करण्यास सिद्ध झालेले एकनाथ 'गौळणी'तील चमत्कारिक संबंध व प्रसंग रंगवून सांगतात, याच्या बुडाशी त्यांची कीर्तनकाराची भूमिकाच बळवत्तर ठरली, असे म्हटले पाहिजे.

**गाऱ्हाणी :**

एकनाथांच्या गौळणी तीन प्रकारच्या दिसतात.

१) गाऱ्हाणी २) कृष्णरूप–सौंदर्यवर्णन ३) विरहिणी. हे प्रकार अन्य कवींच्या गौळणीतही आढळतात.

नाथांच्या गाऱ्हाण्यांत सांकेतिकता आणि पारंपरिकता अधिक आहे. त्यात व्यंग्यार्थापेक्षा वाच्यार्थ प्रधान आहे. नाथांची भूमिका कथारूपाने लोकांना उपदेश करण्याची असल्याने या गौळणी म्हणजेसुद्धा त्याच भूमिकेचा एक आविष्कार आहे. बाल-

कृष्णाच्या खोड्यांविषयी अनेक प्रकारच्या तक्रारी घेऊन येणाऱ्या गौळणी नाथांनी रंगविल्या आहेत. कृष्ण हा गवळ्यांचा राजा नंद याचा मुलगा. स्वाभाविकपणेच त्याच्याविषयी गोपगोपिकांचा कौतुकभाव, पाटलाच्या मुलाने छेड काढली तरी त्याचेविषयीचे गाऱ्हाणे सांगताना कौतुकच. कृष्णाचा सर्वांच्या घरचा स्वैरसंचार त्याच्या या विशिष्ट नात्यामुळे सुलभ झाला. अशा गौळणीतील काही प्रसंगांवरून नाथकालीन समाजजीवनावरही काही प्रकाश पडू शकतो. ग्रामप्रमुखाच्या मुलाशी असणारे स्त्रियांचे चोरटे संबंध, काही वेळा ते उघड झाले तर त्याबद्दल सासूने सुनेलाच दटावण्याचा प्रयत्न इ. नाथांनी एका गौळणीत म्हटले आहे, ' गावचा पाटील झाला म्हणून काय गावचि बुडवावा...'

अर्थात अशा तऱ्हेचे समाजजीवन काव्यात आणण्यात एकनाथांचा लोकशिक्षणाचा आणि नैतिक जाणिवेच्या जागृतीचा विचारही असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

गौळणींच्या गाऱ्हाण्यात काही वेळा बालकृष्णाविषयीचा वत्सलभाव असतो, तर काही वेळा ' गाथासप्तशती 'तल्या अभिसारिकांसारखा चोरटा प्रेमभावही असतो. ' लेकी सुना पोरे ' कृष्णाच्या नादाने वेडावल्याची तक्रार करणाऱ्या प्रौढाही तीत आहेत. काही गोपिका एकीपुढे एक सरसावून तक्रार करतात. मंचकावर पहुडले असता दाढी आणि वेणी बांधणाऱ्या कृष्णाच्या खोडीविषयीचे गाऱ्हाणे म्हणजे नाथांच्या हरिदासी विनोदाचा एक नमुना आहे. त्यात थोडासा वात्रटपणाही आहे. नाथांच्या गौळणींची गाऱ्हाणी अशी आहेत : तो घुसळण करताना डेरा फोडतो, सासू मला मारू लागताच हसून पळतो, वासरे सोडतो, मुलांना चिमटे काढतो, ' नवनीत द्या रे ' म्हणून त्यांना मारतो, यमुनेवर पाण्यासाठी जाताना पाठी थापटतो, राधाही यशोदेकडे ' तो फक्त गोरसाची चोरी करतो. ' अशी तक्रार करते. तिच्या या ' विनोद वाणी 'ने गर्भितार्थ ध्यानात आल्यामुळे यशोदा व इतर गौळणी हसतात. तो कवाड उघडून शिंके तोडतो. दही, दूध भक्षून ताक उलंडितो, न्हाणाऱ्या सुनेस तो चेंडूसाठी मिठी मारतो. निद्रित पति-पत्नींच्यामध्ये मुंगुस सोडणारा कृष्ण पाहून ती ' भूत भूत ' असे ओरडली. तेव्हा तो मायेआड लपला. ' आता सापडता न सोडी त्याला ' असे ती म्हणते. या गाऱ्हाण्यास एका छोट्याशा कथेचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

कृष्णाला पकडण्यासाठी बारा-सोळा गौळणी टपून बसल्या. मध्यान्हरात्री कृष्ण आला. सर्वांना त्यावेळी निद्रेने व्यापले. दही, दूध, तूप, लोणी खाऊन कृष्ण परत यशोदेच्या वोसंगी जाऊन बसला. सूर्योदय झाल्यानंतर गौळणींनी तशी तक्रार यशोदेकडे येऊन केली. एका गौळणीने तर ' कृष्ण पुन्हा आला तर त्याला शिक्षा करीन ' असे सांगितले. काही गौळणींनी तर ' आम्ही आमच्या सुनांना घेऊन गोकुळ सोडून जातो.' असेही सांगितले. ही गाऱ्हाणी ऐकून यशोदेच्या डोळ्यांस पाणी आले. ती म्हणाली, ' कृष्णा, खोडी टाकून दे. ' एकनाथ म्हणतात, ' प्रेम तया आवरेना, ' एका गौळणीच्या मुखाने कृष्णाचे दैवी स्वरूप सांगताना नाथ म्हणतात, ' कृष्ण नट-नाटक-कपटी आहे. शेष लाजून स्तब्ध झाला. वेद (याचे वर्णन करताना) परतला. याला एकदा पाहताच गाठ सुटत नाही.

नित्यानंद प्राप्त होतो.' नाथांच्या दृष्टीने कृष्ण म्हणजे तान्हे परब्रह्म आहे. त्याचे ध्यान केल्यास येणे-जाणे खुंटते. तो दिसतो सगुण, पण आहे निर्गुण. त्याचे महिमान आगमा-निगमांनाही कळत नाही. परा, पश्यंती खुंटल्या. शिवालाही त्याचा महिमा कळत नाही. तो हा सावळा नंदाघरी नवनीताची चोरी करतो. (त्याचे विषयी) गौळणी गाऱ्हाणी सांगतात. (परंतु) त्याचा अगम्य खेळ कोणासही कळत नाही. त्याचे हे बरवे सोंग आहे. त्याची कीर्ती ऐकून सर्व पापांचा नाश होतो. (ते) ब्रह्म कसे वेडावले ! निर्गुण ते सगुण झाले. (आणि त्याने) त्रिभुवन उद्धरिले.

विठ्ठल हे श्रीकृष्णाचे बालरूप मानतात. त्यामुळे वारकरी संतकवींनी श्रीकृष्णाच्या बाललीला आवडीने वर्णिल्या आहेत. श्रीकृष्णाचे रूपसौंदर्य पाहाताना भक्ताच्या अंतः-करणात वात्सल्य, भक्ती, सात्त्विकता इ. भावनांचा उदय होऊन तो तदाकार होतो. 'असा कसा देवाचा देव बाई ठकडा' किंवा 'भिंगाचे भिंगुले खांद्यावर अंगुले ।' यांसारख्या नाथांच्या गौळणी यादृष्टीने अभ्यसनीय आहेत. 'त्रैलोक्याचा धनी तो हा यशोदेसी म्हणतो आई' याचे त्यांना कौतुक वाटते. 'सुंदर कृष्णमूर्ती म्हणजेच विठाई' ही त्यांची श्रद्धा आहे. श्रीकृष्णाच्या दिव्य तेजाने वेडावलेली आणि त्या तेजात विरून गेलेली नाथांची गौळण आलिंगनासाठी उतावीळ होते व क्षेम देताच तिचे मीपण नाहीसे होते. श्रीकृष्ण म्हणजे आदि नट-नाटक. त्याच्या अद्भुत नृत्याचे प्रत्ययकारी वर्णन नाथांनी एका गौळणीत केले आहे. त्या नृत्याचा वेग स्थिरचराला आला. त्या नृत्याचा नाद आणि ताल साऱ्या ब्रह्मांडाला व्यापून राहिला. त्या नाद नृत्याची धुंदी श्रोत्यांवरही राहावी अशी अपूर्व वर्णनपद्धती या गौळणीत आहे. विविध रूपात दिसणारा कृष्ण 'शोभतो कैसा' याचे कौतुक सर्वांना आहे. या चरणाच्या पुनरावृत्तीने कौतुक, सात्त्विक आनंद यांचा प्रत्यय येतो. कृष्णाचे पवाडे गाणाऱ्या गौळणी कृष्णरूपाने दशावतारांचे चिंतन करतात. अशा गौळणी शरीराने आणि वृत्तीने कृष्णमय होतात. त्यांना देह-गेह किंवा आप-पर यांची भावना राहात नाही. रांगणाऱ्या बाल-कृष्णाच्या कौतुकातील लाडिकपणा 'रांगणा रांगतु हळूच बिलंगतु । आनंद भरितु नंदराय' अशा तऱ्हेने शब्दाशब्दातून अवतरतो. कृष्णाचे दैवी स्वरूप व त्याचे लौकिक स्वरूप यातील भेद जाणवून भक्तास वाटलेले कौतुकयुक्त नवल 'ऐक ऐक सखये बाई...' सारख्या गौळणीत प्रकट होते. कृष्णाचे अलौकिक स्वरूप ध्यानी न घेता त्याला लौकिकार्थाने पाहाणाऱ्यांना नाथांनी उपदेश केला आहे.

एकनाथांच्या गौळणी अशा वैचारिक व रंजक अशा दोन स्तरांवर वावरताना दिसतात. नृत्य, नाटक, संगीत यांचा मिलाफ होऊन निर्माण होणारी Performing art येथे साकार झालेली दिसते. नृत्याचा नाद, नाट्याचा ताल आणि संगीताचा सूर यांची जोड त्यांना मिळालेली आहे. नाथांचे वैचारिक ग्रंथ किंवा अभंग यांना ग्रांथिक साहित्यरूप प्राप्त झाले आहे, तर गौळणीत तिला आविष्कारप्रधान कलेचे रूप मिळाले आहे. त्यामुळे ती अधिक रंजक आणि लोकप्रिय बनली.

" परमेश्वराचे सर्वभूती असणारे गुप्त स्वरूप आपण ओळखले पाहिजे. परब्रह्मज्ञान बाह्यचक्षूंनी होत नसून त्यासाठी अंतःचक्षू उघडे ठेवले पाहिजेत. " असे ते आवर्जून सांगतात. श्रीकृष्णाचे बाह्य रूपसौंदर्य लोभसवाणे असले तरी त्याच्या अंतरंगाशी एकरूप होण्याची आवश्यकता नाथांनी सांगितली आहे.

नाथांची विरहिणी म्हणजे ' नामविरहित ' जीव. त्याला संतसंग प्राप्त झाला म्हणजे नामस्मरणाच्या योगाने मन स्थिर होते व विरह संपतो. विरहावस्थेचे वर्णन करतानाही नाथांना संतसंगाचे माहात्म्य आवर्जून सांगावेसे वाटते. तोच ही अवस्था दूर करू शकेल अशी त्यांची श्रद्धा आहे. म्हणूनच त्यांची विरहिणी. ' मज भेटवा संतसंगती । तेणे निवारेल सर्व भ्रांती ' असे सांगते. संतसंगाने विरह निरसतो आणि पावन देह विदेह होतो अशी तिला प्रचीती येते. नाथांच्या विरहिणीचे चित्र हरिचरणी जडल्यामुळे त्याचा विरह केव्हाच नाहीसा झाला व तिला वारंवार आनंदाचा अनुभव येऊ लागला. ' विरह गेला सुख झाले आजी ' असे तिला वाटते. संतसंगतीने अवघी विश्रांती झाली व विरह-भ्रांतीही निरसली असा अनुभव तिला आला.– कृष्णरूपाने परात्पराची भेट झाल्यामुळे संसार–विरह संपल्याचा आनंद तिला होतो. नाथांच्या गौळणीत साधकाचे आर्त प्रत्ययास येत नाही. परमात्म्याच्या मीलनासाठी तळमळणाऱ्या जीवास त्याच्या प्राप्तीचा मार्ग सांगून ते जणू उपदेशकाचीच भूमिका घेतात.

' अवचित घडला संतसंग । विरहाचा झाला भंग ' अशा वर्णनाने रसभंग निश्चितच होतो.

आध्यात्मिक परिभाषेमुळे काव्याशय गुदमरतो. नाथांच्या काव्यातील वैचारिकता भाव-सौन्दर्याची हानी करते. कृष्णाच्या भेटीसाठी देवाला नवसे करणाऱ्या, गुरूला मार्ग पुसणाऱ्या नाथांच्या विरहिणीत वियोगातील उत्कट कारुण्य आढळत नाही. नाथांच्या सुखी–समाधानी प्रापंचिक जीवनाचा हा परिपाक असेल काय ?

नाथांच्या ' गौळणी 'चा मुखडा मात्र आकर्षक व गेय असतो.( ' दिव्य तेज झळकती रत्नकिळा फाकती, ' ' सुंदर बालका म्हणती गोपिका... ' ' कसा मला टाकुनी गेला राम...,' ' येई वो श्रीरंगा कान्हाबाई..., ' ' ऐक ऐक सखये बाई . , ' ' वारियाने कुंडल हाले.. ,' ' भिंगाचे भिंगुले...,' ' असा कसा देवाचा देव...' इ. इ. ) त्याच्या द्वारे आणि नाद–तालाच्या साहाय्याने मूळ विषयाच्या गाभ्याकडे श्रोत्याला नेणे सहज-शक्य होत असावे. आध्यात्मिक तत्त्वप्रसारासाठी एकनाथांनी लोकप्रिय अशा सर्व माध्यमांचा वापर केला. भारुडांच्या द्वारे समाजाच्या विविध थरांतील व्यक्तींचे अनेक-विध विशेष आध्यात्मिक रूपकांनून त्यांनी उभे केले. समाजाविषयीच्या आत्यंतिक कणवे-तून त्यांची ही काव्यरचना झाली. परंतु ती करताना त्यांची भूमिका नवनवे काव्योन्मेष दाखविणाऱ्या कवीची नसून तत्त्वचिंतकाची, तत्त्वप्रसारकाची होती. मग ते ' रुक्मिणी स्वयंवर ' असो. ' भारुडे ' असोत किंवा ' गौळणी ' असोत. रचनेच्या सौष्ठवाकडे त्यांचे फारसे लक्ष दिसत नाही. त्यामुळे ' गौळणी 'सारख्या भावमधुर काव्यप्रकाराची

रचनासुद्धा बरीचशी पसरट झालेली आहे. तीमधील सैल व दीर्घरचनेमुळे परिणामकारकता येत नाही. नाथांची ओवी साडेचार चरणी तशीच त्यांची गौळणही दीर्घचरणांची आहे.

'भारूडा' सारखीच तीही क्वचित रूपकात्मक, आध्यात्मिक परिभाषेत बोलणारी आहे. नाथांच्या दहा–अकरा हिंदी गौळणीही आहेत. त्यांचेही अंतरंग असेच आहे. त्या गौळणी प्राधान्याने कृष्णविषयक गाऱ्हाणी गाणाऱ्या आहेत. दाढी-वेणी बांधण्याची खोडी करणारा नाथांचा कृष्ण त्यांच्या हिंदी गौळणीतही अवतरला आहे. द्वैताची आंगी फेडून तो 'नंगी नार' बनतो. जनार्दन ज्याला भेटला तो त्याच्यापासून कधीही सुटत नाही,' असे नाथ सांगतात.

'मारी गावढी चुकलीसे भाई' अशी हिन्दी-मराठी संमिश्र रचनाही ते करतात. त्यांच्या या हिन्दी व मराठी गौळणी वाचीत असताना काशीच्या वास्तव्यात त्यांनी मीराबाई, सूरदासादिकांच्या गोपीगीतांचा अभ्यास केला असावा असे सतत वाटत राहाते. ज्ञानदेवांचे आध्यात्मिक गूढगुंजन, नामदेवांचा वत्सलभाव यांहून एकनाथांच्या गौळणींचा थोडा मिस्किल, खट्याळ शृंगारभाव थोडा वेगळा दिसतो याचे कारण उत्तरेतील गोपीगीतांचा त्यांचेवरील प्रभाव हेच होय.

## तुकारामांच्या गौळणी

तुकारामांच्या गौळणी त्यांच्या अभंगांचे सर्व विशेष घेऊन साकार झाल्या आहेत. तरीही त्यात थोडा भेद आहे. गौळणीतील काही प्रसंग दीर्घस्वरूपात सांगितले गेल्यामुळे अभंगातील साक्षेप आणि परिणामकारकता तिथे कमी झाली आहे. अभंगांतील उत्स्फूर्ततेचा अभावही–विरहिणीचे अभंग सोडून– जाणवतो. तुकारामांचे सारे जीवन संघर्षमय आहे. तो संघर्ष जसा प्रापंचिक जीवनात कुटुंबियांशी, समाजाशी आणि परिस्थितीशी होता, तसाच आध्यात्मिक जीवनात परमेश्वरप्राप्तीसाठी तळमळताना येणाऱ्या अडचणींशीही होता. 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग। अंतर्बाह्य जग आणि मन' अशी त्यांची अवस्था होती. तुकारामांच्या जीवनातील साधक, शंकित आणि सिद्ध या अवस्था त्यांच्या आध्यात्मिक वाटचालीतील संघर्ष दाखविणाऱ्या आहेत. तुकारामांचे मन अत्यंत संवेदनाक्षम होते.त्यामुळे त्यांच्या सामाजिक किंवा आध्यात्मिक जीवनातील प्रतिक्रियाही तितक्याच तीव्र स्वरूपात वेळोवेळी प्रकट झाल्या आहेत, तुकारामांना दंभाचा मुळातच तिटकारा आहे. त्यामुळे त्यांच्या प्रतिक्रिया अत्यंत प्रांजल आणि अंतर्मुख बनविणाऱ्या वाटतात. त्रिविध तापांनी पोळलेले तुकाराम परमेश्वराच्या दर्शनासाठी व्याकुळ झाले असताना 'नाही देव ऐसी आली प्रचीति–माझे लेखी देव मला' असे अतिरेकी उद्‌गार काढतात; परंतु साक्षात्कारानंतरच्या अवस्थेत आलेली अनुभूती 'अणुरणीया थोकडा, तुका आकाशाएवढा... तुका म्हणे आता उरलो उपकारापुरता' अशा शब्दांत मांडतात. तुकारामात आत एक, बाहेर एक असे काही नाही. 'अंतरीचे प्रकटे स्वभावे बाहेरी' असे त्यांनी स्वतःच सांगून ठेवले आहे. मात्र या अनुभूतीची अभिव्यक्ती करताना वापरावयाचे शब्द

त्यांच्यावरील परिस्थितीच्या संस्कारांचा परिपाक या स्वरूपात उतरले आहेत. अंतःस्फूर्ती ही त्यांच्या काव्यनिर्मितीमागील प्रेरणा आहे. शब्दाचे महत्त्व ते जाणत असले तरी ते त्यांनी साधनरूप मानले. मूळचा अनुभव इतका दाहक, उत्कट असे की, त्याची अभिव्यक्ती करताना ते शब्दांची गोळीबंद फेक करतात. त्यांचे सारे लेखन आत्मप्रत्ययाधिष्ठित, प्रचीतीचे बोलणे आहे. 'तुका म्हणे झरा। आहे मुळीचाच खरा' असे ते सांगतात. त्यांच्या काव्यातील विचारांचा प्रभाव सर्वांना जाणवतो; परंतु तुकाराम भावनांना पारखे होते असे नाही. त्यांच्या मृदु अंतःकरणाचा प्रत्यय त्यांच्या 'गौळणी' मध्ये उत्तम प्रकारे होतो. 'मऊ मेणाहुनी आम्ही विष्णुदास। कठीण वज्रास भेदू ऐसे' असे त्यांनी संतांचे केलेले वर्णन त्यांच्या काव्यप्रपंचालाही लागू होण्यासारखे आहे.

अन्य संतकवींप्रमाणेच तुकारामांनीही गोपी-कृष्णसंबंधावर गाऱ्हाणी, काला, विरहिणी अशी रचना केली आहे. तुकारामांच्या या 'गौळणी' सिद्धावस्थेस पोचलेल्या उन्मनी अवस्था भोगणाऱ्या आहेत. दृढ भक्तिभावाने हरीच्या साम्राज्याची ती सम्राज्ञी बनली आहे. हरीच्या प्राप्तीसाठी संतसंगाची कास धरावी म्हणजे विरहाचा भंग होतो, अशी विचारसरणी तिने मांडलेली नाही. हरीकृपा ही सामान्यांच्या आटोक्यातील गोष्ट नाही. त्यासाठी सर्वार्थाने उदास व्हावे लागते, संघर्षांशी सामना करावा लागतो, शेवटपर्यंत आत्यंतिक निष्ठेने राहावे लागते असे ती सांगते. भक्ताचा आणि देवाचा संबंध त्यांनी 'पतिव्रते जैसा भ्रतार प्रमाण। आम्हा नारायण तैशापरी' अशा शब्दांत सांगितला आहे. ती निष्ठा आणि ते प्रेम असेल तरच त्याची प्राप्ती होऊ शकते. द्विधा मनोवस्थेच्या प्रापंचिकांनी हा मार्ग चोखाळला तर त्यांच्या हाती काहीच लागणार नाही असे तुकारामांची अनुभवप्राप्त गौळण अधिकारवाणीने सांगते.

तुकारामांची गौळण आपल्या अनुभूतीचा आविष्कार विविध प्रकारांनी करते. 'श्रीकृष्णदर्शन झाले आणि नवस फळास आले.' असा दिवस मागुता येणार नाही असे तिला वाटते. या गौळणींना हा श्रीकृष्ण 'अवघ्या अवघा' कसा याचा नवलाव वाटतो व त्या एकमेकींशी वादावादी करतात. शुद्ध पराभक्तीने भारलेली आणि परोपचारी परंतु संसारात मनाने गोविंदाशी रत झालेली तुकारामांची गौळण देहभावाविषयी उदासीन आहे. गोविंदाची चट लागलेली आणि घट रिता करून पाण्याच्या मिषाने जाणारी गौळण कृष्णाशी वाद घालते. तिच्या गाऱ्हाण्यांत मुग्ध शृंगार आहे. श्रीकृष्णदर्शनाने तिची सारी चिंता हरपते. सुखाने ती निर्भर होते. तिचे येणे-जाणे खुंटते. विरहाने तळमळणाऱ्या गौळणीस शीतलोपचार नको आहेत. त्यांनी तिच्या जिवाला उबारा होतो.

'लवकरी आणा नंदाचिया कुमरा।' असे ती विनवते... सर्व अवस्थांतून जाता केवळ ते चरण उरले आणि त्यांच्या दर्शनाने तिला नवजीवन प्राप्त झाले. गोविंदाच्या दर्शनार्थ तळमळणाऱ्या गौळणीने आपल्या दोषांचा उच्चार करताच 'तुकयाचा स्वामी' तेथे प्रकट झाला. भेटीसाठी धावणारी, परंतु भेटीची वेळ टळल्याने तळमळणारी दुसरी एक गोपी संसारात गुरफटल्याने कृष्णदर्शनास पारखी झाली. सर्वत्र व्यापक असूनही अलिप्त

असणाऱ्या परमेश्वरास 'आम्हा भोगूनी म्हणे ब्रह्मचारी' असे राधा म्हणते. भक्त-परमेश्वर प्रेम जाणण्यास 'येथ भावचि कारण' आहे असे तुकारामांचे म्हणणे.

तुकारामांच्या गोपिका कामातुर नारी आहेत. हरीदर्शनासाठी त्यांचे चित्त विव्हळ होते. धुणी धुताना, दंतधावन करताना, वेणुगीत ऐकताना त्या तल्लीन होतात. श्रीरंग-रंगाने रंगलेल्या गोपीस त्याची भेट होताच मागिलाची तुटी झाली. मनोमनी ठाण मांडून बसलेला; जीवास जिवाहून आवडणारा, क्षणभरही वेगळा न होणारा अशा कृष्णाशी एकरूप झालेली गौळण म्हणते, 'जाले विश्वंभरा ऐसी' 'गोरस घ्या' म्हणण्याऐवजी 'हरी घ्या' म्हणणारी गौळण तुकारामांनी रंगविली आहे. नामदेवांच्या गौळणीची तिच्यावर छाप आहे. या प्रसंगातील नर्म विनोदामुळे तुकारामांना ती आवडली असावी. 'कान्हो एकली रे' म्हणणारी सर्वसंग परित्याग करून कृष्णाच्या शोधार्थ निघालेली विरहिणी; त्याच्या मीलनात येणारी विघ्ने म्हणजे तिला कान्ह्याने मांडलेली 'रळी'च वाटते. या पदास एका उत्तम नाट्यगीताचे स्वरूप प्राप्त झाले आहे. श्रीकृष्णाचा ध्यास व त्याचा मार्ग पत्करल्यानंतर आता माघार नाही अशी गोपीची निर्धाराची भाषा आहे. तिचे लोचन स्वरूपी ठाकले आहेत. तिला आता क्षणभरही वेगळे होणे आवडत नाही.

नारद भक्तिसूत्रातील कांताभक्तीचा आदर्श तुकारामांच्या गौळणींनी आपल्यापुढे ठेवला आहे. परमेश्वरास सर्वस्वार्पण करणे, त्याच्या वियोगाने विव्हळ होणे यातच त्यांना परमसुख प्राप्त होते. स्वाभाविकच कांताभक्तीत कांतारतीसही स्थान आले. देव-भक्तांच्या अशा रतिसुखाचे वर्णन तुकारामांनी कित्येक 'गौळणी'त केले आहे. स्वविस्मृत उत्कट आनंदाच्या क्षणाचे ते एक प्रतीक आहे. त्यातील गूढार्थ लक्षात न घेता लौकिकार्थाने त्यांकडे पाहिल्यास अश्लील शृंगारवर्णनाचा आरोप तुकारामांवर करता येण्यासारखा आहे. हा अर्थ ध्यानात न आल्यामुळेच. शाहिरांच्या गौळणींनी शृंगाराला अध्यात्माचे स्वरूप देताना तुकारामांच्या गौळणीतील अबोध, अवाच्य परब्रह्मसुखाची कल्पना रतिसुखाच्या कल्पनेने येण्यासारखी आहे. देवपिशा नारी हरीशी सर्वांगाने रत झाल्या आहेत. तुका-रामांच्या जीव-शिवाच्या मीलनाची कल्पना उभयतांच्या आलिंगन-रतिसंगातून प्रकट होते. त्यांना एवढेच महत्त्वाचे वाटते. 'तुका म्हणे शेवटा नेले। संपविले उभयतां' श्रीकृष्णाचा वेणुनाद कानी पडताच त्याच्या भेटीसाठी उतावीळ होणारी, त्याचेविना काही न आवडणारी, त्याचेसाठी घरची बोलणी खाणारी गौळण म्हणते, 'निवतील डोळे याचे श्रीमुख पाहता.' या महाभुताने गोपीस झडपले आहे, काही केल्याने सुटत नाही. आपली बाळे तिला आठवत नाहीत. आपपर सारखे वाटू लागतात. त्याची भेटी न झाल्याने ती संतापते. तेव्हा तुकाराम म्हणतात, 'तुका म्हणे दृष्टी। पाहा जवळी आहे तो.' गोपी कृष्णांची, जीव-शिवाची एकरुपता रतिसंगांतून मोजक्या शब्दात तुकारामांनी 'आलिंगन कंठाकंटी। पडे मिठी सर्वांगे' या गौळणीत दाखविली आहे.

परमेश्वराचे आर्त मनीमानसी निर्माण झाले तरी लौकिकाची चाड असणाऱ्यांना आपला हा भाव प्रकट करणे अवघड होते. अशांना उद्देशून तुकाराम म्हणतात,

' भोवती पसरलेला विक्राळ काळ तुम्ही ध्यानी घ्या. तुम्ही जर माझ्यासारख्या देवपिशा झालात तर जगाकडून तुमची निंदा होईल.' परमेश्वरविषयक भक्ती अंतःकरणपूर्वक करावी, त्याचे चरणी चित्ताचा लय करावा; परंतु त्यासाठी लौकिकाचार सोडलेच पाहिजेत असे नाही, असे तुकारामांना सुचवावयाचे असावे. प्रपंचाविषयी उदासीना (गोपी) वेगी येऊन श्रीकृष्णाच्या अंगाअंगी जडतात. भोवती हरी वेटाळतात. आणि मयूरफेरी नाचतात. मनास येईल तसे चाळे करतात, तशात हा एकटा सापडलेला. त्या निरंजनी एकरूप होऊन जातात. श्रीकृष्णाच्या मस्तकावरील मोरपंखी मुकुटच त्यांच्या नजरेसमोर फिरू लागतो. तुकारामांनी या उभयतांची उत्कट एकरूपता अत्यंत सूचकतेने मांडली आहे.

' मुख डोळा पाहे ' या गौळणीत एक नेटके कल्पनाचित्र तुकारामांनी उभे केले आहे. श्रीकृष्णाचे मुख डोळ्यांनी पाहताच ती (गोपी) तशीच खिळून राहिली. आरती न करता ती तशीच हाती धरून उभी राहिली. त्यांच्या मनात संकोचदाटणी झाली नाही. तुकाराम म्हणतात, ' परमेश्वराने (त्यांना) देहभावापासून ओस केले आहे.

' मुख पाहता लोचनी । सुख जाले वो साजणी ' अशी त्यांची अवस्था झाली. तुकारामांची देवपिशी विरहिणी, तिने आपला परमेश्वरविषयक भाव प्रकट होऊ दिला नव्हता; परंतु तिचा हा व्यभिचार कळून आल्यानंतर लोकांना ती नकोशी झाली. तेव्हा ती म्हणते, ' माझ्याविषयी तुम्ही काही लोभ धरू नये. कारण मी देवपिशी झाली आहे.' अनंताशी रत झालेल्या विरहिणीला लौकिक आचार-विचारांचे, नात्या-गोत्यांचे बंधन नको आहे; तिला त्याची जाणीव करून देण्याचा प्रयत्न कोणी केलाच, तर ते ऐकून घेण्याचीही तिची तयारी नाही. ती म्हणते, ' तुका म्हणे कानी, बहिरी झाले.' हरी हाच तिच्या चित्ताचे सर्वस्व झाला आहे. सासर-माहेर दोन्ही त्याच्या ठिकाणी एकरूप झाले आहे. ' दुजा ऐसा कोण बळी आहे आता ' असे म्हणणाऱ्या विरहिणीच्या ठिकाणी परमेश्वरप्राप्तीचा अभिमान आहे. ' सर्वांवरी सर्व सत्ता ' करण्याची तिची सिद्धता झाली आहे. कारण ' गोविंदासी प्रीतिकरू ' झाली आहे. अनंताशी एकरूपता प्राप्त झाल्याने मिळालेला एकांत, अंगसंग आणि पाठीपोटी दुजे कोणी नसल्याची जाणीव तिला झाली आहे. ' सर्व सुख आम्ही भोगू सर्वकाळ ' या गौळणीत तुकारामांनी, परपुरुषाशी व्यभिचार केल्याने होणाऱ्या गर्भधारणेची विल्हेवाट लावण्याच्या व्यावहारिक अनुभवसत्याची नोंद केली आहे. परमेश्वराशी मीलन म्हणजे सदैव एकरूपता, त्यातून गर्भसंभव नाही, म्हणजेच जन्म-मरणही नाही. परमेश्वरप्राप्तीमुळे ही विरहिणी सुखानंदात डुंबते. अन्य गोष्टींविषयी ती आता उदासीन आहे. नारायणाने आपल्याला जवळ करून आपली भाक सांभाळिली याचे मोठे समाधान तिला आहे. सायासाचे फळ प्राप्त झाले. तो काळ आणि ती वेळ आता सरली व नारायणा-आम्हा आता वेगळीक राहिली नाही, यामुळे ती तृप्त आहे. ती म्हणते, ' अवीट असे आत्मसुख प्राप्त करून घेण्याकरिता आम्ही

क्षणभर वाईट सोसिले. परंतु अनंताच्या पायी राहिल्याने आता आम्हांला ' येणे–जाणे उरले नाही. ' जन्म–मृत्यूच्या चक्रातून सुटून, मोक्षप्राप्ती होऊन, चिरंजीवपद मिळविण्यासाठी मनुष्यदेहातील त्रिविध ताप काही काळ सहन करावे लागतात. या जीवनातील सांडी-मांडी या सुखापेक्षा दुःखाच्याच अधिक असतात. ' हे सुख तेथे नाही. '

तुकारामांच्या विरहिणी आपला उत्कट भाव तितक्याच प्रभावी शब्दांत प्रकट करतात. तुकारामांच्या वैयक्तिक साक्षात्कारी जीवनातील अनुभवसत्य ' वाळो जन मज ' यासारख्या गौळणीत काव्यरूप धारण करते. परमेश्वरावरील दृढ श्रद्धा लौकिक प्रलापांचा विचार करीत नाही. सामान्यांच्या दृष्टीने महत्त्वाच्या जीविताची आसही उरत नाही. हरीशी एकरूपता पावल्यानंतर देहभावही संपतो. ' हरिरता ' या शब्दाने तुकाराम परमेश्वराच्या मीलनाची उत्कटावस्था सुचवितात. तुकारामांच्या अभंगात सर्वत्र प्रत्ययास येणारा फटकळपणा, परखडपणा ' आधिल्या भ्रतारे ' या गौळणीत प्रकट झाला आहे. एखाद्या निःसंग स्त्रीने लोकमर्यादा सोडून आपल्या कामभावनेचे शाब्दिक प्रदर्शन मांडावे तशी हिची स्थिती आहे. अनंताशी रत झालेल्या जीवास लौकिकाची पर्वा करण्याचे कारणच काय ? तुकाराम आपली निःसंगिता शब्दाशब्दांतून दाखवितात, नव्हे, शब्दावडंबरात गुरफटून सत्य झाकण्याची आवश्यकताच त्यांना वाटत नाही. ' बळियाचा अंगसंग ' झाल्यामुळे कोणतेही भय वा चिंता न बाळगणारी तुकारामाची ही दृढनिश्चयी विरहिणी आहे. ती आपले ईप्सित प्राप्त करून घेण्यासाठी घरभेदी होते, एवढेच नव्हे तर पट्टराणीपदाने सावळ्या परब्रह्माला ती वरते. अशा या पाच-सहा चरणांच्या विरहिणी किती मोठा आशय सांगून जातात. एकनाथांप्रमाणे परमेश्वरप्राप्तीसाठी संतसंगाचे महात्म्य त्या गात बसत नाहीत. परमेश्वरप्राप्तीसाठी, लौकिकाचाराचा विचार न करता, दृढश्रद्धेने प्रयत्न करण्याची तयारी असेल, तर त्याचे पट्टराणीपद काही दूर नाही ! प्रचीतीच्या पायावर उभी राहून प्रपंचातील मायामोह न सोडता संतांचे अनुकरण करणाऱ्यांना, ही विरहिणी सांगते– ' तुम्ही आमच्या नाचणी नाचू नका. मागिलाची आस असेल तोवर उदास होऊ नका. त्यामुळे निष्कारण फजिती होईल आणि ना पती ना गोविंद अशी तुमची अवस्था होईल ! ' अशा उपदेशातून मुमुक्षूंना चुचकारण्याऐवजी परखड सत्यच तुकाराम त्यांचेसमोर मांडताना दिसतात. लौकिक आणि पारलौकिक जीवनात क्षणोक्षणी झगडून तुकारामांना आपले पुढचे पाऊल रोवावे लागले. मृत्यूचे बंध त्यांनी झुगारून दिले होते. त्यामुळे आत्मसुखप्राप्ती करून घेणे त्यांना शक्य झाले. ' मरणाही आधी राहिलो मरोनी ' असे सांगणारी त्यांची ही विरहिणी त्यांच्या याच अनुभवांना बोलके करणारी आहे. ' भयाभीत नारी 'ची आणि विरहिणीची सरी (बरोबरी) होण्यासारखी नाही.

तुकारामांच्या गौळणी आपला भाव रेखीव, स्पष्ट आणि नेमक्या शब्दांत व्यक्त करतात. त्यांना अलंकारांचा किंवा आध्यात्मिक परिभाषेचा ओढा नाही. साधी प्रसादपूर्ण भाषा त्यांचे मनोगत वाचकांच्या अंतरंगापर्यंत पोचविते. गोपीवस्त्रहरणाची कथा

तुकारामांनी कथेच्या स्वरूपातच सांगितली आहे. आध्यात्मिक रूपकाचा अवलंब करून ती क्लिष्ट केली नाही. श्रीकृष्णाने गोपींची लाज राखली एवढेच सांगून तुकाराम ही कथा संपवितात. नेमक्या शब्दात वेधकपणे कथाकथन करण्याची तुकारामांची शैली त्यांच्या अन्य लेखनातही आढळते. प्रतिपाद्याची अभिव्यक्ती झाली की, तुकारामांचे शब्द थांबतात. शब्दांचा मितव्यय हा त्यांच्या लेखनाचा विशेष आहे. अकारण पाल्हाळ नाही. कल्पनाविलास किंवा अलंकरणाचा हव्यास नाही. गहनगूढ तत्त्वज्ञानाच्या मांडणीचा सोस नाही. त्यामुळे त्यांचे लेखन नेमके, नेटके, अर्थवाही झाले आहे. तुकारामांनी हिन्दी भाषेतही काही गौळणी लिहिल्या आहेत. त्यांची हिन्दी नाथांच्या पेक्षा अधिक प्रभावी वाटते. मराठीतील राकटपणाऐवजी कोमलता तशीच भावोत्कटताही तिथे अधिक आहे. हरिविरहाने तळमळणाऱ्या विरहिणीला ' क्या मेरे लाल कवन चुकी भाई ' अशी खंत तिला लागून राहिली आहे. ' बारहि डारूं उसपर तन ' अशीही तिची तयारी आहे. ' भलो नंदजीको डिकरो । लाज राखलीन हमारो ' असा त्याचे विषयीचा श्रद्धाभावही ती प्रकट करते.

### निळोबांच्या गौळणी :

ज्ञानोबा ते निळोबा असे संतकविपंचक वारकरी पंथीयात मान्यता पावलेले आहे. यात रामदासांचा समावेश अर्थातच नाही. निळोबा हे तुकारामांचे शिष्य. तुकारामांनी प्रत्यक्षात कोणालाच गुरूपदेश दिलेला नसला तरी त्यांना गुरू मानणाऱ्या शिष्यांना त्यांचा स्वप्नात दृष्टान्त झालेला होता. निळोबाही याच शिष्यपरंपरेतील. नगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यामधील पिंपळनेरचे राहणारे म्हणून पिंपळनेरकर या नावाने ते प्रसिद्ध आहेत. तुकारामांच्या जीवनाचा आणि काव्याचा विशेष प्रभाव निळोबांवर आहे. त्यांचे-विषयीची आत्यंतिक श्रद्धा निळोबांनी वेळोवेळी प्रकट केली आहे. त्यांनी रचिलेल्या कृष्णकथा आणि गौळणी विशेष प्रसिद्ध आणि गोड आहेत. तुकारामांविषयी निळोबा म्हणतात,

तयाचे पदी रंगले चित्त माझे ।
सुखा पावले सच्चिदानंद भोजे
म्हणोनी निळा चिंतनी तोचि चिंती ।
सखा सोयरा सद्गुरू तोचि अंती ॥

वारकरी संतांनी सांगितलेल्या प्रेममय भक्तीचा पुरस्कार निळोबांनी केला आहे. परमेश्वरीकृपेचा लाभ झाल्याने त्यांच्या काव्यात एक सात्विक समाधान पसरलेले आहे. शिवाय तुकारामांच्या प्रेमभक्तीचा आणि वाङ्मयाचा वारसा त्यांना अधिक प्रिय आहे. निळोबांच्या गौळणी विरहाने तळमळतात, कृष्णाचा अंगसंग त्यांनाही आवडतो, त्याही ' हरीरता ' आहेत; तथापि कोणताही वैषयिक भाव त्यांच्या वर्णनामुळे वाचकांच्या मनात उद्भवत नाही. नंदनंदनाच्या ठिकाणीच आपले अखेरचे येणे असल्याची तिची

श्रद्धा आहे. या अघोर संसाराला ती विटली आहे. आपण वाट चुकलो असल्याने रमानाथाची भेट घडवा अशी तिची व्याकुळ प्रार्थना आहे. सातत्याने त्याचाच निदिध्यास तिला लागून राहिला आहे. या तळमळीत कामाग्नीची पीडा नसून कारुण्यभाव आहे ज्ञानोत्तरभक्तीतून ती प्रकट झालेली आहे. या विरहभावनेत एक प्रकारचे प्रेमसुखच असते. अद्वैतज्ञान होऊनही द्वैतावस्थेत परमेश्वराच्या प्रेमतृष्णेचा अनुभव घेण्यातच त्यांना आनंद वाटत असतो.

निळोबांनीही कृष्णाच्या बाललीला, गोपींची गाऱ्हाणी, कृष्णाचे रूपसौंदर्य, त्याची मुरली या विषयांवर रचना केली आहे. काही ठिकाणी त्यांच्या लेखनात पंडिती थाट दिसतो. आख्यान काव्यरचनेचे सामर्थ्य त्यांच्या ठिकाणी असल्याचे जाणवते. तुकारामादि संतांच्या आत्मसाक्षात्काराधिष्ठित लेखनात जो आवेश व सामर्थ्य आढळते, तसे ते निळोबात आढळत नाही. गुरुकृपेचा अंश त्यांना जो लाभला तो त्यांनी विवरून सांगण्याचा प्रयत्न केला आहे असे जाणवते. त्यामुळे काही ठिकाणी वेधक वर्णन, अलंकरण आणि मधुर शब्दयोजना यांची किंचित जाणीवपूर्वक योजना त्यांनी केली आहे. अर्थात या सार्‍यांवर आत्मिक तृप्तीचा, सात्त्विकतेचा शिडकावा झालेला आहे.

निळोबांच्या गौळणीत कृष्णप्राप्तीचे समाधान, तृप्ती आढळते. सात्त्विक भावाने त्या श्रीकृष्णाच्या दैवी स्वरूपाचे गायन करतात. एकापरीने ते एक कृष्णस्तोत्रच असते. सर्वव्यापक परब्रह्म सांगाती म्हणून आपण जोडल्याची धन्यता त्यांना वाटते. कृष्णाच्या ठायी अनादि, सर्वव्यापक मायेचे मूळ कारण अशा परब्रह्माचा प्रत्यय गौळणींना येतो. त्याचे स्तवन त्या करतात. अजाणता त्याचेशी भांडण करून केलेल्या अपराधाची त्या क्षमा मागतात. ' शुकादिकांच्या हृदयी जे ध्यान आहे ते आपण विनासायास जोडले आहे. सहज पाचारिता तो धावून येतो. त्याला प्रेमाने आलिंगन दिले असता तन–मन निवते. प्रारब्ध, संचित, क्रियमाण ही सर्व त्याचे ठायी हरपून जातात.' अशा कृष्णाचे वर्णन त्या रूपसा बाळा वेळोवेळा करतात. त्याला कडेखांद्यावर घेतात आणि डोळे भरून त्याला पाहातात. निळोबांच्या अशा गौळणीत एक सात्त्विक तेज सर्वत्र भरून राहिल्याचा प्रत्यय येतो. त्यात असमाधान, त्रागा, जळजळ यांना स्थान नाही. श्रीकृष्णरूपी परब्रह्मामुळेच या सृष्टीतील स्थिरचरांना अस्तित्व कसे प्राप्त झाले आहे याचे वर्णन गोपी करतात. आपणा सर्वांना भोगूनही तो अलिप्त राहतो असे त्या एकमेकीस सांगतात. नामरूपातील परब्रह्म कृष्णरूपाने सगुण साकार झाले.

' गाऊ, वानू, ऐसा ' तो गौळणींना प्राप्त झाला. त्याचे सगुण सुंदर रूप पाहाण्यात त्या दंग होतात. त्याला खेळवतात. निळोबा म्हणतात, ' त्या गोपी फिरून संसारी येत नाहीत. ' त्यांना मोक्ष हा ठरलेलाच आहे. ' हरीच्या सहवासात आपण अंगसुख घेऊ. त्याला गाऊ, वानू, हासू. खेळू. त्याच्या समवेत एकत्र जेवण करू. ' या आनंदापुढे गौळणींना समाधीचे सुख तुच्छ वाटते. नित्यानित्याच्या खटपटीत किंवा तपाच्या बोभाट्यात त्या पडू इच्छित नाहीत. कारण एका हरीविण इतर सर्व गोष्टी फोलकट आहेत, याचे

ज्ञान त्यांना झाले आहे. गोपींचे हे नित्यनूतन प्रेम हरी पुरवितो.

श्रीकृष्णाचे सर्वव्यापक स्वरूप जलस्थलामध्ये भरून राहिलेले असताना त्याच्याशी निशिदिनी प्रमदा विनोद करतात. त्याचेशी हसतात, रुसतात. तो सर्वसाक्षी, अकर्ता आहे. त्याचेशी एकांतात हितगुज बोलतात, प्रापंचिक कामे करीत असतानाही त्यांची चित्तवृत्ती कृष्णाचे ठायीच जडलेली राहाते... त्याला आलिंगन दिल्याने संसाराची बोहरी होते असे त्या म्हणतात. अशा रीतीनें ' हरिरता ' झालेल्या गौळणी मुक्तीच्या माथ्यावर विराजमान होतात. संसारी असूनही त्या नित्यमुक्त होतात, असे निळोबा म्हणतात. तुकारामांचा ' हरिरता ' हा शब्द निळोबांनी आपल्या काव्यात आवडीने वापरला आहे. निळोबांनी चित्रित केलेली एका विरहिणीची तळमळ लक्षणीय आहे. तिला एक क्षणभरही सासर–माहेर कंठवत नाही. तिला घरीदारी गमत नाही. तिचे माणूसपण (देहभाव) आता नाहीसे झाले आहे. त्यावर केले जाणारे उपचार दारुण वाटतात. आपली आशा सोडा आणि मुक्त करा असे ती सांगते. देहगेहाविषयी ती उदासीन आहे. तिचे सर्व आशापाश तुटून गेले आहेत. निद्रा, जागृती किंवा स्वप्न या अवस्थात हरीचा निजध्यास तिला लागून राहिला आहे.' निळोबा म्हणतात, ' ज्या ठिकाणी स्वानुभव जागृत झाला आहे, तेथे अविद्येचे वारे कसे येईल ?' निळोबांच्या गौळणीत श्रीकृष्णाच्या परब्रह्मस्वरूपाचे वर्णन विस्ताराने आणि वारंवार येते. निळोबांच्या ठिकाणी कवित्वशक्ती चांगली आहे. सुघड शब्दरचना त्यांच्या काव्यात अवतरली आहे. शक्य तेथे आपला कल्पनाविलास ते प्रकट करतात, आणि मूळ विषय अधिक हृद्य बनवितात. मात्र त्यांचे हे सारे लेखन भक्तिभावाने भिजलेले आहे. देव हा भावाचा भुकेला असल्याची त्यांची श्रद्धा आहे. भक्ताने प्रेमभक्तीचे भोजन दिल्यानंतर परमेश्वर संतुष्ट होतो याचे बहारदार वर्णन त्यांनी एके ठिकाणी केले आहे. भावभक्तीच्या भोजनाने तृप्त झालेल्या विश्वंभराचे वर्णन करताना निळोबा म्हणतात, ' विरक्तीच्या ज्वाळांनी सर्व समृद्धी शिजविल्या, त्यामुळे आगळा रसास्वाद निर्माण झाला.' (असे किंचित रूपकात्मक वर्णनही ते करतात.) भक्तासाठी विश्वंभराने अभयकर उभारला. कंठीचा तुळसीहार काढून तो भक्तांच्या गळ्यात घातला आणि अशा रीतीने त्यांनी भक्तांचा वारंवार गौरव केला. आत्यंतिक भक्तिभावाचे परमेश्वराजवळील स्थान निळोबांनी असे उघड करून दाखविले आहे. त्यांच्या गौळणी या भावभक्तीच्या भोजनाने आणि परमेश्वरी कृपाप्रसादाने तृप्त झालेल्या आहेत.

### पंडिती काव्यातील गौळण :

ज्ञानेश्वरादि संतकवींनी रचिलेल्या ' गौळणी 'त उत्स्फूर्ततेचा, आत्माविष्काराचा भाग अधिक आहे. वामन पंडितादि कवींनी भागवतातील प्रकरणांवर आधारित कृष्णचरित्रावरील काव्यरचना केली आहे. सलग, दीर्घ आणि पांडित्यपूर्ण काव्यरचनेमध्ये सजविण्याचा भाग स्वाभाविकच येतो. ' गौळण ' या भावगीत सदृश काव्यरचनेचा विचार

करीत असताना पंडित कवींच्या या सलग, दीर्घ काव्यरचनेचा विचार करावयाचा नसून त्यांचा गोपी-कृष्ण किंवा राधा–कृष्णविषयक दृष्टिकोन फक्त येथे समजून घ्यावयाचा आहे. कृष्णचरित्रविषयक पंडिती काव्य वामनपंडितांनी विपुल रचिले आहे. नामसुधा, कृष्णजन्म, कृष्णभक्ती, बालक्रीडा, गोरसहरण, उखळबंधन, वनसुधा, हरिविलास, वेणुसुधा, कात्यायनी व्रत, रासक्रीडा, गोपीगीत, कंसवध, द्वारकाविजय, रुक्मिणी पत्रिका, रुक्मिणीविलास, मुकुंदविलास, राधाविलास, राधाभुजंग, भामाविलास, नौकाक्रीडा, जलक्रीडा, गोरसविक्रय अशा तऱ्हेची त्यांची आख्याने प्रसिद्ध आहे. नादमाधुर्य, ललित-कोमल पदावली आणि सुघडरचना यांमुळे त्यांचे काव्य लोकप्रिय झाले आहे. राधाविलास आणि राधाभुजंग या काव्यात त्यांनी अतिरिक्त शृंगार वर्णिला आहे. सामान्यांच्या मनावर त्यातील अध्यात्मापेक्षा शृंगार वर्णनाचाच परिणाम अधिक होण्याची शक्यता आहे. कृष्णचरित्रावरील अन्य आख्यानात मात्र वामनपंडितांचा भक्तिभाव उत्तम प्रकारे आविष्कृत झाला आहे. कृष्णाच्या बालक्रीडांचे वात्सल्यपूर्ण वर्णन मराठी माणसास अत्यंत आवडीचे, जिव्हाळ्याचे झाले आहे. गोपींची कृष्णविषयक श्रद्धा आणि त्यांचे आर्त पुरविण्यासाठी श्रीकृष्णाने केलेली कृपा यांचेही वर्णन वामनपंडित करतात. सामान्यांना आवडणाऱ्या शृंगारप्रसंगातून, रतिभावनेतून भक्तीचा आविष्कार करण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे; परंतु तो अस्थानी वाटतो... राधा–कृष्ण शृंगाराच्या वामन पंडितकृत वर्णनाचा शाहिरांनी आपल्या शृंगारपूर्ण लावण्या रचताना आधार घेतला असण्याची शक्यता आहे. वामन पंडितांच्या काव्यात उत्कट भक्तिभावातून निर्माण झालेल्या आत्माविष्कारापेक्षा काव्यदृष्ट्या रसपरिपोष साधण्यासाठी केलेल्या पंडिती प्रयत्नांची जाणीवच अधिक होत राहाते. संस्कृतप्रचुरता आणि आध्यात्मिक रूपकांमुळे निर्माण होणारी दुर्बोधताही त्यात खूप आहे.

श्रीधरपंडितांनी ‘ हरिविजय ’ ही कृष्णचरित्रावरीलग्रंथरचना केली आहे. राधा–कृष्ण संबंधांचे वर्णन आपल्या शैलीनुसार त्यांनी थोडक्यात केले आहे. तथापि बाल-कृष्णावर लुब्ध झालेल्या राधेने त्याला थोर होण्यास सांगून सुखशय्येवर परमानंद भोगल्याचे ते सांगतातच. तिच्या देहभावरहित तदाकार स्थितीचे वर्णनही त्यांनी केले आहे. रास-क्रीडेचे रमणीय वर्णन करीत असताना शृंगारचेष्टांचे वर्णन श्रीधरासही टाळता आलेले नाही.

‘ षण्मासाची करूनि राती । भोगिल्या गोकुळीच्या युवती ।
परी वीर्याशी नाही अधोगति । ऊर्ध्वरेता श्रीकृष्ण ’

असा खुलासा त्यांनी त्यावर केला आहे. कृष्णाच्या गोकुळातील खोड्यांचे वर्णन करताना श्रीधर पंडितही अश्लील, ग्राम्य वर्णने टाळू शकलेले नाहीत. हा बहुधा सम-कालीन वाङ्मयाभिरुचीचाही परिणाम असावा. ‘ गोकुळलीला ’, ‘राधाचंद्रोदय’, ‘ राधा-गर्भविमोचन ’, ‘ राधाविलास ’ अशी काही आख्यानेही श्रीधरांनी लिहिली आहेत. श्रीधरांचे भक्तहृदय त्यांनी वर्णिलेल्या कृष्णाच्या बाललीलांत प्रतिबिंबित झाले आहे.

मोरोपंत या पंडित कवींनीही श्रीकृष्णचरित्राचे गायन केले आहे. श्रीकृष्णाच्या मुरलीवादनाचे माहात्म्य त्यांनी सांगितले आहे. गोपींची कृष्णविषयक ओढ आणि श्रद्धा त्यांनी वर्णिली आहे. 'मुरलीनवरत्नमालिका', 'मुरलीपंचक', 'गोपी प्रेमोद्गार', 'गोपी-गोडवा' अशी स्फुट काव्ये त्यांनी या विषयांवर लिहिली आहेत. कृष्णचरित्रावरील त्यांचा 'कृष्णविजय' ग्रंथ प्रसिद्ध आहे. त्यात त्यांनी गोपी–कृष्ण संबंधावर 'रासक्रीडा'ही वर्णिली आहे. गोपी–विलाप आहे. केवळ कथाकथनावर त्यांची दृष्टी आहे. 'हरिवंश' हा त्यांचा ग्रंथही कृष्णचरित्रावरचाच. श्रीकृष्णाच्या बाललीला वर्णिताना वात्सल्यभावामुळे गोडवा आला आहे. रासक्रीडेचे वर्णन याही ग्रंथात त्यांनी केलेले असले तरी अतिरिक्त शृंगारवर्णन त्यांनी केलेले नाही. मूळ आधारग्रंथातील विषयापेक्षा अधिक भर त्यांनी टाकलेली दिसत नाही. 'मंत्र भागवत' हा त्यांचा ग्रंथही श्रीकृष्णचरित्रावरील आहे. 'रासक्रीडावर्णन' किंवा 'गोपीअक्रूर संवादासारख्या वर्णनात मोरोपंतांचा कल्पनाविलास, प्रासादिकता, कोटिक्रम, बुद्धिचातुर्य या सर्व लेखनगुणांचा प्रत्यय येतो. परंतु हे सर्व वस्तुनिष्ठ स्वरूपाचे असल्याने संतांच्या गौळणीतील जिव्हाळा तेथे जाणवत नाही. शिवाय 'आर्या' वृत्तात यमकानुप्रासयुक्त संस्कृतप्रचुर रचना मूळ कथेतील रसाविष्कारास अडथळा आणते.

## संत कवयित्रींची गौळण :

महानुभाव, वारकरी आणि समर्थ या महाराष्ट्रातील तिन्ही संप्रदायात वैशिष्ट्यपूर्ण काव्यरचना करणाऱ्या कवयित्री होऊन गेल्या. संतकवी किंवा कवयित्री यांनी आपल्या परमेश्वरविषयक भावना उत्कटतेने मांडल्या आहेत. त्यांना दैवी साक्षात्काराची जोड जेव्हा मिळते तेव्हा ते अधिकच प्रभावशाली बनते. स्त्रिया जात्याच भावनाशील असतात. त्यातूनही सामाजिक वा प्रापंचिक दृष्ट्या पोरक्या असणाऱ्या भावनोत्कट स्त्रियांच्या आत्माविष्काराला विशेष धार चढते. संतकवींनी देवाला प्रियकराच्या, पतीच्या स्थानी मानून त्याच्याशी जवळीक साधण्याचा प्रयत्न केला. स्त्रियांना आधार हा नेहमीच हवा असतो. त्यातून परमेश्वर हेच आलंबन जेव्हा ठरते तेव्हा त्यांच्यावरच भरीभार घालून राहणे त्या पसंत करतात. वैयक्तिक जीवन सर्वस्वी परमेश्वरार्पण करणाऱ्या महदाइसे-सारख्या कवयित्री असतात. त्यांच्या अंतःकरणातील व्यथा शब्दरूप घेऊन प्रगट होतात.

महदाइसा ही महानुभाव पंथातील स्त्री मराठीतील आद्य कवयित्री. तिची श्रीकृष्ण चरित्रावरील रचना 'धवळे', 'मातृकी रुक्मिणी स्वयंवर' इ. नावांनी प्रसिद्ध आहे. गौळणीसारखी स्फुट, आत्माविष्कारसुलभ रचना तिने केलेली नाही. तथापि रुक्मिणीची विरहावस्था, मीलनोत्सुकता याचे तिने सुरेख वर्णन केले आहे. शिवाय वैयक्तिक जीवन तर तिने सर्वस्वी गोविंद प्रभु आणि श्री चक्रधर यांच्या सेवेसाठीच वाहिलेले होते. चक्रधरांचे रूपसौंदर्य न्याहाळताना तिला श्रीकृष्णाची प्रचीती येत असे आणि ते काव्य-बद्ध करण्यात तिला विशेष आनंद वाटत असे. ज्ञानेश्वरांची बहीण मुक्ताबाई हिची

काव्यरचना गूढ अध्यात्म विचाराने भरलेली आहे. सिद्धावस्थेप्रत जाऊन पोचलेल्या स्त्रीची ती अधिकारसंपन्न वाणी आहे. गौळणीसारखी रचना तिने केलेली आढळत नाही. तिची समकालीन आणि संत नामदेवाच्या कौटुंबिक मेळाव्यातील संत जनाबाई हिचे काव्य मात्र विरहार्त भक्ताच्या उचंबळणाऱ्या भावनांनी भरलेले आहे. ती स्वतःला 'नामयाची दासी' म्हणविते. नामदेवालाही परमेश्वर आपल्याशी बोलतो, कीर्तनात नाचतो याचा भावप्रत्यय येत असे. जनाबाईचे तर हेच सर्वस्व होते. आपले सुखदुःखाचे गुज ती त्यालाच सांगे, तोही ते ऐकून घेई, तिच्या काबाडकष्टात सहभागी होई, बोलता बोलता त्याला झोपही लागे अशी तदाकारता तिने अनुभवली. आपला हा भावप्रत्यय तिने शब्दबद्ध केला आहे. तिच्या काव्यातील अलौकिकाचा अंश लक्षात न घेता प्रापंचिकांनी तिची हेटाळणी केली. तेव्हा लौकिकाची चाड न बाळगण्याचा तिने निर्धार केला. ती म्हणाली, 'डोईचा पदर आला खांद्यावरी। भरल्या बाजारी जाईन मी।' डोईवरचा पदर हा लोकमर्यादेसाठी होता, तो तिने झुगारून दिला आणि सर्वार्थाने ती परमेश्वराची बनली. या अनुभवाच्या आविष्कारासाठी तिने वापरलेली शब्दकळा जिवंत आणि तुकारामांच्या काव्यकुळीशी नाते सांगणारी आहे. कृष्णाचे बालरूप तिच्या अत्यंत आवडीचे. त्याच्या बाळलीला, त्याचा वेणुरव, कृष्णजन्माच्या वेळी उडालेली गौळणींची धांदल या साऱ्यांचे वर्णन तिने कौतुकाने केले आहे. त्याचे बालरूप वर्णिताना तिच्या शब्दात कोवळीक येते आणि मातृभावनेने वात्सल्यसुखाचा अनुभव ती घेत असावी असे वाटते. तिचा हा वात्सल्याचा लाडिकभाव 'माझे बछडे छकुडे ग' या 'गौळणी'त फार चांगल्या प्रकारे प्रकट झाला आहे. दुसऱ्या एका अभंगात 'माहेरीच्या मूळा लेकी आसावली' त्याप्रमाणे 'विठोबा मला मूळ धाडा, धावत येईन दुडदुडा' अशी ही अनाथ पोरकी पोर विठ्ठलाला आग्रह करते. तेव्हा तिच्या मनीचे आर्त अंतःकरणास भिडल्याखेरीज राहात नाही.

कान्होपात्रा ही तर दीनपतित कुळात जन्मास आलेली स्त्री. परंतु तिने आपल्या दृढ भावाने परमेश्वराला वश करून घेतले. सर्व सारांचे सार, सर्व साधनांचे निजसाधन, जीवांचे जीवन असा पांडुरंग त्या कान्होपात्रेचे निजधन झाला होता. जननांतरीचे सुकृत फळास आले आणि विठ्ठलचरण देखिले, म्हणून तिला मोठी धन्यता वाटते. आर्त, विरहिणी गौळणीचे जीवन कान्होपात्रा स्वतःच जगत होती.

तुकारामास गुरुस्थानी मानणारी आणि त्याच्या भेटीची उत्कट आस बाळगणारी प्रसिद्ध कवयित्री म्हणजे बहिणाबाई तिचे सारे चरित्रच विलक्षण घटनांनी भरलेले आहे. परमेश्वराचा प्रारंभापासूनचा ओढा तिच्या जीवनातील विलक्षण प्रसंगांनी अधिकाधिक दृढ होत गेला. हरिभक्तीसाठी पतिव्रता पतिवियोगाने जशी तडफडते तशी तळमळ असावी लागते, असे ती सांगते. या तळमळीनेच तिने साक्षात्कार मिळविला. कृष्ण-चरित्रावरही तिने काही रचना केली आहे. श्रीकृष्णाचा सहवास लाभलेल्या व्यक्ती, स्थळे धन्य होत असे तिला वाटते. नामदेव-तुकारामांप्रमाणे तिनेही 'गोरस' घ्या ऐवजी

'हरी घ्या' म्हणणाऱ्या गौळणीचे चित्र रंगविले आहे. एका 'गौळणी'त तिने श्रीकृष्णाची स्तुतिगर्भ निंदा केली आहे. त्यापोटी तिचे कृष्णकौतुक सामावले आहे. कृष्ण-गोपी संदर्भात तिने एक आध्यात्मिक रूपक रचले असून कृष्णाच्या अवतारात व्यभिचार स्वप्नातही नाही असे स्पष्टपणे सांगून टाकले आहे. एकनाथ–तुकारामाप्रमाणे बहिणा-बाईनेही हिन्दी पदरचना केली असून तीत कृष्णरूपसौंदर्याचे वर्णन केले आहे. तिची हिन्दी रचना सफाईदार आहे. बहिणाबाईने क्वचित कोठे आध्यात्मिक रूपकाचा आश्रय केला असला तरी तो अपवादात्मक असून आपल्या भावभावना या कवयित्रींनी प्रांजलपणे मांडल्या आहेत. त्यात त्यांच्या सात्विक प्रवृत्तीचेच दर्शन घडते. गोपी–कृष्ण संदर्भातील शृंगारचेष्टांचा स्पर्शही त्यांच्या काव्यास झालेला नाही. स्त्री-सुलभ विनयाच्या मर्यादा त्यांच्या काव्यासही पडलेल्या आहेत.

## शाहीर कवींची गौळण :

ज्यांच्या रचनांनी गौळण हा विषय मराठी रसिकांच्या अधिक परिचयाचा झाला त्या शाहीर कवींच्या गौळणविषयक रचना त्यांच्या अन्य रचनांत संख्यात्मकदृष्ट्या फारच थोड्या आहेत. गौळणीचे तमाशातील नाट्यरूप काव्यगत आशयाला वेगळीच उभारी व खुमारी आणते. त्यामुळे संतकवींचा आराध्यविषय असलेला श्रीकृष्ण शाहिरी काव्यात व फडात लोकरंजनाचे साधन म्हणून वापरला गेला आहे. सगनभाऊ या शाहिराच्या लावण्यात लौकिक शृंगाराचा भाग अधिक आहे. त्याने गौळणी रचिलेल्या नाहीत. अनंतफंदीने 'चंद्रावळी' आख्यान लिहिले असले तरी 'गौळणी' रचिल्या नाहीत.

शाहीर परशराम राधा–कृष्णाचा एकांत व अनया व राधेची सासू यांच्या संदर्भात लावणी लिहितो. ती शके १७१२ त मथुरेस असताना लिहिली आहे. तीत अध्यात्मा-पेक्षा लौकिक शृंगारभाव अधिक आहे. मथुरेच्या बाजारास जाणाऱ्या गौळणींना अड-विणारा कृष्ण व त्याला गौळणींनी दिलेले उत्तर हा तमाशातील 'गण–गवळणी'पैकी एक, परंतु पद्यमय भाग आहे. शाहीर प्रभाकराची एक कृष्णाची भूपाळी आहे. परंतु या भूपाळी रचनेचेही एक तंत्र (होनाजी बाळा, परशराम इ.चेही) ठरून गेलेले दिसते. त्यात सांकेतिकता बरीच आहे. 'कृष्णाची दृष्ट' या पदात 'बाल'कृष्णा-विषयीची यशोदेची चिंता ही कोणत्याही मातेचे प्रतिनिधित्व करणारी आहे. प्रभाकराची 'मुरली' गोपींची कृष्णविषयक आसक्ती, ओढ यांचा आविष्कार करते. त्यात कृष्णाच्या पराक्रमाचे संकीर्तन आहे. संस्कृतप्रचुरतेमुळे त्या वर्णनात उदात्तता व गांभीर्यही आले आहे. प्रभाकराची दुसरी एक 'मुरली' गौळणीची संभ्रमावस्था यथार्थ उभी करते. रामजोशीच्या गौळणी प्रभाकराच्या तुलनेने अनागर आहेत. वृत्तीने, कृतीने व वाणीनेही! काव्यदृष्ट्या प्रभाकराची गौळण सुखद तर रामजोशीची 'गौळण' गावढ्यातील अनागर स्त्रीची शब्दयोजना करणारी म्हणून कष्टद वाटते.

रामजोशीच्या शृंगारपूर्ण व आध्यात्मिक, उपदेशपर लावण्यात संस्कृतप्रचुरता व

प्रौढता जाणवत असली तरी गौळणीमध्ये मात्र बरीचशी ग्राम्यता अवतरलेली आहे. कृष्णाच्या स्त्रैणतेवर त्यात हल्ला आहे. त्याच्या अवतारी, पारलौकिक दर्शनापेक्षा लौकिक, उनाड व स्त्रियांची छेड काढणारा गावगुंडच त्याने उभा केला आहे. तो या गोपींचे कुच-मर्दन करणारा, कंचुकीच्या गाठी तोडणारा एवढेच नव्हे तर तिला गल्लीत गाठून कुरापत काढणारा आहे. हा कृष्ण म्हणजे एखादा माजलेला गावच्या पाटलाचा पोर असावा, असे चित्र त्याने उभे केले आहे. ते फारसे सुखावह नाही.

रामजोशीच्या काही गौळणी अशाही आहेत की, ज्यांत त्याच्या व्युत्पन्न प्रतिभेचे प्रसन्न दर्शन घडते. कृष्णाची रासक्रीडा किंवा छेकापन्हुती ही त्यांची उदाहरणे आहेत. शब्दप्रभुत्वामुळे अनुप्रासाची अनावर हौसही त्याने ' कुंजात खेळतो कान्हा ' यासारख्या ' गौळणी 'त भागवून घेतली आहे.

अध्यात्मापेक्षा लौकिक शृंगारभावावर आधारित रामजोशीच्या ' गौळणी ' त्यातील राधा–कृष्णांच्या रूपाने समकालीन प्रेमिकांचे दर्शन घडवितात, गौळणींच्या मुखांतून प्रकट होणारा निषेधभाव कृतककोपातून निर्माण झालेला वाटत नाही, तर ती गाव-गुंडाची यथेच्छ निर्भर्त्सना वाटते. कृष्णाच्या रामजोशीवर्णित लीळा गोपिकांच्या रतिभाव-पूर्तीचे वर्णन करण्यात अधिक रमतात. ह्या गोपी सासुरवासिनी असून चौररतिकर्मास परिचित आहेत. त्याची आर्जवे करणाऱ्या गौळणी मदनाचे दान मागतात, संतकवीप्रमाणे रामजोशीच्या गौळणी यशोदेकडे जी गाऱ्हाणी सांगतात, ती दही, दूध, लोण्याची चोरी केल्याची नसून तरुण पोरींची छेड काढणाऱ्या कृष्णाबद्दलची आहेत. हा फरक लक्षात घेण्यासारखा आहे. अक्रूराने कृष्णास मथुरेस नेल्यानंतर त्याच्या विरहाने व्याकुळ झालेल्या गौळणी कंसाच्या नावाने बोटे मोडतात. त्याला शिव्या घालतात; परंतु त्यांची विरहार्तता मात्र प्रकट होत नाही. कृष्णाला उपदेश करणारी एक गौळण संस्कृत–मराठी दोन्ही भाषांत प्रश्नोत्तरे करते.

होनाजी बाळाच्या कृष्णावरील लावण्या संस्कृतप्रचुर दीर्घ स्वरूपाच्या आहेत. होनाजी बाळाच्या लावण्यातच राधा–कृष्णांचा प्रकट संवाद व स्पष्ट उल्लेख आढळतो. होनाजीच्या गौळणीत विविधता असून त्या गेय, सुमधुर व रागतालयुक्त असल्याने त्यांची गोडी अधिकच वाढलेली आहे. कृष्ण हे होनाजीचे आराध्य दैवत असल्याने कृष्णावरील लावण्यांचे प्रमाण अन्य शाहिरांहून त्याच्या काव्यात अधिक आहे. अर्थात त्यात सर्वत्रच गोपी–कृष्ण संबंध नसून रुक्मिणी-पत्रिका, कृष्ण–दान यांसारखी आख्यानेही आहेत. भूपाळ्या आहेत. कथात्मक स्वरूपाच्या लावण्या स्वाभाविकपणे दीर्घ स्वरूपाच्या आहेत. अन्य शाहिरांच्या वा संतांच्या गौळणी यशोदेकडे गाऱ्हाणी घेऊन जातात, तर होनाजीच्या काव्यात स्वतः यशोदा कृष्णाविषयी तक्रार करीत असून ती राधेला त्याला सांभाळावयास सांगते आहे. कृष्णाच्या खोड्यांचा उल्लेख होनाजीच्या काव्यात जरूर आहे. परंतु रामजोशीच्या काव्यातील ग्राम्यपणा त्यात आढळत नाही. त्याच्या कृष्ण-विषयक काही लावण्या हिंदी भाषेतही आहेत. त्यात चंद्रावळीच्या आख्यानाचाही

समावेश आहे. होनाजीच्या काव्यातील संस्कृतप्रचुरता व पौराणिक संदर्भ पाहता त्याचा संस्कृत साहित्याशी परिचय असावा असे वाटते. संस्कृत शब्दयोजनेमुळे त्याच्या काव्याला प्रौढता व डौलदारपणा प्राप्त झाला आहे. त्याच्या गौळणीतील गोपी–कृष्ण संबंध हे भक्त–भगवंताचेच असले, तरी त्यांतील गोपी सुरतानंदाने श्रमणाऱ्या तर कृष्ण त्यांच्या कंचुकी फाडणारा असा आहे. त्यामुळे लौकिक वा पारमार्थिक उच्च पातळीवरील निर्भेळ रसास्वाद त्याच्या काव्यात अनुभवता येत नाही. होनाजीने रचिलेली राधा–कृष्ण संवादात्मक लावणी म्हणजे रामजोशींच्या छेकापन्हुतीचाच एक आगळा आविष्कार आहे. त्यातील चमत्कृती रसिकजनांना सुखविणारी व मिस्किल हास्य निर्माण करणारी आहे. शाहीर कवींची आख्यान कविता हा एक वेगळ्याच चर्चेचा विषय आहे. तो आपल्या विचारात येत नाही. तथापि होनाजीच्या काव्यात अशी सामग्री बरीच सापडण्यासारखी आहे.

पठ्ठे बापूराव हा शाहिरी परंपरेतील या शतकातला अखेरचा प्रतिष्ठित कवी. त्याच्या काव्यातील गौळणींचे स्वरूप म्हणजे मराठी गौळणींचे अंतिम टोक. भक्तिभावापेक्षा काममूलक शृंगारभावाला ती अधिक महत्त्व देते. त्यांची गौळण ही अभिसारिकेचीच दुसरी प्रतिमा आहे. यातील राधा आणि गोपी ही नावे काढून सजण, साजणी असे शब्द वापरले तर मूळ काव्याशयात आणि त्याच्या रसवत्तेत फारसा फरक पडणार नाही. तमाशा या कलाप्रकारात साभिनय आविष्कारासाठी रचिलेली ही शृंगारगीते आहेत. कृष्णाच्या जीवनातील कात्यायनी व्रताचा प्रसंग, मुरली आणि मथुरेच्या बाजाराला जाणाऱ्या गवळणी हे या काव्याचे विषय आहेत. पठ्ठे बापूराव आशयापेक्षा रचनेला आणि गेयतेला अधिक महत्त्व देणारा कवी वाटतो. अंतःकरणाला स्पर्श करणाऱ्या भावनेपेक्षा तिचे हलके-फुलके स्वरूप दर्शविण्यावर त्याचा भर अधिक आहे. कृष्ण-जीवनातील चंद्रावळीचे आख्यान त्याने विस्ताराने वर्णिले आहे. हा त्याचा एक वगच आहे. सामान्य जनांत चोरट्या प्रेमाविषयी असणारे कुतुहल कृष्णासारख्या प्रतिष्ठित व्यक्तीच्या नावावर अशा काव्यातून खपविले गेले आहे. चंद्रावळीकडे राहीच्या रूपात जाणाऱ्या कृष्णाचा साज-शृंगार, प्रत्यक्ष मीलनाचा प्रसंग अत्यंत आकर्षकपणे पठ्ठे बापूरावांनी वर्णिला आहे. मूळचाच नाट्यपूर्ण प्रसंग, धावत्या गतीत, वेधक शब्दात रंगविला असल्यामुळे चंद्रावळीचा हा वग चटकदार झाला आहे.

पठ्ठे बापूरावांची गौळण मात्र अगदी अस्सल मराठमोळी आहे. तिची गाऱ्हाणी, तिचे सडेतोड जबाब, तिच्या जीवनातील प्रसंग अगदी तिचे म्हणूनच वेगळे वाटतात. राहीचे रूप घेऊन जाणारा वनमाळी मणिमंगळसूत्र, वज्रटीक, गळसरी, पुतळ्यांची माळ, ठुशी, चंद्रहार, मुद, राखडी, करंडफुले, बाळी बुगडी, मासपट्टा, शिंदेशाही तोडे, मासळ्या, हिऱ्याची नथ असे मऱ्हाटी अलंकार धारण करतो. त्यांचा हा कृष्ण म्हणजे कानडा देव आहे. श्रीकृष्ण शारंगधरास आपल्या मंदिरात नेणारी ही गौळण.

'चौऱ्यांशी तऱ्हेच्या चवी। चाल दावा एक एक नवी' असा त्याला आग्रह करते.

तिची खोड काढणाऱ्या कृष्णाला नंदाकडे ‘ फिर्याद ’ नेण्याची धमकी देते. यमुनेत स्नान करणाऱ्या गोपी म्हणतात, ‘धुणं धुवोनी आम्ही वाळवंटी । वालु घातले यमुनेच्या काठी । तुम्ही ना कळता कैसी केली चोरी.’ ही गौळण पैठणी नेसून तिचा घोळ सावरत चालते. हिरवा चुडा भरते. बिलवर घालते.

‘ मुरली आणि राधा ’ या गौळणीत मात्र संत आणि पंडित कवींच्या काव्याचे पडसाद लोकगीतांप्रमाणेच ऐकू येतात. विशेषतः एकनाथांच्या ‘ वारियाने कुंडल हाले ’ या गौळणीचा प्रभाव जाणवतो. उदा :

एक : राधा घुसळी डेरा रिता...

बापू : धार काढी पालथा घडा

किंवा एक : बैल दुभतो नंदा घरी

बापू : गाईखाली सोडा रेडा...पाजी लवकरी.

‘ चंद्रावळी आख्यान ’ हा नागेशादि पंडित कवींकडून शाहिरांकडे आलेला वारसा आहे. त्यात स्वेच्छाचारी, अवैध परदारासक्ती, कपटवेषधारण यांचा मसाला भरलेला असल्याने चटोर प्रेमाला चटावलेल्या चावटांना त्याची चव विशेष वाटावी यात नवल नाही. राधा-कृष्ण प्रेमातील उदात्त भक्तिभाव स्वेच्छाचाराच्या पातळीवर कसा येऊन पोचतो याचे हे आख्यान म्हणजे एक उत्कृष्ट उदाहरण आहे. सामाजिक अभिरुचीच्या अवनतीला समाजातील प्रतिष्ठित आणि तथाकथित पंडित कवींचाही हातभार लागावा हे दुर्दैव होय. तमाशा हा कलाप्रकार सामान्य जनानुरंजनाचा असल्यामुळे त्यांच्या पातळीवर जाऊन शृंगारकथा सांगताना कृष्ण-गोपी प्रेमाच्या कथा त्यासाठी खर्ची घातल्या जावयास नको होत्या; परंतु गोपी-कृष्ण किंवा राधा-कृष्ण प्रेमाच्या रूपाने आपला चोरटा, उथळ आणि रांगडा शृंगार व्यक्त होताना प्रेक्षकांना आनंद वाटत असावा.

## लोकगीतातील गौळण :

संत-शाहीरादि कवींनी रचिलेल्या गौळणींपेक्षा लोकगीतांतील गौळणींचे स्वरूप एकदम वेगळे वाटते. त्या मुख्यतः स्त्रियांनी रचलेल्या व स्त्रियांकडून म्हटल्या जाणाऱ्या असल्याने त्यात स्वाभाविकता आली आहे. अन्य गौळणींतील शृंगारभाव इथे अभावानेच आढळतो. कृष्णविषयक मातृभाव त्यांत अधिक आहे. कृष्णाच्या रूपात स्वतःचा लाडका पोर त्यांच्यासमोर उभा राहातो. त्यामुळे त्यांची गाऱ्हाणी, त्यांच्या ‘ का मज छळसी बाळ मुकुंदा ’सारख्या गौळणीतील तक्रारी यातून आपल्या लाडक्या मुलाचे कृतककोपाने कौतुक करणाऱ्या मातेचेच दर्शन घडते. माता-पुत्र प्रेमाची विविध रूपे या गौळणीत साकार झाली आहेत. खाण्यासाठी, खेळासाठी हट्ट करणारे तान्हे पोर आणि त्याची माता; खोड्या करणारा, दहीदूध खाणारा उनाड मुलगा व त्याची माता; रुसलेले बालक व त्याची समजावणी करणारी माता अशी वात्सल्ययुक्त दृश्ये या गौळणीत साकार होतात.

कृष्ण अशा प्रकारे साऱ्या बालकांचे प्रतीक बनून लोकजीवनात अढळ स्थान मिळवितो. कृष्णाचे दुसरे लोकप्रिय रूपही यात उमटले आहे. आपल्या मुरलीने धुंद बनवणारा, गोपीवस्त्रहरण करणारा, चंद्रावळीचे रूप घेऊन राधेशी रमणारा कृष्ण आणि त्याच्यावर अनुरक्त झालेल्या गौळणी यांचे भावपूर्ण संबंधही या लोकगीतांत रंगविण्यात आलेले आहेत. कृष्णाच्या खोड्या, त्याच्या विषयीची गौळणींची गाऱ्हाणी, त्याच्या मुरलीरसाने वेडावणाऱ्या गौळणी आणि त्याचे निरागस बालरूप या विषयांभोवती लोकमानस फिरताना दिसते. विविध प्रकारच्या घरकामांत गुंतलेल्या गवळणींना श्रीकृष्णाची मुरली आकर्षित करते. 'रुसीकेसी का मुरली वाजविसी' या गौळणीत दूध काढणारी, दही विरजणारी, ताक घुसळणारी, पाणी काढीत असलेली, डाळ निवडीत असणारी अशा गौळणींचे हृद्य चित्र रेखाटण्यात आले आहे. गौळणींच्या कडेवर बसून जाणारा बालकृष्ण त्यांनी देऊ केलेल्या मेव्याकडे पाहातही नाही. त्याला वाघाचा घोडा, सापाचा चाबूक, घारीचा पतंग, चांदोबाचा चेंडू आणि चांदण्यांच्या लाह्या हव्या असतात. खेळण्यासाठी चंद्राचा हट्ट धरणाऱ्या रामचंद्राच्या लोककथेचें स्मरण स्वाभाविकच येथे होते. स्त्रियांची तल्लख प्रतिभा अशा नावीन्यपूर्ण कल्पना प्रकट करून लोकगीतांत विलक्षण काव्यात्मता आणते.

'सांग तू मला हट्ट का आला' या गौळणीत हट्ट करणाऱ्या कृष्णाला अनेक पदार्थ देऊन समजावणाऱ्या गौळणीत मातांना आपलेच रूप दिसत असल्यास नवल नाही. 'सोड मला तू करू दे रे धंदा" अशा गौळणींतून सात्त्विकतेची प्रसन्न छटा भरून राहिलेली आढळते. मंथन करताना अडविणाऱ्या हरीची प्रार्थना करताना या गौळणीचे भक्तहृदयही प्रकट होते :

सोड रविचा हात हरि रे करू दे मंथन
जोडूनिया दोन्ही कर विनवितसे वारंवार
भक्ती व्हावी निरंतर, पुरविशी कामना ॥

चंद्रावळीसाठी विविध रूपे धारण करणाऱ्या श्रीकृष्णाचे लोकगीतांतील वर्णन भाषा आणि विषय या दृष्टीने बहारीचे आहे. हा गोविंद करनाटकी आहे हे विशेष :

चंद्रावळीसाठी कृष्ण मातुरी झाला चाटी
परोपरीची दिंड लुटी ॥

ज्ञानदेवादि संतांच्या अभंगांचा परिणामही लोकगीतांवर झालेला होता हे अशा लोकगीतांवरून विशेषत्वाने जाणवते. सात्त्विकता, निरागसता, वत्सलता यांनी सर्व गीते ओथंबलेली आहेत. लोकगीतांतून संतकवींच्या रचनांचे पडसाद कसे उमटतात, याची ही काही उदाहरणे पाहा :

हरी माझा काळा निळा
संगे गोपाळांचा मेळा (जनाबाई.)

त्येचा हातीचा वेनू
कुनी घ्या ग घ्या ग... (मध्वमुनीश्वर.)
हरी माझ्याच्या अंगी खोडी
चालतानी डोळे मोडी (एकनाथ.)

शाहिरी काव्यातील काही खास शब्दांचाही वापर श्रीकृष्णवर्णनात या अनामिक कवींनी केला आहे :

छबीदार दिसे ग फाकडा उभा ग टायी टायी
हरी मजशी बोलत नाही, करू गत काई ॥
अंध पुत्रांनी सभा गांजिली छळले द्रौपदीला
लगबगी लगबगी धावत गेलो आलिंगले तिजला
काजळ कुंकू तिचे लागले, मुख पुसी शेल्याला
माझ्या अंगी रुतले सांगू द्रौपदीचे काकण...

या संवादात अन्य गौळणींत न आढळणारा महाभारतातील कृष्ण-द्रौपदी संबंधाचा उल्लेख येतो हे विशेष होय.

शिमग्याचा सण कृष्णासमवेत खेळणाऱ्या एका लोकगीतात छपन्न गौळणी आहेत. त्यात समाजाच्या ब्राह्मण, कासार, सोनार, रामोशी, माळी, धनगर, वाणी, पिंजारी, झारेकरी, सुतकरी, फकीर, वंजारी, गुरव, तांबोळी, परीट, कोष्टी, जिनगर, कोळी, लोहार कुंभार इ. सर्व थरातील स्त्रिया आहेत.

अशाच तऱ्हेची पठ्ठे बापुरावांची एक लावणी म. ना. सहस्रबुद्धे यांनी आपल्या ‘ मराठी शाहिरी वाङ्मय ’ या ग्रंथातील एका परिशिष्टात दिली आहे. तमाशात कामे करणाऱ्या स्त्रियांची ती नावे आहेत असे त्यांनी म्हटले आहे ते योग्य वाटत नाही. श्रीकृष्णाची भक्ती जातधर्मनिरपेक्ष रीतीने करणाऱ्या गौळणी “ सोडूनि आपला घरधंदा गीत गाती गोविंदा ” अशा तद्रूप झाल्या आहेत. नित्याच्या घरकामात गुंतलेल्या असताना श्रीकृष्णस्मरणात त्या रंगतात. त्यांचे श्रम जणू त्यामुळे हलके होतात. त्यांच्या मुखातून स्रवलेल्या गीतांत त्यांचा साधाभोळा भावच व्यक्त होतो. त्यांत आध्यात्मिकतेचे किंवा शृंगारभावाचे अवडंबर नाही. त्याच्या खोड्यांनी कातावलेल्या गौळणींना आता सासू मारील अशी भीती असली, तरी त्या खोड्याही त्यांना अंतर्यामी सुखविणाऱ्याच असतात. कृष्णावर लंपट झालेल्या स्त्रियांचे एका लोकगीतातील चित्र लौकिक आणि अलौकिकाच्या सीमारेषेवर उभे आहे. त्यातील एक स्त्री सोन्याच्या घंगाळात पाणी घेऊन नाहात असताना मुरलीच्या नादाने धावून येते, दुसरी आरसा–फणी घेऊन पाच पदरांची वेणी गुंफीत असताना नादावते, तर कुणा एकीच्या कडेवर तान्हे बाळही असते; परंतु एक गौळण मात्र कृष्णाला भाऊप्रीतीने विडे देते. ती ‘ चक्रसाळ ’च आहे. पण लोकगीतातील गौळणीची ही भगिनीप्रीत आपले वेगळेपण निश्चितच दाखविते.

चौथी गौळण मोठी चक्रसाळ
पिकल्या पानाचे बांधिती विडे
चाई पतरी साटा भरून
भाऊप्रीतीने देतीय विडे ॥ ४ ॥

या सर्व गौळणींत आढळणारा कृष्ण वृंदावन, गोकुळ, मथुरा या परिसरात वावरणारा आणि गोपजीवनाशी समरस झालेला असा आहे, हा यशोदा गवळणीचा श्रीकृष्ण ! द्वारकेचा राजा श्रीकृष्ण हा या गौळणींचा विषय नाही. महाभारतात साकार झालेला देवकी–वसुदेवांचा श्रीकृष्ण हा महाकवीच्या काव्याचा विषय आहे. श्रीकृष्णाचे बालपण आभीरांच्या समवेत व्यतीत झाले. तत्कालीन राजकीय परिस्थितीमुळे कृष्णाला असा अज्ञातवास सहन करावा लागला असावा; परंतु वयात आल्यानंतर त्याने आपले राज्य स्वकर्तृत्वाने संपादन केले. त्यानंतरच्या कृष्णाचे जीवन सर्वस्वी वेगळे, पूर्वजीवनाची एकदम उलटी बाजू दाखविणारे बनले. जीवनाची ही दोन्ही अंगे जगणारा, भोगणारा कृष्ण मात्र एकच होता... म्हणूनच तो पूर्णपुरुष !

डॉ. राममनोहर लोहिया ‘ कृष्णा ’वरील आपल्या एका लेखात म्हणतात, “ कृष्ण गिरिधर, तसाच मुरलीधर व चक्रधरही आहे...देव बनण्याचा सतत प्रयत्न करणारा माणूस म्हणजे त्रेतायुगातला राम होय आणि त्यामुळेच त्याच्यात आकाशस्थ देवाचा काहीसा अधिक अंश आहे. पण माणूस बनण्याचा सतत प्रयत्न करणारा देव म्हणजे द्वापारयुगातील कृष्ण होय. त्यात तो पूर्णपणे यशस्वी झाला. कृष्ण हा संपूर्ण आणि मुक्त माणूस आहे...कृष्ण केवळ क्षत्रिय राजा नव्हता, तर यादव ( गवळी ) शिरोमणीदेखील होता. क्वचित तो गवळी अधिक होता, क्षत्रिय कमी. म्हणूनच कृष्णकथेत राधागवळणीला अढळस्थान मिळाले. क्षत्राणी द्रौपदी तिला तेथून हटवी शकली नाही.” रास रचणारा कृष्ण आणि गीतेतला कृष्ण एकच असल्याचे डॉ. लोहिया यांचे मत आहे. श्रीकृष्णचरित्रात राधेचे जितके आणि जसे महत्त्व उत्तर भारतात आणि विशेषतः हिंदी काव्यात मानण्यात आले आहे, तसे महाराष्ट्रात मानण्यात आलेले नाही. अपवाद म्हणून एकनाथ किंवा होनाजी बाळा यांच्या काही गौळणी सांगता येतील. तथापि लोकगीतांतील गौळणीतून राधा–कृष्णांकडे पाहाणारे मराठी माणसाचे मन स्वच्छपणे प्रतिबिंबित झालेले आहे. त्यात राधेला फारसे स्थान नाही. सत्त्वगुणाची आणि दांपत्यप्रेमाची पूजा करणाऱ्या महाराष्ट्रीय मनाला राधेची राजस प्रीती मानवली नसावी. चैतन्य, गौरांगप्रभू, सूरदास, मीरा इ. च्या काव्यात राधा–कृष्णप्रेमाची वर्णने खूप मिळू शकतात. जयदेवाचे ‘ गीत गोविंद ’ तर त्याचा एक वेगळाच नमुना दाखविते; परंतु उत्तर भारतातील लोकजीवन आजही राधा–कृष्ण प्रेमाची गाणी मुक्तपणाने गाते. त्याच्याशी तदाकार होते. डॉ. लोहियांचा या संदर्भातील अनुभव खूपच बोलका आहे. ते म्हणतात, “ राधारसाची पूर्ण मजा तर व्रजभूमीत सापडते...राधेच्या नगरीत बरसानाजवळ एक रात्र राहून राधाराणीची गाणी मी ऐकली आहेत. कृष्ण फार लबाड होता. कधी शामा माळीण बनून

राधेकडे फुले विकायला जाई, तर राधा अजून सासरी जायला योग्य झाली नाही, असे सांगायला कधी पंडित बनून येई; कधी गाईचे दूध काढण्यासाठी गवळण बनून येत असे, तर कधी वृंदेची साडी नेसून येई. एकदा ' या ' वृंदेला राधेने मिठी मारली आणि संतापून दूर झाली. श्रीकृष्ण–मुरारीही स्वतःच हैराण झाला. त्याला राधेस समजवावे लागले, की वृंदेच्या डोळ्यांना डोळा भिडवू नको. ही राधा–कृष्ण प्रीतीची आगळीच खुमारी उत्तर भारतीयांच्या जानपद गीतात आढळते. मराठी लोकगीते मात्र वात्सल्य भावच जोपासताना दिसतात.

राधाकृष्णांची प्रीती ही अनामिक प्रीतीचे उच्चतम प्रतीक आहे. मानवी जीवनसंकेतापेक्षा वेगळ्या पातळीवर वावरणारी ही व्यक्तिमत्त्वे आहेत. वैवाहिक बंधनात जखडलेली असूनही शरीरप्रेमापेक्षा मनोमीलनात्मक प्रेमाच्या आकर्षणाने झपाटलेली राधा ही अनेकांच्या काव्याचा विषय बनली आहे. तिच्या भावजीवनातील लोकविलक्षण आणि अलौकिक पदर हळुवारपणे उलगडून दाखवणारी कै. नरहर कुरुंदकर यांची ' राधा ' ही मुक्त कविता तिच्या व्यक्तिमत्त्वाच्या आणि प्रेमबंधाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकते. राधा,

प्रेमसंकल्पनेचे अस्तित्व, आकार आधार राधा
कृष्ण अस्तित्वाचा संदर्भ बकळट करणारी राधा
पूर्णत्व आणि मुक्तीमधील दुवा राधा
देह, वासना, प्रतिष्ठा, सुरक्षिततेविना कृष्णाला जपणारी राधा
आनंदमय, मग्नस्पंदन राधा
शाश्वत, अशाश्वतामधील भान राधा
पत्नी आणि प्रेयसी या दोन्ही भूमिका पेलून
एकमेकात परावर्तित करणारी राधा
जे मिळवणे शक्य असते, पण मिळवायचे नसते
या दोन्हीमधील तडफड म्हणजे राधा
जे स्वतःचे नसते याची पूर्ण खात्री असूनसुद्धा
आपलं आहे असे समजणारी पण न स्वीकारणारी राधा
अस्वीकार्यता व अलोभी प्रेम यातील सूक्ष्म तोल म्हणजे राधा
सातत्याने मानवी वासनेशी संघर्ष करणारी
कामाला उदात्तता प्राप्त करून देणारी राधा
जीवनाच्या विविध पातळ्या, शक्यता, संभाव्यता, सूक्ष्मता, कर्तव्य
यांसह प्रेमात संवाद साधणारी राधा
साऱ्याच अशाश्वताचा मूलाधार राधा
जीवनाचा उत्कट, उच्च उदात्त प्रेमाचा, आध्यात्मिक अवस्थेचा
जीवनस्पर्शी विचार राधा

कृष्णावर प्रेम करून स्वतःला पूर्णत्व प्राप्त करून घेणारी राधा
लाघवी सौंदर्याचे विरक्त समर्पण राधा
प्रकृतीशी सुसंगत अशा सत्याच्या रूपातून ओसंडणारे लावण्य राधा
विलक्षण उत्कट, विलक्षण विरक्त
विरहातही आत्मिक मीलनातली सत्यावस्था मानणारी राधा
सुख-दुःख सहजपणे पचविणारी, अभिनिवेशाशिवाय जगणारी राधा
कृष्णाच्या मानसिक बौद्धिक पातळीवरचे स्थिरत्व राधा
विशुद्ध भावनेचा, तीव्र संवेदनेचा संस्कार राधा
जीवनाच्या प्रदर्शनापेक्षा ईश्वरसारखी दूरदर्शनात रमलेली राधा
क्षणाक्षणांच्या संवेदनेवरचे उत्कटत्व म्हणजे राधा
साऱ्याच संवेदना छिलून काढणाऱ्या राधेचे दुःख
खरचटलेल्या गुलाब पाकळीचे
कमलदलातील सूक्ष्म केसरासारख्या तिच्या संवेदना
जे सूक्ष्म तेच विशाल सर्वव्याप्त म्हणून
राधा अमूर्त आणि सर्वस्पर्शी
विरही परमेश्वराच्या क्षणसंवेदनेची खरचटलेली जखम राधा
जीवनातील अपरिहार्य घटनांची साक्षी राधा
चितेवर जळणारी
क्षणाक्षणाला संपत, उदास पोकळीत संपत जाणारी
व्यथेत तडफडणारी, गोंधळलेली राधा
पार्थिवातून निघून गेलेली राधा
कोसळण्यातसुद्धा भान ठेवणारी राधा
भान ठेवून कोसळणारी राधा
जीवनातील एखाद्याच विशुद्ध भावावस्थेवर जीवन उधळणारी
स्वतःचेच काळीज कापत जाणारी राधा
एकाच वेळी इंटेन्सिव्ह आणि डिटॅच होणारी राधा
राधेचे कारण राधा
कालप्रवाहाचे तडाखे आत्मसाक्षीने भोगणारी राधा
भीतीपोटीची प्रतिष्ठा धुडकावून लावणारी राधा
विदेही अवस्थेत पार्थिवाचे भान ठेवणारी
पार्थिवातही बेभान न होणारी राधा
दुःखाच्या प्रतिष्ठेत न अडकलेली राधा
अस्पर्शातला एक उत्कट स्पर्श

श्रीकृष्णाच्या आध्यात्मिक विश्रांतीचे स्थान राधा
दुःख गिळणारी तपस्विनी म्हणजे राधा
आघाताला जीवनसंघात मानणारी
आत्मिक अशाश्वताला संदर्भ प्राप्त करून देणारी
निसर्गक्रमाने सुकत जाण्याची जाण धरून फुलणारी
अस्तित्वाच्या प्रसन्नतेने आसमंत गंधित करणाऱ्या कृष्णाचे
कारणाशिवाय कारण असलेली राधा
स्मरणगंधातील नात्याच्या शुचित्वावर गस्त घालणारी राधा
काळाचा धूर पंचकालत्वात विलीन होताना
मनाची घालमेल शब्दशिल्पात गोठवणारी राधा
वेदनेच्या कळीकळीतून गंधित होणारी राधा
राधा सांजगहिरी, रंगबावरी
अशरीरी राधा, गंधवेडी राधा, सात्त्विक राधा
कस्तुरी अंतरावर उभी राहणारी, सुगंधाचे भान न हरपणारी
काळयाभोर डोळयांत चटकन् तळाशी जाणारी
पोहता येत असूनही तशीच राहणारी राधा
घनगंभीर आषाढ धारेसारखी
श्रावण सरीच्या चैतन्यासारखी राधा
स्वप्नांचा संथ प्रवाह सुगंधित करणारी
निरागस प्रेमाने पाण्यालाही गडद निळाई आणणारी
किनाऱ्यावरच्या झाडाला मोहरून सोडणारी राधा
पार्थिवाच्या ऐलतीरावर जगणारी
पण अपार्थिवाच्या पैलतीरावरच्या बासरीत हरवून गेलेली राधा
मावळतीच्या सूर्यसाक्षीने जीवनाचा रूपरसगंध
कडूगोड अनुभवाने भरलेला सुंदर नक्षीचा डौलदार घट डोईवर घेऊन
एकदाही मागे वळून न बघता
नजाकतीने ऐटीने पैलतीरी जाणारी राधा
घट हिंदोळताना रंग त्याच्या अंगावर उडणार नाही
याचे भान असलेली राधा
आपण त्याच्या मागे येत आहोत
हे त्याला कळू नये म्हणून
घुंगराचा आवाज न करता हळुवार पावले टाकणारी
चेहऱ्यातील भावभावना गळून पडू नये म्हणून
घुंघटात चेहरा लपविणारी राधा

आषाढी घनकुंतलात आकाशसूर्य शृंगारणारी राधा,
काळाच्या वाळूवर पाऊल टाकताना ठसा उमटू न देणारी
हलकेच बासरीच्या अनाहत नादात संपणारी राधा
ऐलतीरावर निरोपासाठी उभ्या असलेल्या
हजारो संवेदनांची पाठ न वळवताच
दखल घेणारी राधा.
किती चालणार आहेस राधे ?
आसमंतात वेदनेच्या कळा प्रसवणाऱ्या राधे !
तुझे डोळे स्मशानराखेचे ठसे आहेत राधे
ते जीवनाच्या तळव्यात रुतले आहेत
हे तू विसरशील का राधे ?
का हेच तुझे रूप आहे ?
जीवन सचेतनातल्या नचिकेताला
माझा प्रश्न तू विचार राधे !
विचारशील ना राधे ?
विचारशील ना ?*

काव्य २५९१ २५८६२ ११/३/८९

कृष्ण-राधा हे प्रेमभावनेचे चिरतरुण प्रतीक आहे. ते नित्यनूतन आहे. ज्ञानेश्वर–तुकारामादी संत, पंडितकवी आणि शाहीरकवी यांनी त्याकडे वेगवेगळया दृष्टिकोनातून पाहिले. अलौकिकाकडून लौकिकाकडे मराठी गौळणीची वाटचाल होत राहिलेली आहे. आधुनिक मराठी कवितेतही राधा–कृष्ण प्रतीकाचा उपयोग पु. शि. रेगे, ग. दि. माडगूळकर, मनमोहन, गो. नी. दांडेकर यांसारख्या कवींनी आपापल्या भावकवितांतून केलेला आहे. परंतु या प्रतिकाचे उदात्त आणि आगळे स्वरूप कै. कुरुंदकरांच्या ‘ राधा ’ या मुक्तकाव्यात किंवा कृष्णा गुरव यांच्या ‘ कुंजधून ’ या काव्यात उत्कटपणे चित्रित झालेले आहे. तमाशासारख्या कलाप्रकारातील ‘ गणगौळणी ’तील गोपी–कृष्णांचे संबंध मूळ रूप विकृत करून दाखवितात. त्यातील गोपी–कृष्ण ग्रामजीवनाशी अधिक निगडित आहेत. तशी ‘ गौळण ’ ही मुळात ग्रामजीवनसंबंधितच आहे. परंतु ग्रामजीवनातील चटोर प्रेमिकांचे शृंगारचाळे रंगवून श्रोतृजनांच्या भावना चाळविण्यापलीकडे अशा गौळणींतून अन्य हेतू दिसत नाही. भक्तिकाव्यातील राधिका ही भर्तृका साधिका आहे, तर तमाशादी कलाप्रकारातील राधिका ही प्रेषित आणि अभिसारिका आहे. राधा–कृष्णांतील तरल, अलवार, भावसंबंधांना येथे भडक रूप लाभते. ग्राम्यजीवन ग्राम्य भाषेत अभिव्यक्त होते. त्यामुळे त्याची पातळीही ग्राम्य राहते. राधा–कृष्ण किंवा गोपी-

* ‘ मी तू ’ कादंबरीचे लेखक प्रा. फ. म. शहाजिंदे यांच्या अनुमतीने साभार उद्धृत. संकलन प्रा. सौ. कमला ठकार.

कृष्ण प्रेमाचा आविष्कार करणारी 'मराठी गौळण' त्या एकाच विषयाभोवती फिरत राहिली असली, तरी तिची अनेकविध रूपे आजवरच्या कवींनी साकार केलेली आहेत. राधा हे अशा लोकविलक्षण प्रीतिभावनेचे प्रतीक असल्याने 'हे नित्यनूतन देखिजे। देवी जैसे का स्वरूप तुझे' असे ज्ञानदेवांच्या शब्दात तिचे वर्णन करता येईल. गौळणी-सारखे आकृतिबंध वाङ्मयात स्वतःचे रूप, आशय घेऊन अस्तित्वात येतात. त्यातील आशय चिरंतन स्वरूपाचा असल्याने काळाची मर्यादा त्यांना राहात नाही. गेल्या सुमारे आठ शतकांत मराठी गौळण अनेक रूपे घेऊन वेळोवेळी प्रकट होत राहिली आहे. भावी काळातही तिचे अस्तित्व नाकारता येणार नाही.

# उत्तरार्ध

( मराठीतील निवडक गौळणी )

## ज्ञानदेव

: १ :

तुजविण येकली रे कृष्णा न गमे राती ।
तव तुवां नवल केलें वेणू घेउनि हातीं ।
आलिये तेंचि सोय तुझी वोळखिलें गती ॥ १ ॥
वालभरे कैसें जोडलें जिवा ।
दुसरें दुरी ठेलें प्रीति केला रिघावा ॥ २ ॥
पारु रे पारु रे कान्हा झणे करिसी अव्हेरु ।
तूं तंव हृदयींचा होसी चैतन्य चोरु ।
बापरखुमादेवीवरा विठो करि कां अंगिकारू ॥ ३ ॥

: २ :

दुडिवरी दुडि साते निघाली ।
गौळणी गोरस म्हणों विसरली ॥ १ ॥
गोविंद घ्यावो दामोदर घ्यावो ।
तव तव बोलती मथुरेच्या वो ॥ २ ॥
गोविंद गोरसु एकचि नांवा ।
गोरसु विकूं आलें तुमच्या गांवा ॥ ३ ॥
बापरखुमादेविवर विठ्ठलेंसी भेटी ।
आपुले संवसाठी करूनि ठेला ॥ ४ ॥

: ३ :

सांवळिये बुंथी सांवळिया रूपें ।
सांवळिया स्वरूपें वेधियेलें ॥ १ ॥
काय करू गे माये सावळें न सोडी ।
इंद्रियां इंद्रिय जोडी एकतत्त्वें ॥ २ ॥

कैसें याचें तेज सांवळें अरुवार ।
कृष्णीं कृष्ण नीर सतेजपणें ॥ ३ ॥
ज्ञानदेव म्हणे निवृत्तीचे खुणे ।
सांवळेंची होणे यासी ध्यातां ॥ ४ ॥

: ४ :

कृष्णें वेधली विरहिणी बोले ।
चंद्रमा करितो उबारा गे माये ।
न लवा चंदनु न घाला खेंजणवारा ।
हरिविणें शून्य शेजारु गे माये ॥ १ ॥
माझें जिवींचें तुम्ही कां वो नेणा ।
माझा बळिया तो पंढरीराणा वो माये ॥ २ ॥
नंदनंदनु घडी घडी आणा ।
तयाविण न वचती प्राण वो माये ।
रखुमादेविवरु विठ्ठलु गोविंदु ।
अमृतपान गे माये ॥ ३ ॥

: ५ :

पैल निळाच्चिये वेळीं । आंगणीं उभी ठेलिये ।
येतिया जातिया पुसे । विठ्ठल केउता गे माये ॥ १ ॥
पायरऊ जाला संचारु नवल ।
वेधें विंदान लाविलें म्हणे विठ्ठल विठ्ठल ॥ २ ॥
नेणें तहानभूक । नाहीं लाज अभिमान ।
वेधिलें जनार्दनीं । देवकीनंदना लागोनी गे माये ॥ ३ ॥
बापरखुमादेविवरु जिवींचा जिवनु ।
माझे मनिंचे मनोरथ पुरवी कमळनयनु गे माये ॥ ४ ॥

: ६ :

सांवळी प्रतिमा घेऊनि सुकुमार ।
खेळत सुंदर गोकुळीं रया ॥ १ ॥

त्या रूपें वेधिलें काय करूं माये ।
अवघें निर्गुणचि होय पाचारीतां ॥ २ ॥
मीपणा ठाव नुरेचि पै सर्वथा ।
प्रपंचाची कथा ब्रह्म जाली ॥ ३ ॥
बापनिवृत्तिराजे दाविताती खूण ।
नाम नारायणा पाठ कीजे ॥ ४ ॥

: ७ :

पंढरपुरींचा निळा लावण्याचा पुतळा ।
विठो देखियेला डोळां बाईयेवो ॥ १ ॥
वेधलें वो मन तयाचिया गुणीं ।
क्षणभर विठ्ठल रुक्मिणी न विसंबे ॥ २ ॥
पौर्णिमेचें चांदिणें क्षणक्षणा होय उणें ।
तैसें माझें जिणें एक विठ्ठलेंविण ॥ ३ ॥
बापरखुमादेविवरु विठ्ठलचि पुरे ।
चित्तचैतन्य मुरे बाईये वो ॥ ४ ॥

: ८ :

पैल तो गे काऊ कोकताहे
शकून गे माये सांगतसे ॥ १ ॥
उडरे उडरे काऊ तुझे सोन्याने मढवीन पाऊ ।
पाहुणे पंढरीराऊ घरा कैं येती ॥ २ ॥
दहिभाताची उंडी लाविन तुझ्या तोंडी ।
जीवा पढिये त्याची गोडी सांग वेगीं ॥ ३ ॥
दुधें भरूनी वाटी लावीन तुझे वोंठी ।
सत्य सांगे गोडी, विठो येईल कायी ॥ ४ ॥
आंबया डाहाळीं फळें चुंबी रसाळीं ।
आजिचेरे काळीं शकून सांगे ॥ ५ ॥
ज्ञानदेव म्हणे जाणिजे ये खुणें
भेटती पंढरीराणे शकुन सांगे ॥ ६ ॥

: ९ :

घनु बाजे घुणघुणा । वारा वाजे रुणझुणा ।
भवतारक हा कान्हा । वेगीं भेटवा कां ॥ १ ॥
चांदवो चांदणें । चापेवो चंदनु ।
देवकीनंदनु । विण नावडे वो ॥ २ ॥
चंदनाची चोळी । माझें सर्व अंग पोळी ।
कान्हो वनमाळी । वेगीं भेटवा कां ॥ ३ ॥
सुमनाची सेज । सीतळ वो निकी ।
बोले आगिसारखी । वेगीं विझवा कां ॥ ४ ॥
तुम्ही गातसां सुस्वरें । ऐकोनि द्यावीं उत्तरें ।
कोकिळें वर्जावें तुम्ही बाइयांनो ॥ ५ ॥
दर्पणीं पाहातां । रूप न दिसे वो आपुलें ।
बापरखुमादेविवर विठ्ठलें । मज ऐसें केलें ॥ ६ ॥

: १० :

जीवाचिया जीवा प्रेमभावाचिया भावा ।
तुजवांचूनि केशवा अनु नावडे ॥ १ ॥
जीवें अनुसरलिये अझून कां नये ।
वेगीं आणा तो सये प्राण माझा ॥ २ ॥
सौभाग्यसुंदरु लावण्यसागरु ।
बापरखुमादेवीवरु श्री विठ्ठलु ॥ ३ ॥

: ११ :

अवचिता परिमळु झुळकला अळुमाळु ।
मी म्हणे गोपाळु आला गे माये ।
चांचरती चांचरती बाहेरी निघालें ।
ठकचि मी ठेलें काय करूं ॥ १ ॥
मज करा कां उपचारू, अधिक ताप भारु
सखिये सारंगधरु भेटवा कां ॥ धृ० ॥

तो सांवळा सुंदरु कासे पीतांबरु ।
लावण्य मनोहरु देखियेला ॥
भरलिया दृष्टि जंव जेळां न्याहाळी ।
तंव कोठें वनमाळी गेला गे माये ॥ २ ॥
बंधोनि ठेलें मन तंव जालें आनेआन
सोकोनि घेतले प्राण माझे गे माये ।
बापरखुमादेविवरु विट्ठल सुखाचा
तेणें काया मनेंवाचा वेधियेलें ॥ ३ ॥

: १२ :

ज्याचिये आवडीं संसार त्यजिला ।
तेणें कां अबोला धरिला गे माये ॥
पायां दिधली मिठी घातली जीवें गांठी ।
साऊमा नये जगजेठी उभा ठेला गे माये ॥ १ ॥
भेटवा वो त्यासी चरण झाडीन केशी ।
सगुणरूपासि मी वो भाळलिये ॥ २ ॥
क्षेमालागी जीउ उतावेळ माझा ।
उचलोनि चारी भुजा देईन क्षेम ।
कोण्या गुणें कां वो रुसला गोवळु
सुखाचा चावळु मजसी न करी गे माये ॥ ३ ॥
ऐसें अवस्थेचें पिसें लाविलेसें कैसें
चित्त नेलें आपणिया सरसें गे माये ॥
बापरखुमादेविवरें लावियेलें पिसें
करूनि ठेविलें आपणिया ऐसें गे माये ॥ ४ ॥

: १३ :

भेटिसी गेलीये तंव तीच जालिये
भुलली ठेलिये मज न कळे कांहीं ।
परतलिया दृष्टी जंव मागुता न्याहाळी
तंव काळी ना सावळी मूर्ति चोजवेना ॥ १ ॥

काय सांगो माये न कळे तयाची सोये
येणें मनाचे मोडूनि पाये वेधियेलें ॥ २ ॥
आंतु बाहेरी कैसी भरलेनि रंगें
क्षेम देऊं गेलें अंगें, तव तो जडूनि ठेला ।
वारिता नावरे काय सांगों माय
गोठी करूनि ठेला साठी जीविताेसी ॥ ३ ॥
आशेचिये ह्यावे तंव तो परतीचा धावे
निराशेसी पावे वेळु न लागतां
बापरखुमादेविवरु विठ्ठलीं उपावो ।
ज्ञानदेवा भावो निवृत्तिपायीं ॥ ४ ॥

## नामदेव

: १ :

परब्रह्म निष्काम तो हा गौळियां घरीं
वाक्या वाळे अंदु कृष्ण नवनीत चोरी ॥ १ ॥
म्हणती गौळणी हरीची पाउलें धरा
रांगत रांगत येतो हरी हा राजमंदिरा ॥ २ ॥
लपत छपत येतो हरी हा राजभुवनीं
नंदासी टाकूनि आपण बैसे सिंहासनी ॥ ३ ॥
सांपडला देव्हारीं यासी बांधी दाव्यांनीं ।
शंख चक्र गदा पद्म शारंगपाणी ॥ ४ ॥
बहुतां कष्टें बहुतां पुण्यें जोडिलें देवा
अनंत पवाडे तुमचे न कळती मावा ॥ ५ ॥
नामा म्हणे केशवा अहो जी तुम्ही दातारा
जन्मोजन्मीं द्यावी तुमची चरणसेवा ॥ ६ ॥

: २ :

यशोदे घराकडे चाल मला जेवू घाल ॥ धृ० ॥
साध्या गव्हाची पोळी लोटी ।
मला पुरणपोळी करून दे मोठी ।
नाही अडवीत गुळासाठी । मला जेवू घाल ॥ १ ॥
तूप लावून भाकर करी । वांगे भाजून भरीत करी
वर कांद्याची कोशिंबिरी । मला जेवू घाल ॥ २ ॥
आई ग खडिसाखरेचे खडे ।
लवकर मला करून दे वडे ।
बाळ स्फुंदस्फुंदोनी रडे । मला जेवू घाल ॥ ३ ॥
आई लहानच घे गे उंडा ।
लवकर भाजून दे मांडा ।
लांब गेल्या गाईंच्या झुंडा । मला जेवू घाल ॥ ४ ॥
आई मी खाईन शिळ घांटा ।
दह्याचा करून दे मट्ठा ।
नाही माझ्या अंगी ताठा । मला जेवू घाल ॥ ५ ॥
भाकर बरीच गोड झाली
भक्षुनी भूक हारपली ।
यशोदेनें कृपा केली । मला जेवू घाल ॥ ६ ॥
आई मी तुझा एकुलता एक
गाई राखितों नऊ लाख
गाई राखून झिजली नख । मला जेवू घाल ॥ ७ ॥
नामा विनवी केशवासी
गाई राखितो वनासी
जाऊन सांगा यशोदेशीं । मला जेवू घाल ॥ ६ ॥

: ३ :

मल्हार महूडें गगनीं दाटलें ।
विजु खळें गर्जिन्नले गे माय ॥ १ ॥

गोविंद पाहाया लौकरी ।
कैसे वरुषताहे मधू धारी गे माय ॥ २ ॥
आनंदें मयुरें नाचती आपैसे ।
प्रेमें नीळकंठ झाले ते कैसें ॥ ३ ॥
नामया स्वामी दृष्टी सोज्वळ ।
जीव लागला गोपाळ गे माय ॥ ४ ॥

: ४ :

ध्यान सांवळें गोकुळींचें । धांव पाव वेगीं हरी सावळियां ॥ धृ ॥
सांवळिसी आंगीं उटी । सावळी कस्तुरी लल्लाटीं ।
सांवळीसीं कांसे कसियेला कटीं । गोवळिया ॥ १ ॥
सावळीसीं तनु बरवीं । सांवळें वृन्दावन मिरवी ।
सांवळ्याशा तुळसी कानीं । मंजुरिया कोंवळीया ॥ २ ॥
सांवळीशी कंठी माळा । सांवळें हृदयीं पदक विशाळा ।
सांवळ्याशा गोपी केल्या भोंवळ्या । गोवळिया ॥ ३ ॥
सांवळीसी हातीं काठीं । सांवळासा कांबळा पाठीं ।
नामयाचा स्वामी गायी राखी । धवळ्या आणि पिवळ्या ॥ ४ ॥

: ५ :

रात्री काळी घागर काळी ।
यमुनाजळें ही काळी वो माय ॥ १ ॥
बुंथ काळी बिलवार काळीं ।
गळां मोतीं एकावळी काळी वो माय ॥ २ ॥
मी काळी कांचोळी काळी ।
कांस कांसिली ते काळी वो माय ॥ ३ ॥
विष्णुदास नाम्याची स्वामिणी काळी ।
कृष्णमूर्ति बहु काळी वो माय ॥ ४ ॥

: ६ :

हातीं घेऊनियां काठी । शिकविते श्रीपती ।

यमुनेची माती । खासी कां कां कां कां ॥ १ ॥
हरी तूं खोडी नको करुं । माझ्या बा बा बा बा ॥ धृ० ॥
धांऊनिया धरिला करीं । बैसविला मांडीवरी ।
मुख पसरोनि करी । आ आ आ आ ॥ २ ॥
विष्णुदास नामा म्हणे । मरोनियां जन्मा येणें ।
कृष्ण सनातन पाहुं । या या या या ॥ ३ ॥

: ७ :

गौळणी ठकविल्या । गौळणी ठकविल्या ।
एक एक संगतीनें । मराठी कानडीया ।
एक मुसलमानी । कोंकणी गुजरणी ।
अशा पांचीजणी गौळणी ठकविल्या ॥ धृ० ॥
गौळणी सुंदरी । गौळणी सुंदरी ।
गेल्या यमुनेतीरीं । वस्त्रें फेडुनिया स्नान करिती नारी ।
गोविंदानें वस्त्रें नेलीं कळंबावरी ।
स्नान करोनिया । त्या आल्या बाहेरी ॥ १ ॥
लडोबा गोविंदा । लडोबा गोविंदा ।
निरवाणी आज । आडचाल्लो पडचाल्लो शिर फोड्या न कोडो ।
मारी कन्हय्या । पानी खेळया न खेळो ॥ २ ॥
देखरे कन्हय्या देखरे कन्हय्या ।
मैं इज्जतकी बडी । कदम पकडुंगी । मैयां कूटोजुडी ।
मेरी चुनरी दे । मेरी दे दूलडी ॥ ३ ॥
देवकी नंदना । देवकी नंदना ।
तूं एक श्रीपती । उघडी हिंवाची । तुज विनवूं किती ।
पायां पडत्यें बा । मी येत्यें काकुळती ।
माझी साडी दे । घे नाकाचें मोतीं ॥ ४ ॥
पावगा दाताला । पावगा दाताला ।
तूं नंदाचा झिलो । माकां फडको दी ।
मी हिवानं मेलो । घे माझे कोयतो । देवा पायां पडलों ॥ ५ ॥

ज्यो रे माधवजी । ज्यो रे माधवजी ।
मे शरण थई । तनका काकैपी ।
बाप दयाळ तूंही । मारी साडी आपो । हातणी ले कंकणी ॥६॥
इतुकें ऐकोनी । इतुकें ऐकोनीं देव बोले हांसोनी ।
सूर्या दंडवत करा कर जोडोनी ।
नामा विनवितो । म्हणे शारंगपाणी ।
गौळ्या ऐक तूं । धन्य तुझी करणी ॥ ७ ॥

: ८ :

हरी तुझी ऐसी कैसी हे खोड ॥ धृ० ॥
घेऊनी चिमुटे मुसळी पळसी ।
गोपी तुज म्हणती हा दोडा ॥ १ ॥
सोडुनी वासरें गाईसी पाजिती ।
यांत तुज काय मिळती जोड ॥ २ ॥
आडवा होऊनी गोपी धरिसी ।
चुंबिता वदन मज म्हणिसी सोड ॥ ३ ॥
अशा ह्या चेष्टा नाम्यासी करिसी ।
हरी तुजी ऐसी कैसी हे खोड ॥ ४ ॥

: ९ :

मुक्ताफळ नथ नाकी । चरणीं ल्याली वर बांकी ।
पितांबरें अंग झांकी । कृष्णाई माझी ॥ १ ॥
खांद्यावरी कांबळी । पायघोळ लांबली ।
पांघरली धाबळी । कृष्णाई माझी ॥ २ ॥
गाई पाठीं लागली । पळतां नाही भागली ।
मायबहिण चांगली । कृष्णाई माझी ॥ ३ ॥
देहुडा पाऊली । उभी माझी माऊली ।
विश्रांतीची साऊली । कृष्णाई माझी ॥ ४ ॥
कर ठेवुनी कटावरी । उभी भीवरेचे तीरीं ।
नामयाची कैवारी । कृष्णाई माझी ॥ ५ ॥

## भानुदास

वृंदावनी वेणू कवणाचा माये वाजे ।
वेणूनादे गोवर्धनू गाजे ।
पुच्छु पसरुनि मयुरे विराजे ।
मज पाहतां भासती यादवराजे ॥ १ ॥
तृण चारा चरुं विसरली ।
गाई व्याघ्र एके ठायीं जालीं ।
पक्षी कुळें निवांत राहिलीं ।
वैरभाव समुळ विसरली ॥ २ ॥
यमुना जळ स्थिर स्थिर वाहे ।
रविमंडळ चालतां स्तब्ध होय ।
शेषकूर्म वराह चकित राहे ।
बाळा स्तन देऊं विसरली माय ॥ ३ ॥
ध्वनी मंजुळ मंजुळ उमटती ।
वांकीं रुणझुण रुणझुण वाजती ।
देव विमानीं बैसोनि स्तुती गाती ।
भानुदासा पावली प्रेम भक्ती ॥ ४ ॥

## एकनाथ

: १ :

गौळणी सांगतीं गाऱ्हाणीं । रात्रीं आला चक्रपाणी ।
खाऊनी दहीं दूध तूप लोणी । फोडिलीं अवघीं विरजणी ॥ १ ॥
हा गे बाई कोणासी आवरेना । यशोदे बाळ तुझा कान्हा ।
कोठवर सोसूं धिंगाणा ॥ धृ० ॥

दुसरी आली धांवत । यानें बाई काय केली मात ।
मुखाशी मुखचुंबन देत । गळ्यामधीं हात घालीत ।
धरूं जातां सांपडेना ॥ २ ॥
तिसरी आली धांऊनी । म्हणे गे बाई काय केली करणी ।
पतीची दाढी माझी वेणी । दोहींसी गांठ देऊनी ।
गांठ बाइ कोणा सुटेना ॥ ३ ॥
मिळोनि अवघ्या गौळणी । येती नंदाच्या अंगणीं ।
जातो आम्ही गोकुळ सोडोनी । आमुच्या सुना घेऊनी ।
हें बाई आम्हांसी पहावेना ॥ ४ ॥
ऐशीं ऐकतां गाऱ्हाणीं । यशोदेनयनीं आलें पाणी ।
कृष्णा खोड दे टाकुनी । एका जनार्दनी चरणीं ।
प्रेम तया आवरेना ॥ ५ ॥

: २ :

माझा कृष्ण देखिला काय । कोणी तरी सांगा गे ॥ धृ० ॥
हातीं घेऊनियां फूल । अंगणीं रांगत आलें मूल ।
होतें सारवित मी चूल । कैसी भूल पडियेली ॥ १ ॥
माथां शोभे पिंपळपान । मेघवर्ण ऐसा जाण ।
त्याला म्हणती श्रीभगवान । योगी ध्यान विश्रांती ॥ २ ॥
संगे घेऊनि गोपाळ । बाळ खेळे आळुमाळ ।
पायीं पोल्हारे झळाळ । गळां माळ वैजयंती ॥ ३ ॥
एका जनार्दनीं माय । घरोघरांप्रती जाय ।
कृष्णा जाणावें तें काय । कोणी सांगा गे ॥ ४ ॥

: ३ :

मथुरेसी गोरस विकूं जातां नितंबिनी ।
तयामाजीं देखिली राधिका गौळणी ।
जवळी जाऊनियां धरिली तिची वेणी ॥ १ ॥
सोडीं सोडीं कान्हा शारंगपाणी ।
माझीया संसारा घातिलें पाणी ।
नांव रूप माझें बुडविलें जनीं ॥ २ ॥

राधा म्हणे येथोनियां बहु चाट होसी ।
घरीं चोरी करूनिया वाटे आडविसी ।
ओढोनिया नेते आतां तुज मातेपाशी ॥ ३ ॥

धरिलीं पदरी राधा न सोडीच निरी ।
दान दे आमुचे म्हणे मुरारी ।
भोंवतालीं हांसती व्रज सुंदरी ॥ ४ ॥

भक्तीचियां पोटीं राधा समरस झाली ।
कृष्णरूप पाहूनियां देहभावा विसरली ।
एका जनार्दनीं राधाशेजे पहुडली ॥ ५ ॥

: ४ :

आल्या पांच गौळणी पांच रंगाचें शृंगार करुनी ॥ धृ० ॥

पहिली गौळण रंग सफेत । जशी चंद्राची ज्योत ।
गगनीं चांदणी लखलखित । ऐका तिची मात ।
मंथन करीत होती दारांत । धरुन कृष्णाचा हात ।
ऐशा आल्या पांच गौळणी ॥ १ ॥

दुसरी गौळण साळीभोळी । रंग हळदीहूनी पिवळी ।
पिवळा पितांबर नेसून आली । अंगीं बुट्टेदार चोळी ।
एक लहान तनु उमर कवळी ।
जशी चांफ्याची कळी । ऐशा आल्या पांच गौळणी ॥ २ ॥

तिसरी गौळण रंग काळा । नेसून चंद्रकळा ।
काळे काजळ लेऊन डोळा । रंग तिचा सांवळा ।
काळीं गरसोळी लेऊन गळां । आली राजस बाळा ।
ऐशा आल्या पांच गौळणी ॥ ३ ॥

चवथी गौळण रंग लाल । लाल लालही लाल ।
कपाळी कुंकुम चिरी लाल । भांगीं भरून गुलाल ।
मुखी विडा रंग लाल । जसें डाळिंबाचे फूल ।
ऐशा आल्या पांच गौळणी ॥ ४ ॥

पांचवी गौळण हिरवा रंग । अवघ्या झाल्या दंग ।
हिरव्या कांकणाचा पहा रंग । जसें आरशीत जडलें भिंग ।
फुगडी खेळतां कृष्णासंग । एकनाथ अभंग ।
ऐशा आल्या पांच गौळणी ॥ ५ ॥

: ५ :

दुडीवर दुडी गौळणी साते निघाली ।
गौळण गोरस म्हणों विसरली ॥ १ ॥
गोविंदु घ्या कोणी दामोदरु घ्या गे ।
तंव तंव हांसती मथुरेच्या गे ॥ २ ॥
दुडीया माझारीं कान्होबा झाला भारी ।
उचंबळे गोरस सांडे बाहेरी ॥ ३ ॥
एका जनार्दनीं सबलस गौळणी ।
ब्रह्मानंदु न समाये मनीं ॥ ४ ॥

: ६ :

ऐक ऐक सखये बाई नवल मी सांगू काई ।
त्रैलोक्याचा धनी तो हा यशोदेसी म्हणतो आई ॥ १ ॥
देवकीनें वाईला यशोदेनें पाळिला ।
पांडवांचा बंदीजन होऊनियां राहिला ॥ २ ॥
ब्रह्मांडाची सांठवण योगीयाचें निजधन ।
चोरी केली म्हणऊनी उखळासी बंधन ॥ ३ ॥
सकळ तीर्थें जया चरणीं सुलभ हा शूळपाणी ।
राधिकेसी म्हणे तुझी करीन वेणीफणी ॥ ४ ॥
शरण एका जनार्दनीं कैवल्याचा मोक्षदानीं ।
गाई गोप गोपीबाळा मेळवीलें आपुलेपणीं ॥ ५ ॥

: ७ :

भिंगाचें भिंगुलें खांद्यावर आंगुलें ।
नाचत तान्हुलें यशोदेचें ॥ १ ॥

येती गौळणी करीती बुझावणी ।
लागती चरणीं कान्होबाच्या ॥ २ ॥
गोविंद बाळिया वाजविती टाळिया ।
आमुचा कन्हया देवराज ॥ ३ ॥
कडदोरा बिंदली वाघनखें साजिरीं ।
नाचत श्रीहरी यशोदेचा ॥ ४ ॥
पायीं घागरीया वाक्या साजरीया ।
कानींच्या बाळया ढाळ देती ॥ ५ ॥
एका जनार्दनीं एकत्व शरण ।
जीवें निंबलोण उतरती ॥ ६ ॥

: ८ :

दिव्य तेज झळकती रत्नकीळा फांकती ।
अगणीत लावण्य तेज प्रभा दिसती गे माये ॥ १ ॥
कानडा वो सुंदर रुपडा गे ।
अंतरीं बाहेरीं पाहतां दिसे उघडा गे ॥ २ ॥
आलिंगनालागीं मन उताविळ होय ।
क्षेम देतां माझें मीपण जाय ॥ ३ ॥
मागें पुढें चहुंकडे उघडें पाही ।
पाहावयासी गेलें मजला ठक पडले बाई ॥ ४ ॥
बाहेरीं पाहूं जातां अंतरीं भासे ।
जे जें भासें तें तें येकींयेक समरसें ॥ ५ ॥
एका जनार्दनीं जिवीचा जिव्हाळा ।
एकपणें पाहतां न दिसे दृष्टीवेगळा ॥ ६ ॥

: ९ :

वारियानें कुंडल हाले ॥ डोळे मोडित राधा चाले ॥ धृ० ॥
राधेला पाहुनी भुलले हरी ॥ बैल दोहितो आपुले घरीं ॥ १ ॥
फणस गंभीर कर्दळी दाट ॥ हातीं घेऊनी सारंगपाट ॥ २ ॥

हरिला पाहुनी भुलली चित्ता ॥ मंदिरीं घुसळी डेरा रिता ॥ ३ ॥
मन मिळालेसें मना ॥ एका भुललें जनार्दना ॥ वारियानें० ॥ ४ ॥

: १० :

असा कसा देवाचा देव बाई ठकडा ।
देव एका पायानें लंगडा ॥ धृ० ॥
गवळ्याच्या घरीं जातो । दहीं दूध चोरुनी खातो ।
करी दुधाचा रबडा ॥ १ ॥
शिंकेंची तोडितो । मडकेंची फोडितो ।
पाडी नवनीताचा सडा ॥ २ ॥
वाळवंटी जातो । कीर्तन करितो ।
घेतो साधुसंतांशीं झगडा ॥ ३ ॥
एका जनार्दनीं । भिक्षा वाढा बाई ।
देव एकनाथाचा बछडा ॥ ४ ॥

## तुकाराम

: १ :

नका कांहीं उपचार माझ्या शरीरा ।
करूं न साहावे मज बहु होतो उबारा ।
मनोजन्य व्यथा वेध जाला अंतरा ।
लवकरी आणा नंदाचिया कुमरा ॥ १ ॥
सखिया वेशिया तुह्मी प्राणवल्लभा ।
निवेदिला भाव आर्तभूत या लोभा ।
उमटली अंगी वो सांवळी प्रभा ।
साच हे अवस्था कळे मज माझ्या क्षोभा ॥ २ ॥

नये कळों नेदावी हे दुजियासी मात ।
घडावा तयासी उत्कंठा एकांत ।
एकाएकीं साक्षी येथें आपुलें चित्त ।
कोण्या काळें होइल नेणों भाग्य उदित ।। ३ ।।
स्वाद शीण देहभान निद्रा खंडन ।
पहिले तटस्थ उन्मीलित लोचन ।
अवघें वोसाऊन उरले ते चरण ।
तुका म्हणे दर्शनापें आलें जीवन ।। ४ ।।

: २ :

पडिली भुली धांवतें सैराट ।
छंद गोविंदाचा चोजवितें वाट ।
मागें सांडोनी सकळ बोभाट ।
वंदीं पदांबुजें ठेऊनी ललाट वो ।। १ ।।
कोणी सांगा या गोविंदाची शुद्धि ।
होता वहिला लपाळा आतां खांदीं ।
कोठें आड आली हे देहबुद्धि ।
धांवा आळवा करुणा कृपानिधि वो ।। २ ।।
मागें बहुतांचा अंतरला संग ।
मुळें जयाचिया तेणें केला त्याग ।
पहिलें पहातां तें हरपलें अंग ।
खुंटली वाट नाहीसें जालें जग वो ।। ३ ।।
शोकें वियोग घडला सकळांचा ।
गेल्या शरण हा अन्याय आमुचा ।
केला उच्चार रे घडल्या दोषांचा ।
झाला प्रगट स्वामी तुकयाचा वो ।। ४ ।।

: ३ :

काय उणें कां करितोसी चोरी ।
किती सांगों तुज नाइकसी हरी ।

परपरता तूं पळोनी जासी दूरी ।
अनावर या लौकिकाबाहेरीं वो ॥ १ ॥
माया करुणा हे करिते बहुत ।
किती सोसूं या जनांचे आघात ।
न पुरे अवसरू हेंचि नित्यानित्य ।
तूंच सोडवी करुनी स्थिर चित्त वो ॥ २ ॥
बहुत कायें मी गुंतलियें घरीं ।
जासी डोळा तूं चुकवूनी हरी ।
करितों लागा न येसी चपळ भारी ।
नाहीं सायासाची उरो दिली वो ॥ ३ ॥
तुज ह्मणीये मी न संगे अनंता ।
नको जाऊं या डोळियांपरता ।
न लगे जोडी हे तुजविण आतां ।
तुकया स्वामी कान्होबा गुणभरिता वो ॥ ४ ॥

: ४ :

गोरस घेऊनी सातें निघाल्या गौळणी ।
तंव ती कृष्णाची करणी काय करी तेथें ।
जाला पानसरा मिठी घातली पदरा ।
आधीं दान माझें सारा मग चाला पंथें ॥ १ ॥
सर जाऊं देरे सर जाऊं देरे सर जाऊं दे परता ।
मुळीं भेटलासी आतां
नाट लागलें संचिता खेपा खुंटलिया ॥ २ ॥
आसुडी पदरा धरी आणिक दुसरा ।
येरी झोंबतील करा काय वेडा होसी ।
आलों गेलों बहु वेळां नेणों गोरा कीं सांवळा ।
सर परता गोवळा काय बोलतोसी ॥ ३ ॥
आह्मी येथें अधिकारी मागें केली तुम्ही चोरी ।
आतां कळलिया वरी मागें केलें तयाचे ।

बोलिल्या हांसुनी आह्मी सासुरवासिनी ।
कां रे झोंबसी दुरुनी करीं मात कांहीं ॥ ४ ॥
वांयां परनारी कैशा धरिसी पदरीं ।
तयां कळलिया उरी तुज मज नाहीं ।
जडला जिव्हारी फांकों नेदी तया नारी ।
जेथें वर्म तें धरी जाऊं पाहें तियेचे ॥ ५ ॥
तया हातीं सांपडल्या हाटीं पाटीं चुकविल्या ।
कृष्णमिळणीं मिळाल्या त्याही न फिरती ।
तुका म्हणे खंती वाया न धरावी चित्तीं ।
होतें तुमच्या संचितीं वोडवलें आजी ॥ ६ ॥

: ५ :

हरी तुझी कांति रे सांवळी ।
मी रे गोरी चांपेकळी ।
तुझ्या दर्शने होईन काळी ।
मग हें वाळी जन मज ॥ १ ॥
उगला राहें न करीं चाळा ।
तुज किती सांगो रे सांवळा ।
तुझा खडबड कांबळा ।
अरे नंदबाळा आगलटा ॥ २ ॥
तुझिये अंगीं घुरट घाणी ।
बहु खासी दुध तूप लोणी ।
घरिंचे बाहेरील आणोनी ।
मी रे चांदणी सकुमार ॥ ३ ॥
मज हे हांसतील जन ।
धिक्कारिती मज देखोन ।
अंगींचें तुझे देखोनी लक्षण ।
मग विटंबना होईल रे ॥ ४ ॥
तुज लाज भय शंका नाहीं ।
मज तंव सज्जन पिशुन व्याही ।

आणिक मात बोलूं कांहीं।
कसी भीड नाहीं तुज माझी ॥ ५ ॥
वचन मोडी नेदी हात।
कळलें न साहेची मात।
तुकयास्वामी गोपीनाथ।
जीवन्मुक्त करुनी भोगी ॥ ६ ॥

: ६ :

सात पांच गौळणी आलिया मिळोनी।
यशोदे गाऱ्हाणें देती कैसें।
काय व्यालीस पोर चोरटें सिरजोर जनावेगळेंचि कैसें।
दहीं दूध लोणी शिंकां नुरेचि कांहीं कवाड जैशाचें तैसें।
चाळवूनीं नाशिलीं कन्याकुमारें आमुच्या,
सुनांसी लाविलें पिसें गे बाइये ॥ १ ॥

असुनी तरी यासी सांगे बरव्या परी,
नाही तरी नाहीं उरी जीवेंसाठी।
मिळोनी सकळै जणी करुं वारवा सखी,
तुज मज होईल तुटी गे बाइये ॥ २ ॥

नेणे आपपर लौकिक वेव्हार भलते ठायीं भलतें करी।
पाळतुनी आह्मी घरीं नसता येथें आपण संचार करी।
सोगया चुंबन देतो आलिंगन आमच्या लोळे सेजाबाजावरी।
शिंकीं कडाडा फोडी गोरसाचे डेरे धरितां न सांपडे करी।
गे बाइये ॥ ३ ॥

आतां याची चाड नाहीं आम्हां भीड सांपडला कोड पुरवूं मनींचें।
सोसिलें बहु दिस नव्हता केला निस म्हणवूनि एकुलतें तुमचें।
चरण खांबी जीवें बांधेन सरिसा जंव न चाले काही याचे।
अर्थ प्राण देतां न सोडी सर्वथा भलतें हो या जीवाचें गे बाइये ॥ ४ ॥

घेऊनी जननी हाती चक्रपाणी देतसे गौळणी वेळोवेळां।
निष्ठुर वाद झणीं बोलला सकळा क्षोभ जाइल माझ्या बाळा।

जेथें लागे हात वाढते नवनीत अमृताच्या कल्लोळा।
देखोनि तुकयास्वामी देहभाव विसरल्या सकळा गे बाइये ॥ ५ ॥

: ७ :

गाई गोपाळ यमुनेचें तटीं।
येती पाणिया मिळोनि जगजेठी।
चेंडू चौगुणा खेळती वाळवंटीं।
चला चला म्हणती पाहूं दृष्टी वो ॥ १ ॥
ऐशा गोपिका त्या कामातुरा नारी।
चित्त विव्हळतें देखावया हरी।
मिस पाणियाचें करितील घरीं।
बारा सोळा मिळोनी परस्परी वो ॥ २ ॥
चिरें चोळिया त्या धुतां विसरती।
ऊर्ध्व लक्ष लागलें कृष्णमूर्ती।
कोणा नाठवे कोण कुळ याती।
झालीं तटस्थ सकळ नेत्रपातीं वो ॥ ३ ॥
दंतधावनाचा मुखामाजी हात।
वाद्यें वाजतीं नायके जन मात।
करी श्रवण कृष्णवेणुगीत।
स्वामी तुकयाचा पुरवी मनोरथ वो ॥ ४ ॥

: ८ :

कोठें मी तुझा धरूं गेलें संग।
लावियेलें जग माझ्या पाठी ॥ १ ॥
सर सर रे परता अवगुणाच्या गोवळा।
नको लावूं चाळ खोटा येथें ॥ २ ॥
रूपाच्या लावण्यें नेली चित्तवृत्ति।
न देखें भोंवतीं मी ते माझी ॥ ३ ॥
तुकयाचा स्वामी माझे जीवींच बैसला।
बोलींच अबोला करुनियां ॥ ४ ॥

: ९ :

कान्हो एकली रे एकली रे।
तुजसवें चुकलें रे।
भय वाटे वनीं मज अबळा धाकली रे ।। १ ।।
निघतां घरी आई बा वारी।
तुजसवें कां आलियें हरी ।। २ ।।
लोक वाटा सांगती खोटा।
परी मी चटा लागलियें ।। ३ ।।
पिकल्या बोरी झालिये सामोरी।
काय जाणें कोठें राहिला हरी ।। ४ ।।
आड खुंट झालिया जाळी।
काय काय जाणों कान्हें मांडिली रळी ।। ५ ।।
तुका म्हणे जाऊं आलिया वाटा।
पाहों हरी पायीं न मोडे कांटा ।। ६ ।।

: १० :

एकली राना गोविंदा सवें।
गेलें ठावें तें जालें ।। १ ।।
मज न म्हणा न म्हणा शिंदळी।
नाहीं विषम जवळीं आतळलें २ ।।
नव्हती देखिली म्यां वाट।
म्हणोनी हा धीट संग केला ।। ३ ।।
भेणें मिठी दिधलीं गळा।
सेजेजवळा दडालें ।। ४ ।।
सलगी धरी पयोधर।
साहाती करमुर सवें ।। ५ ।।
आहेव मी गर्भीरपणें।
हें सांगणें कां लागे ।। ६ ।।
तुका म्हणे शेवटा नेलें।
संपादिले उभयतां ।। ७ ।।

: ११ :

जैशा तुह्मी दुरी आहां ।
तैशा राहा अंतरें ॥ १ ॥
नका येऊं देऊं आळ ।
अंगीं गोपाळ दडलासे ॥ २ ॥
अवघा हाचि राखा काळ ।
त्रिकाळचि भोंवता ॥ ३ ॥
तुका म्हणे मजऐशा ।
होतां पिशा जगनिंद्य ॥ ४ ॥

: १२ :

वाळो जन मज म्हणोत शिंदळी ।
परी हा वनमाळी न विसंबें ॥ १ ॥
सांडूनी लौकिक झालियें उदास ।
नाहीं भय आस जीवित्वाची ॥ २ ॥
नाइकें वचन बोलतां यां लोकां ।
म्हणे झालो तुका हरिरता ॥ ३ ॥

: १३ :

आधिल्या भ्रतारें काम नव्हे पुरा ।
म्हणोनि व्यभिचारा टेकलियें ॥ १ ॥
रात्रंदिस मज पाहिजे जवळी ।
क्षण त्या निराळी न गमे घडी ॥ २ ॥
नाम गोष्टी माझी सोय सांडा आतां
रातले अनंता तुका म्हणे ॥ ३ ॥

: १४ :

हाचि नेम आतां न फिरें माघारी ।
बैसलें शेजारीं गोविंदाचे ॥ १ ॥

घररिघी जालें पट्टराणी बळें ।
वरिलें सांवळें परब्रह्म ॥ २ ॥
बळियाचा अंगसंग जाला आतां ।
नाहीं भय चिंता तुका म्हणे ॥ ३ ॥

: १५ :

मजसवें आतां येऊ नका कोणी ।
सासुरवासिनी बाइयांनो ॥ १ ॥
न साहवे तुला या जनांची कूट ।
बोलति वाईट ओखटें तें ॥ २ ॥
तुका म्हणे जालों उदास मोकळ्या ।
विचरों गोवळ्यासवें आम्ही ॥ ३ ॥

## निळोबा

: १ :

याच्या संगसुखें गर्भवास घेतां ।
येत जात गे कल्पाच्या चळथा ।
नेघों भुक्ति मुक्ति देता सायुज्यता ।
ऐशा गोपी त्या सुखानंदभरिता वो ॥ १ ॥
धन्य प्रेमळा त्या रंगल्या श्रीरंगीं ।
नेणती दुसरें वो संसारी विरागी ।
हरिचीं भूषणें त्या लेऊनि निजांगीं ।
सुखी सुखरूप भोगी नित्य त्यागी वो ॥ २ ॥
याच्या सहवासें भोगित निज भोग ।
भोगी भोगातीता सर्वदा निःसंग ।

नयेचि दृश्यावरी देखतीहि जग ।
ऐशा विचरति होऊनि अनंग वो ॥ ३ ॥
नित्य जाणवनीं हरीतें देखती ।
हरीचि होऊनि या हरीतें भजती ।
हरिरूप झाली त्यांची अंगकांति ।
हरिचि ध्यानीं सुखावला मनीं चित्तीं वो ॥ ४ ॥
येती जाती त्या हरींच्या सांगातें ।
वसती नित्य काळ हरि वसे जेथें ।
करिती भोजन त्या जेववितां हरीतें ।
हरीविणा त्या न घेती जीवनाते वो ॥ ५ ॥
निळा म्हणे तया हरीच सांगाती ।
त्याहि वर्तताती हरीच्या अनुवृत्ति ।
नाहीं उरविली दोनीपणें खंती ।
वसती एकाएकी निजात्मता युक्ति वो ॥ ६ ॥

: २ :

यासी पाहतां वो हृदयस्थ पाहिला ।
यांसी बोलतां वो वेदुचि घोकला ।
यासी खेळता कुसंग दोष गेला ।
यासी भोगितां हा प्रत्यवाय गळाला वो ॥ १ ॥
ऐसा निजानंद परमात्मा श्रीहरी ।
आम्हीं लाधलों वो भाग्याच्या संसारीं ।
नित्य आळंगूं या हृदयामाझारी ।
ऐशा निजबोधें निवाल्या सुंदरी वो ॥ २ ॥
यासी विचारतां परमार्थ हाती लागें ।
यासी विवरितां ये सिद्धांत वोळंगे ।
यासी विनवितां हाचि वरि मांगें वो ॥ ३ ॥
यासी करूं जातां सहजचि गोठी ।
स्वार्थ परमार्थ पुरुषार्थ लागे पाठीं ।

यासी जिवीं ध्यातां यासीची पडे मिठी।
यासी गीतीं गातां ब्रह्मांड पडे पोटीं वो ॥ ४ ॥
यासी करुनी पुढें विचारीं जनीं वनीं।
यासी घेऊनि संगे बैसो वों भोजनीं।
यासी निजवूनि निजों निज शयनीं।
याचेंसंग सुख घेऊं अनुदिनीं वो ॥ ५ ॥
निळा म्हणे निजाश्रमीची सकळा।
ऐशा आरजा गौळणी त्या बाळा।
ध्यानीं मनीं जिवीं ध्यातां या गोपाळा।
गेल्या विसरोनियां संसार सोहळा वो ॥ ६ ॥

: ३ :

भावभक्तिचिया प्रीतिं जेवविला।
देऊनि ढेकर वो पूर्णपणें धाला।
नेणो आनंदाचा प्रवाह लोटला।
ऐसिया स्वानंदाचीं वचनें अनुवादला वो ॥ १ ॥
म्हणे केले ते पावले उपचार।
तुम्ही आवडीनें प्रेमाचे प्रकार।
झाली तृप्ति आतां घ्यावो देतों वर।
पुन्हा नातळो हा तुम्हांसि संसार वो ॥ २ ॥
तातल्या सोसुनियां विरक्तिच्या ज्वाळा।
बरव्या शिजविल्या समृद्धी सकळा।
झाला रसस्वाद भोजनीं आगळा।
वाढिलीं पंचामृतें जेवता जे वेळोवेळां वो ॥ ३ ॥
ऐसें जेऊनियां धाले विश्वंभर।
भक्ता उभविला अभयाचा कर।
काढूनी घालिती कंठीचे तुळसीहार।
निळ्या स्वामी गौरविती वारंवार वो ॥ ४ ॥

# शाहीर रामजोशी

## होरी

कुंजांत मधुप गुंजारव यमुनातटीं । होरी खेळतो हरी करूनि राधा नट आपण नटी ॥ धृ० ॥ लतागुच्छ सुरतरुही तुच्छवर्रा रुंजती करिती मधुकरी । विमान वरी दाटल्या उतरल्या गगनीं सुरसुंदरी । सुरताल पखवाज खंजिरी मंजरींत बासरी । बिन अमृत कुंडली कुणी डफसारंगीला धरी । नृत्यकृत्य तत्कारतान करताल झुमक ह्या अंतरी । मोरचंग झांजरी पतीसंपल्यही नानापरी । रूपरम्य राधेचे राधावल्लभ आपण धरी । तिलोत्तमा उर्वशी मेनका रंभापरी घावरी । फागामधी बागांत मातला वसंत अंतःपुरी । कवण राधिकापति कवण राधा हे न कळे खरी ॥ चाल ॥ अगे सखे ग आनंद मी सांगूं किती ॥ अगे सखे ॥ पिचकाऱ्या मुखी माखिती ॥ अगे सखे० ॥ केशर मृगमद उडविती । या रासाचा कोण जाणता सुरवर हातवटी । होरी खेळतो हरी करूनि राधा नट आपण नटी ॥ १ ॥

श्रीहरीचें वयरूप धरूनि राधा नट नागरधणी । पीतवसन बासुरी मुगुट शिरीं तिळभर नाहीं उणी । हावभाव नृत्यांत नटाकृति भाव दाविते क्षणीं । मदनमूर्ति सावळी तनु सकुमार फार देखणी । तथै तथै तननन तननन वेणुरव किंकणी । नृत्यगीत माधुरी हरीची जाणत कालिया फणी । गर्वरहित गंधर्व सर्व त्या वसंत संतर्पणी । कंठीं घालिती मिठी म्हणती राधेला यदुकुलमणी । रास जग जनकास मुखामधें हास हिऱ्याची खणी । बुलाख नथ नासिकीं चमक जशी शुक्राची चांदणी ॥ चाल ॥ अगे सखे रंगरसामधीं यदुनायका ॥ अगे सखे० ॥ नच ओळखिती कितीक बायका ॥ अगे० ॥ धरूनि मुरलीच्या गायका ॥ अगे० ॥ सोडिती नयनसायका ॥ अगे० ॥ कुणी म्हणती हरी आयका ॥ अगे० ॥ हे मोठें कीं नवल राधिका ॥ अगे० ॥ धरी नरवर कुचतटीं । होरी खेळतो हरी करूनि राधा नट आपण नटी ॥ २ ॥

वसंतऋतु संतार कुंज ते तरुवर फुलले फुलीं । किती फिरती गोपिका किती रंगामधीं भिजल्या मुली । शुक पीक बक कोकिळा काय पक्षामधिं पडल्या

भुली । मयुर वर नाचती दिली गति कन्यानें आपुली । कुंद मंद मकरंद धुंद पिचुमंद बकुळवन खुलल्या खुली । गुलाब मधुमालती मोगरा वर चंपक मखमली । मंदशीत अति सुगंध पवनासहित कुसुम लाखुली । किती रासमंडळी गुलाल ही लाल ललित पाऊलीं । स्त्रीवेषें हरि होरी खेळतो नवल काय गोकुळीं । अनंत कौतुक करी धरी अवतार कृष्ण माऊली ॥ चाल ॥ अगे सखे ग रासांत धुम मातली । अगे सखे० । गोपिका सकळ रातली । अगे० । ठाउकी न किल्ली आतुली । अगे० । सत्य सत्य हे भामा रुसली । अगे० । कशी येईल शेवटीं । होरी खेळतो हरि करूनि राधा नट आपण नटी ॥ ३ ॥

पुरुषवेष राधा निजवेष कवटाळुनि चुंबिती । म्हणुन गोपिका शुद्ध राधेला आलंगिती । अंग संग रतिभंग दंगरंगामधीं किती लाजती । मनीं म्हणती कामिनी नव्हे माधव सुखसंगतीं । अष्ट नायका कृष्ण म्हणून राधेला कवटाळिती । काय सांगु मी तरी विचित्र होरी मज भासती । सार साक्षी संसारसार कंसारी धरू धांवती । कुणी व्यजन चामरें धरिती पिचकाऱ्या चिपळ्या किती । ज्या रासामधी गुलाब केशरी मृगमद नदी वाहती । अशी धुम मातली कळेना कोण गाण गोपी कापती ॥ चाल ॥ अगे सखे ग धांवत आलें तुजकडे । अगे सखे० । सांगाया दुःख रोकडें । अगे० । आधींच तुझें वाकडें । अगे० । मोठें मज सांकडें । अगे० । कपटरुपिणी राधा येऊन धरील तुझी हनुवटी । होरी खेळतो हरी करूनि राधा नट आपण नटी ॥ ४ ॥

रासामधीं हरि लागी समजलें भामा रुसली पिशी । निजरूपाते धरी करी खटपट पट पिवळा कशी । रंगातुनि सदनांत एकटा हरि पोहचे तिजपशीं । सचिंत पशुचे रिती तशी मंचकावरी ते मुसमुशी । हळूच पद चुरनि तिचे मांडीस देतसे उशी । उठुनि म्हणे भामिनी सवती मजपुढें सोंग मिरविशी । त्या कपट्याचें रूप धरूनि किती रांडेला कवटाळिशी । ठकविशी । तसें मजही पाहशी कळेना सये वो मज चौकशी । ऐकुनि हरि म्हणे भोग जाहला गोष्ट करावी कशी । हात जोडुनि तिला म्हणें मी कृष्ण कृष्णीच्या कुशीं ॥ चाल ॥ अगे सखे नको संशय धरूं फारसा ॥ अग० ॥ घे क्षणभरी स्त्रीसुखरसा । अग० । करी कंकण नको आरसा ॥ अग० ॥ अग सखे ग भाया सुख पडे गारसा । कविरायानें यापरी नेली रासामधीं गोमटी । होरी खेळतो हरि करूनि राधा नट आपण नटी ॥ ५ ॥

### छेकापन्हुती

राधा सखी संवादे छेकापन्हुति आयका ।
रसिक हो किती चतुर बायका ।। ध्रु० ।।
अंबरगतपरि पयोधरातें रगडुनि पळतो दुरी ।
काय हा धीट म्हणावा तरी ।
तो नंदाचा मूल काय गे सांग कन्हया हरी ।
नव्हे ग मारुत मेघोदरी ।। १ ।।
सासुसासरा पति यांदेखत अधरामृत माधुरी ।
घेतसे काय वदावें तरी ।
तो नंदाचा मूल काय गे सांग कन्हया हरी ।
नव्हे गे हा मधुकर पंकजहारी ।। २ ।।
पटविघटित कुचतटिही वसंतीं हळुच येउनि उरी ।
शीतल स्पर्श सुगंधित करी ।
तो नंदाचा मूल काय गे सांग कन्हया हरी ।
नव्हे हा मलयागर चातुरी ।। ३ ।।
सुवर्ण पाहुनि तनुवरी वंचक रात्री शिरतो घरीं ।
हात टाकितसे अंगावरी ।
तो नंदाचा मूल काय गे सांग कन्हया हरी ।
नव्हे हा दस्यु समज अंतरीं ।। ४ ।।
सुंदर रतिजोगता मिळाला पतिही सुभगा खरी ।
दुजीला असा मिळेल काय तरी ।।
तो नंदाचा मूल काय गे सांग कन्हया हरी ।
नव्हे गे रतिला मन्मथ वरी ।। ५ ।।
।। चाल दुसरी ।।
गुणवंत कुचावरी लोळे अति शोभला ।
तो कृष्ण काय ?
नव्हे गे हार कळेना तुला ।।
बाई आंगमर्दनीं अति सुखकर वाटला ।
तो कृष्ण काय ?

नव्हे गे कर दूतीचा भला।
मज शीतळ करितो श्रमी होऊनिया मला।
तो कृष्ण काय?
नव्हे गे व्यजन सुवंशातला।
यापरि निज संतोष वर्णिती पुसता यदुनायका।
लोपत्री मुरलीच्या गायका॥

: ४ :

बाई नको जाऊं यमुनातिरीं। नंदाचा नंद हरि, करितो बळजोरी, धरिल गे पदरीं। तूं नाजुक रूपसुंदरी। सुभग मंदिरीं, तुझे अंतरीं कळेना परी॥धृ०॥ या वनांत चारित धेनु। वाजवी वेणू। मला गे भुल पडली। हाकमाचा मुल म्हण हाटा करील पानवटा। धरीच मनगटा तो आहे नकली। कोणाचा धाक नाहीं जरा। मायबाप धरा म्हणति मुल हरामि याची बुध कळली। काल गवळ्याची एक नवी मूल या गांवीं दुपारी धरली। बाई उरांत करि धडधडा मारितो चिमखडा होईल भंडवडा मात हे उठली। तूं आधींच रूपराजसा, म्हणे बहुदिसा मला सापडली। गवळणीवर त्याचा सिका तयाच्या हाका वदे त्या फुका कोण जाऊं सकली॥ चाल॥ त्या वनांत जासिल कशी। कांही नित नाहीं हाकमापाशीं तूं तरुणी सासुरवाशी। त्याला पाहुनि नावरी होशी। तो कपटि कुंजवनवासी। तो बोलुनि गोड हळुच वदनीं घर घेऊं पाहि कंसारी। पोरें मिळउनि करि हा तमाम जाहली सिमा भुलवली गोकुळनगरी॥ ३॥

: ५ :

श्रीरंग गोपिकोत्संग धरुनि करि रंग हरी हा बाई। कुंजांत मातला वसंत सांगु मी काई॥ धृ०॥ तो कुंजरसाचा फुंज बांधिला गुंज तशामधि मुरली। अति मंजुळ हरिनें वदनसरोजीं धरली। थयिं थयिं नूपूरें वाजती चरणीं झणत्कृति भरली। त्या रसिक व्रजांतिल सुंदर तितुकी सरली। अति मंद शितल सुगंध जाति निष्पंद मरुत्कृति भरली। ती शोभा नच वर्णवे रमा अवतरली॥ चाल॥ रंगांत गोपिच्या पडल्या, किती उड्या। किती रासमंडळीं जडल्या, होत्या सड्या। किती श्रीहरिच्या तोंडी देति विड्या॥ चाल॥ या सार सुखा नाहिं पार काय संसार हरीच्या पायीं। या चित्तवृत्तिला दुजे सुचेना कांहीं॥ श्रीरंग० १॥

तूं जरी रुसुनियां घरीं मंचकावरी बैसलिस भामा। तरि काय हरीला उण्या सुरसिका रामा। हा भाग तुझा तरी लागे नको धरुं राग रिझवि गुणधामा। जी रसिक नव्हे ती स्त्री न म्हणावी पामा। किती मुली मिळाल्या हुलीस त्याच्या कुळीं किं कुशला वामा। श्रीमाधवसंगें गडे पुरविती कामा ॥ चाल ॥ किती गुलाल केशरिरंगें, भिजविल्या किती मानवती मदभंगें निजविल्या। किति देउनि रतिसुखसंगें, रिझविल्या ॥ चा० १० ॥ हा हाट हरीचा थाट गोपिला वाट सुचेना कांहीं। या मुखें वदूं किति पिचकाऱ्यांची घाई ॥ श्रीरंग० ॥ २ ॥

मधुकरी पंकजावरी तशा एकसरी धांवल्या रमणी। गेलि उमारमा सखुसाळू मैना चिमणी। चल ऊठ, जाऊं रंग लूट, पडूं नये तूट हरीच्या चरणीं। यापरि मग समजुन गेल्या दोघी गडणी। त्यापाशिं मिळाल्या रसीं उतरल्या मुशी नंदजा चरणीं। हा स्त्रीजन परि भगवंत कृपानिधिकरणी ॥ चा० ॥ ही वसंत माधव होरी, कोणि शिका। जरि गातां हरिची थोरी, भवभी कां। जर वर्णन करितां चोरी, करुं नका ॥ चा० १० ॥ हें पर्व पावलें सर्व नको धरुं गर्व तरि कविराया। धनवान कोणाचे बाप कुणाची माया ॥ ३ ॥

## होनाजी बाळा

: १ :

राधा म्हणे श्रीहरी तुम्ही रात्री होता कोणे ठाई। तें सांगा मजप्रती आतां सत्वर भूधरशाई ॥ धृ० ॥

नूतन वधु देखण्या गोकुळामध्ये गोंवळबाळी। नित्य तुम्हाला हरी नवीन एक हृदयीं कवटाळी। चार प्रहर क्रमिली निशी कोणे घरी वनमाळी। आला नेत्र पुशीत उठून येवढे प्रातःकाळीं। सुरस गंध केशरी टिळक वर कस्तुरी भाळीं। धर्मानें पुसिला भोगिली कोणीतरी वेल्हाळी। दिसती नेत्र आरक्त मुखावर तेज क्वचित् नाहीं ॥ १ ॥

वर्तमान साद्यंत हकीकत नाही तुला कळली। श्रवण करी तूं बरें अंतरीं घे समजुन वहिली। वनामाजी पोवळी गाय माझी पळून गेली। तिला आणाया-

साठीं राधिके रात्र बहुत झाली। ते श्रम झाले आम्हांसी रात्रीं असी जागृती घडली। त्यायोगें आरक्त नेत्र मुखीं पीत दशा आली। तेज नसे यालागीं राधिके मनीं शोधून पाही ॥ २ ॥

कांहो रुळला दिसे चिरा मस्तकिंचा श्रीरंगा। पेच असे मोकळा मनीं विचारा भवभयभृंगा। सुगंध वस्त्रें सारी येतो परिमळ तुमच्या आंगा। न बोलतां हें असत्य हरी तुम्ही मजपाशीं सांगा। ओठ कां हो सुकले गोपीमानसराजीव-भृंगा। प्रवर्तला कांहीं म्हणा तुम्ही रात्रीं स्त्रीच्या प्रसंगा। गालाला अंजन लागायचें कारण काई ॥ ३ ॥

आणावया पुष्पें माध्यान्हीं मळ्यामधीं गेलो। आकाशीं घन वर्षताच मग मी जाईतळीं बैसलों। पडता वर पुष्पाचे बिंदु मी तळीं अवघा भिजलों। सुगंध त्याचा असे परस्थळी नाहीं कोठें रमलों। ओठ सखे सुकले धुंडिता गाई वनीं श्रमलों। तरुस गुंतला चिरा ठाउक नसे भ्रांतींत भ्रमलों। म्हणून पेंच मोकळा टिळ्याची गाली काळिमाही ॥ ४ ॥

क्षिराब्धीवासा जगन्निवासा अहो यदुकुळभूषणा। हे गोविंद मुकुंद मुऱ्हारे अच्युत मधुसूदना। जगव्यापक हे जगनिधी गोपीमानसमोहना। शकटांतक श्रीहरी भजन हे रुक्मिणीच्या रमणा। चार वेद षड्शास्त्रें पुराणें अठराही नाना। शिणली गुणवर्णितां न येशी तूं त्यांच्या ध्याना। होनाजी बाळ वसो दृढनिश्चय तुजपाईं। ते सांगा मजप्रती आतां सत्वर भूधरशाई ॥ ५ ॥

: २ :

राधे हा मुकुंद उचलुनी कडिये घेईं घेईं ॥ धृ० ॥

करुं देईना हा माझा दुधदुभत्यांस कांहीं। मंथितां दह्यातें धरितो रवी करी ठाईं ठाईं। हाटे हा कदापी नुमजे समजविल्यास बाई। बारा समजाऊन यासी तुझ्या घरीं नेईं नेईं ॥ १ ॥

हरिसी आनंदे राधा मृदुमृदु बोलविते। माझे घरीं चाल कृष्णा दूधभात कालवितें। पाळण्यांत घालुन तुजला निजवून हालवितें। यशोदेसी सोडी कान्हा माझे जवळ येईं येईं ॥ २ ॥

गोविंदा गोपाळा कृष्णा मुकुंदा क्षीराब्धीवासा। जगज्जीवना व्रजभूषणा गोपीमानसराजहंसा। उगा नको रडूं श्रीरंगा यशोदेसी सोडी कैसा। तुझी धरितें हनुवटी मी, निरे दूध पेईं पेईं ॥ ३ ॥

मला हाटे येथें मोठें खळियेलें सांवळयानें। असाच हा रोज राधे हरि घरीं नेत जाणे। उगा हा निचिंत कैसा सुधा समजाविल्यानें। होनाजी बाळा त्या स्तवनी सदा हरीसही राही ॥ ४ ॥

: ३ :

सांगा हा मुकुंद बाई कोणी पाहिला ॥ धृ० ॥ रासक्रीडा करितां व्रजनारी होतों सखे आम्ही विषयविचारी। टाकून गेला तो पूतनारी। कोठे गुंतून बाई कोठें राहिला ॥ १ ॥

उद्भिज क्षेत्रज वृक्ष शिले हो। पक्षादिक वनचरें कोकिळे हो। गोपीपिशा आम्हीं कामानळें हो। जो वृंदावनीं बाई मनीं चाहिला ॥ २ ॥

सुरत आनंदें श्रमलों जेंव्हां गे। निद्रा आल्यां आम्हां न कळे केंव्हां गे। जरी असतों आम्ही जाग्या तेंव्हां गे। जाऊं न देतों सखये त्याहिला ॥ ३ ॥

गोपी आळविती हे व्रजभूषणा हे। गरुडध्वजा असें केलेंसी काय हें। वियोग तुझा आम्हांलागी न साहे। आम्हीं तुजला श्री गुणीं गाईला ॥ ४ ॥

भावबळें अशा वनिता व्रजाच्या। बोलाउन सुताप्रती नंदजीच्या। प्रेमपदीं यदुकुळटिळकाच्या। म्हणे होनाजी बाळा देह वाहिला ॥ ५ ॥

: ४ :

श्रीरंगा कमलाकांता हरी पदरातें सोड ॥ धृ० ॥ व्रजललना नारी। जात असो की बाजारीं। अहो कान्हा मुरारी। अडवितां कां कंसारी। मथुरेची बारी। पाहूं मजा हो गिरधारी। विकून नवनीत दधी गोड ॥ श्रीरंगा० ॥ १ ॥

ऐका लवलाहीं गृही गांजिला सासुबाई। परतुनिया पाईं। येऊं आम्ही ईश्वरग्वाहीं। यान ( दान ) देऊन कांहीं। मग जाऊं आपले ठाईं। पतीभयानं देह रोड ॥ श्रीरंगा ॥ २ ॥

गडी तुमचे नानापरी चेष्टा करिती। जुल्लम आम्हांवरती। मधुसुदना लज्जा हरिती। अबरूच्या गरती। कळली तुमची बदमस्ती। वाईट शिकला खोड ॥ श्रीरंगा ३ ॥

विनवून कृष्णासी। शरणागत झाल्या दासी। पाहून मजा खाली। आणिल्या गोपी महालासी। होनाजी बाळासी मती आगळी कविरायाची। धोंडी सदाशिव जोड। श्रीरंगा कमलाकांता० ॥ ४ ॥

# शाहीर प्रभाकर

: १ :

रडतांना हृषिकेशी बाई माझा राहिना । कडे उचलुन सये देतां स्तन तोंडीं घेईना ।। धृ० ।। खरी झाली दृष्ट माझ्या श्रीहरिला वाटते । दचदचकुन लेकरूं ग तिनतिनदां ऊठतें । भय भारी जिरेल कैसा रडें म्हणुनी दाटतें ।। चाल ।। धीर देतां जिवाला ग मन शांत होइना ।। रडतांना० ।। १ ।।

नको नेवुं हरी राधे दुधभात भरवुं दे । कानफाट्या हातीं सांजे अंगारे करवुं दे ।। चाल ।। नवसाचा अजुन बाई मज ठोका येइना ।। रडतांना० ।। २ ।।

न राहे पाळण्यांत येई उतरुन खालता । बाई सोडी वासुरांसी धरी पृच्छें चालतां । हसुं येतें सावळ्याचें बोबडें बोल ऐतां ।। चाल ।। घट मोठा बागुलाशीं तिळमात्र भीइना ।। रडतांना० ।। ३ ।।

आज रडतो राहूं राहूं फार टाहो घेतला । उखळासी अंगणांत बांधुनिया घातला । नित कळतो समाचार कंसासी येथला ।। चाल ।। कशी याला बरी बुद्ध देव अजुनी देइना ।। रडतांना० ।। ४ ।।

धन्य दैव यशोदेचें असे उदरीं बालक । भक्तांचा सहकारी वैकुंठ पालक । म्हणे गंगु हैबती हा त्रिभुवनीचा चालक ।। चाल ।। महादेव गुणी गातां हर्ष माइना ।। रडतांना० ।।

: २ :

वेडें करी विचरतां घरीं हरी तुझी मुरली ।। ध्रु० ।। दधिमंथन करित मी होतें, उठुन गोविंदा ।। रविदोरी धरून घुसळितां पडे तिनतिनदां ।। मन चंचल न गमे, कुठें सुचेना धंदा ।। चाल० ।। वेणी सुमनें गुंफितां, शिरीं राहिला हात । नादें अंबर कोंदलें वाटे जाहली रात । अशी वृत्ती फिरली ।। १ ।।

लगबग धांवती गोपिका, घालुन गळी वांकी । काढुनी नथ अडकविलें कर्णफूल नाकीं । हातीं चंद्रहार गळिं जवे, आरसी विलोकी ।। चाल० ।। भाळीं अंजन लाविलें, नेत्रीं कुंकूं करें । मोहित झाल्या एकसरें, अज्ञान ज्ञानी थोरें । सकल मनें हरिलीं ।। २ ।।

न्हाण खाण जेवण विसरूनी, बौध्यरूप धरती । कुणी धान्य कांडितां हात,

राहिला वरती । कुणी जाउन कुंजवनी, विलोकती मूर्ती ॥ चा० ॥ गाई वत्सें ऊर्ध्वमुखें, देति हरितें मान ॥ मुरली नादें त्यागिती, गोपी साऱ्या भान प्रेमरसें भरली ॥ ३ ॥

वेदशास्त्रपुराणें सकल विकल गति जाहली ॥ ऋषी ब्राह्मण अध्ययन, गायनें राहली ॥ स्थिर झालीं यमुनाजळें, मुहूर्त न वाहली ॥ चा० ॥ पूर्वी हरिच्या वाटतें, कंठीं घातली माळ । केला अधरीं वेणुनें, सहवास सारा काळ ॥ म्हणुन मुखीं धरली ॥ ४ ॥

जो निराकार निर्गुण, सगुण कंसारी । भक्तांस्तव नाना रूपें, स्वतः धरी सारीं । स्नेह जोडुन चरणीं करा साह्य संसारीं ॥ चा० ॥ महादु प्रभाकर गुण वदे ध्यारे तरले जाल ॥ गंगाधर कविची कल्पना मातुन सालोसाल ॥ परीं अनुसरली ॥ ५ ॥

## शाहीर परशराम

मी चांगट फांकडी रूपानें तूं काळा बेंदरा । दूर होय वाट नको धरूं पदरा चित्त चोरटया धिरा ॥ धृ० ॥ वय तरण्या आम्ही गरती देखण्या एकीहून एक रूपचढी । वाट सोड आज हाट मथुरेचा आहे जाणें तातडी । जर दंगा वेढगा करशील श्रीरंगा तू या घडी । कवलाचा बाजार कोण लावील फुलाची छडी ॥ चाल ॥ दही दुधाच्या कावडी । माठ भरून । तुझे आडवे झाले गडी । वाट धरून । नाही चालणार कांहीं अटी । बोल दुरून ॥ भीड नंदाची म्हणून गय केली मुरवत धरली जरा । कान कातरून हातीं देईन मुकाच जाशिल घरा । मी चांगट० ॥ १ ॥

वनमाळा घाली गळां हातामधी वेळाची बासरी । पर मोराचे डोईवर बांधून मुगुट मिरविशीं शिरीं । काणे कोचे कुबडे येणे मुलें गवळ्याची हरी । मिळवून करशील धिटाई तेंव्हा मी नाही दुरीं । जर का मजवर धिटाई करशील तेंव्हां गोष्ट नाहीं बरी । तुझी कळूं दे मज मनसुबी । बोल दुरून । जें दान होईल वाजवी । न्याय करून ॥ काय असेल मनामधीं खुबी । दाव करून ॥ पाप

नजर तुझी परनारीवर जनांत हा बोबाटा । नाही वाघाचे वाडे बसले पहा विचारून जरा । मी चांगट० ॥ २ ॥

गोरीपान लसलशीत मी गवळण चांगट फाकडी । दागिने जडाव अगदीं, मस्तकीं मुदराखडी । जुरत कोणाची पाहील मजकडे नजर करून वांकडी । नाकेदार म्हणशील गोकुळचा घेऊं चवकी रोकडी । नवी तरणी जान जमाना कांहीं वदर ॥ नको आसडूं लचकेल मान । सोड पदर ॥ चांगट म्हणून येशील छान । सांग सदर ॥ बायकांत नायकीण होऊन तूं बसली पाहशील कुरा । धूळ घालुन जाऊं मथुरेशीं आम्ही कंसाच्या घरा । मी चांगट० ॥ ३ ॥

अनंतरंग जो श्रीरंग आवडे चित्तापुन गोपिसी । वियोग तयाचा घडी नसावा ही इच्छा मानसीं । तो ना बोले आपुणच बोले करून भलती हशी । आधीं माया लाऊन प्रीतिनें वश केले हृषिकेशी । करी विलास यमुनातिरा । दहिं लुटाव ॥ कवि नामी विठ्ठलाची तऱ्हा । खूप बटाव ॥ परशराम येसूचे छंद शिरा । करी कटाव ॥ सहजलीला भांग टिळा कशाला दे वचन इल शिरा । अशी पोटाची कमाई लाघेल पहा विचारुन पुरा । मी चांगट० ॥ ४ ॥

## पठ्ठे बापूराव

: १ :

**मी लाजुन धरिते करा**

श्रीकृष्णा शारंगधरा
मी लाजुनि धरिते करा
चला न्हेते माझ्या मंदिरा, उडवा रंग रंग रंग
तुम्ही माझ्या म्हाली चला
थाट विलासी केला भला
गुलाबाच्या फुलाचा झेला
जागोजागी म्या खवला पहिला
तुम्ही पचला तर उचला सचला नंग नंग नंग

चार प्रहरात्रचा संग
मधे रंगाचा नको बेरंग
सारी रात्र होउनी निःसंग
करा वाटेल तेवढे ढंग
मग अनंग मारित चिपळ्या करील दंग दंग दंग

तुमचा माझा पहिला लिखा
आहे शास्त्रामध्ये टिका
आज म्हाली लाजूं नका
मनी वाटेल तितके झुका
धरा लगाम ओढुन पक्का अगदी तंग तंग तंग

चौऱ्यांशी तऱ्हेच्या चवी
चाल दावा एक एक नवी
अनुभवीक नवलाची हवी
म्हणे पठ्ठे बापुराव कवी
भवरसाची आहे काकवी करूं नये भंग भंग भंग

: २ :

**ह्याने फोडिला ग चुडा**

कानडा ग कृष्ण तुझा बाइ कानडा गे
ह्यानें फोडिला ग चूडा माझा फाकडा गे
घड्यावरती नेम धरूनी मारि चिमखडा गे

पदराला घाली तीडा
बरिच झाली बाई पीडा
गेले झडझडा गे

कानडा ग कृष्ण तुझा बाइ कानडा गे
पठ्ठे बापुराव कविचा जडाव रोकडा

लालखडा नथिला ठिकडा
हालकडीला नीट आकडा

सर्जा वाकुडा गे
कानडा ग बाई तुझा कृष्ण कानडा गे

: ३ :

पाहूं वाजव वेणू

पाहूं वाजव वेणू मधु बनश्री तुमची श्रीधरा
नवा कोरा धयाचा डेरा माझा पाझरला बघ सारा
बाजाराला वेळ झाला खरा सारंगधरा
जसी चंद्रावळ सहज फसली
चुकून तुमच्या विमानात बसली
न्हवे भोळी राधा तसली सांगेन दीरा
उद्या फिर्यादीला जाऊं आम्ही नंदाला
म्हणे पट्ठे बापूरावच्या छंदाचा मान करी

: ४ :

माझा पदर धरीला

तुम्ही सांगा त्या श्रीहरीला—माझा पदर धरीला
किती वेळीं मी बाई त्याला दूर झिडकारीला
हात घाली निरीला ।। माझा पदर धरीला
पैठणीचा घोळ बाई म्यां पुन्हां सावरीला
त्यानें गेंद चुरीला ।। माझा पदर धरीला
पट्ठे बापुरावाच्या कविचा बिल्वर कोरला
चुडा हिरवा भरीला ।। माझा पदर धरीला

: ५ :

मुरली आणि राधा

तुझ्या कृष्णानें ग आमची राधा भुलविली खरी
कपाळाला काजळ ल्याली

कंचुकी उलटी घाली
दही घेउनी तुपाचा डेरा हवाला करी
माजपट्टा घाली
बाजुबंद पायात वेळा
ठुशा टीका तन्मणि बांधि कंबरेच्या वरी.
धार काढी पालथा घडा
गाईखाली सोडी रेडा
म्हशीखाली गाईचा पाडा पाजी लवकरी
शहाणी असुनी झाली वेडी
ज्याला त्याला डोळे मोडी
पठ्ठे बापुरावच्या कविची खडी चाकरी

: ६ :

तुझा मुरलीवाला काल माझ्या घराला आला
करूनिया गेला ठाई ठाई रळी
सकाळीं आणखी सायंकाळीं
तुझा वनमाळी हिंडे आळीमाळी
काढी कळी बाई वेळोवेळी
सगळी केलि ग ह्यानें दुफळी
फसविली गौळ्याची राधावळी
चंद्रावळ आणि ती चाफेकळी
त्यानें आडिवल्या यमुनेच्या जळीं
चेंडुफळी खेळे हरी चवचाळी
गोकुळी मांडली चांडाळी
साधि भोळी मी नार वेगळी
म्हणुनी खपविली कृष्णाची आगळी
दमविला सारा गांव म्हणे पठ्ठे बापुराव
करिल कंसाची बाई होळी

## मध्वमुनीश्वर

: १ :

याचे हातींचा वेणु कुणी घ्या गे ॥ ध्रु० ॥ गृहीं आपुल्या मी करीत होतें धंदा । वेणु वाजविला नंदाचिया नंदा ॥ तल्लीन झालें याचिया मुरलीनादा ॥ १ ॥ घरीं सासुरवास मला भारी । जावानणदा गांजिती परोपरी ॥ याचे मुरलीनें भुलविल्या पोरी ॥ २ ॥ तान्हें बालक टाकुनि आलें घरा । गृहीं आहे सासरा म्हातारा ॥ त्यानें केला या जीवाचा कीं वारा ॥ ३ ॥ याचा नवलावा किती सांगूं बाई । चित्तवृत्ति वेधली याचे पायीं ॥ संसृतीसि ठाव उरला नाहीं ॥ ४ ॥ वेणु नोहे हा विष मला वाटे । नाद ऐकोनी काम मनीं दाटे ॥ मध्वनाथाची मूर्ति हृदयीं भेटे ॥ ५ ॥

: २ :

कृष्णें मोहित मज केलें । माझें माणुसपण गेलें ॥ मीपण चोरूनिया नेलें । तन्मय होउनि मन ठेलें ॥ १ ॥ अगई कैसा गोपाळ । मोठा नाटकी वेल्हाळ ॥ करूनी त्रिभुवनसांभाळ । दिसतो लहानसा बाळ ॥ २ ॥ मुरली वाजवी नेटकी वो । कोठुनि आला चेटकी वो ॥ प्रेमपाशीं अटकी वो । गोष्टि नव्हे ही लटकी वो ॥ ३ ॥ मध्वमुनीश्वर वरदाई । पडला माझीये डाईं ॥ स्वमुखें बोलूं मी काई । बोलायची उरी नाही ॥ ४ ॥

## अमृतराय

नेऊं नको यदुवीर । अक्रूरा ॥ ध्रुवपद ॥
नंद यशोमति भाकिति करुणा । बाल्यदशा नाहिं थोर ॥ अ० ॥ १ ॥
कंस दुरात्मा निशिदिनिं जपतो । घातकि कीं निष्ठूर ॥ अ० ॥ २ ॥
गोपी अवघ्या मिळुनी बोलति । करिं येवढा उपकार ॥ अ० ॥ ३ ॥
अक्रूर नाम तुझें जगीं बोलती । परि करणी दिसे क्रूर ॥ अ० ॥ ४ ॥
बैसविले रथीं श्याम मनोहर । तुजवरि मरतिल फार ॥ अ० ॥ ५ ॥
गोपी विरहें व्याकुळ होती । नयनीं झिरपिति नीर ॥ अ० ॥ ६ ॥
अमृतमतीनें पाहुनि अक्रूरा । सप्रेमें बैसे स्थीर ॥ अ० ॥ ७ ॥

## रमणात्मज

आणा ना यदुराज । झडकरि आणा ना यदुराज ।। ध्रु० ।।
माळ गळ्यांतिल व्याळसमचि, घननीळ नये सदनाला ।
वेळ नका बहु लावुं तयाविण राहिना जीव आज ।। झड० ।। १ ।।
भोग सुखादिक रोग गमति वियोग न साहे सख्यांनो ! ।
वेगिं आणि सये ! बाई ! तयाविण राहीना मम प्राण ।। झड० ।। २ ।।
नंदतनय व्रजवृंदसहित कालिंदितटीं करि लीला ।
मंदिरीं आणि सखे, रमणात्मज वंदित पादसरोज ।। झड० ।। ३ ।।

## कृष्णकिंकर

भक्तजना सांभाळी सावळ्या ! येई रे । वनमाळी ! ।। ध्रुवपद ।।
श्यामसुंदरा !·जगदोद्धारा ! कृपादृष्टि न्याहळी ।। भक्त० ।। १ ।।
ठाण पहुडें मुरली अधरीं । वाजवी कदंबातळीं ।। भक्त० ।। २ ।।
मोर मुगुट शिरी दिव्य कुंडलें । शोभे टिळक भाळीं ।। भक्त० ।। ३ ।।
कामक्रोध मद मत्त कालिया । रगडी पायांतळी ।। भक्त० ।। ४ ।।
आशा मनशा विषयवासना । मोहोजाळ समूळीं ।। भक्त० ।। ५ ।।
गोप गोधनें वनी चारितां । दध्योदन करकमळीं ।। भक्त० ।। ६ ।।
पापी अघासुर बळी पिंगला । उद्धरिल्या व्रजबाळी ।। भक्त० ।। ७ ।।
कृष्णकिंकरा पाहीं कृपेनें । अभय हस्तें कुरवाळीं ।। भक्त० ।। ८ ।।

## माणिकप्रभु

यशोदेचा सुकुमार । दावा नयनीं ।। ध्रुवपद ।।
सांवळि सुरत कटीं पीत वेष्टिला असे ।
रूप सुंदर अनिवार ।। दावा० ।। १ ।।
यमुनेतिरिं हरि चारित धेनु । संगे घेउनि गौभार ।। दावा० ।। २ ।।
माणिक याचा प्रभु प्रगटुनि गोकुळिं । करि दुष्ट–संहार ।। दावा० ।। ३ ।।

## लोकगीतातील गौळणी

राधे कृष्णाला कडेवर घे ग
कडेवर घेती घरात नेती
परोपरीचा मेवा देती
बाळ बघेना मेव्याकडे ॥ ध्रु० ॥
मला वाघ दे धरुनी
त्याचा घोडा दे करुनी ॥ १ ॥
मला साप दे धरुनी
त्याचा चाबुक दे करुनी ॥ २ ॥
मला घार दे धरुनी
त्याचा पतंग दे करुनी ॥ ३ ॥
मला चांदोबा दे धरुनी
त्याचा चेंडू दे करुनी ॥ ४ ॥
मला चांदणी दे धरुनी
त्याची लाही दे करुनी ॥ ५ ॥

: २ :

हरी माझा काळा निळा
संग गोपाळांचा मेळा
त्येचा हातीचा वेनू
कुनी घ्या ग घ्या ग
हरी माझा किती छान
जसं केवड्याचं पान
हरी माझ्याच्या अंगी गोडी
चालतानी डोळे मोडी
करी गोकुळात खोडी
हरी माझा किती धट
धरी मथुरेची वाट
कुनी कुनी आक्रूर आला

माझ्या हरीस घेऊन गेला
आक्रूरानं उद्धव पाठविला
येश्वदीचा समाचार कळला
मन न्हाई त्या संसारी
सर्व चित्त हरीवरी
खेळ बगुनी झुरतो जीव
कुठे ग हरीला पाहावं

: ३ :

सुकुमार शरीर आम्ही गौळणी हवा सोसेना यमुनेची
तोडन झाली माशाशी दासी व तुमच्या चरणाशी
वचन ऐका यदुराया पडती तुमच्या मी पायां
तुझी तुटना माझी माया, हुडहुडी भरली थंडीची
कृष्णदेव वस्त्रे द्यावी आमुची, मस्करी नाही गडे कामाची
दुसरी म्हणे ऐक बाळ सुकुमार शिरीं, आम्ही वेल्हाळा
सोसेना पाण्याचा हिवाळा, हुडहुडी भरली थंडीची
कृष्णदेव वस्त्रे दे आमुची, मस्करी नाही गडे कामाची
तिसरी चवथी म्हणे एक गोष्ट, सर्वगुण तुम्ही श्रेष्ठ
शरण जाऊ कुणा आता, तुजवीण कोण दाता, हुडहुडी भरली थंडीची
पाचवी म्हणे ऐक हरी निघा तुम्ही पाण्याबाहेरी
जळात वस्त्रें नेसविलीं नेसून पिवळा पीतांबर
झाले गरुडावर स्वार, दर्शन घेता गोपीचे हर्ष झाला त्रिवार

: ४ :

**छप्पन गवळणी**

छपन्न कुमारी वेल्हाळा, बाळा अठरा चोवीस छत्तीस
अवघ्या मिळून या बाळा
सोडूनि आपला घरधंदा गीत गाती गोविंदा
हरिनामाचा परिबंध नित्य नवा करिती छंद
राधा चंद्रावळी आणि दोघी मुख्य राणी अवघ्या गवळणी

ब्राह्मणाची वाराणसी – कुणब्याची गया नर्मदा
कासाराची सखी येशी – सोनाराची संती काशी
ठाकराची तापी जयंती – रामोशाची कुशी तुळशी
माळ्याची सगनी मोहनी – कानड्याची पारवी संगी
धनगराची कोंडी लिंगी – सुताराची सई द्वारकी
वाण्याची रंगी बारकी – अवघ्या मिळून गवळणी
निराळ्याची राजाई – ठाकराची बनाई
पिंजाऱ्याची ताऱ्हाई – झारेकऱ्याची छंदी ठकडी
सुतकऱ्याची बुटना – खुराबघाची दरभुवना
परदेशाची जीवना – मोमीणाची लीजीना
गुजराची जुटना – मैना फकीराची ती न्यसना
वंजाऱ्याची जरीना – अत्तराची सायबू
भडभुंज्याची पटनबू – अवघ्या आल्या मिळूनी
गुरवाची राजलक्षुमी – तांबोळ्याची जानकी बाळी
परटाची आनी काळी – कोष्टयाची लेकुरवाळी
जिनगराची राधीरखमा – कोळ्याची उमी जुमी
लोहाराची बची नमी – कुंभाराची लिंबी नामी
मारवाड्याची ती यमनी – मराठ्याची चंद्री भीमी
कुरवाडणी शेतकरणी – वऱ्हाडणी अन् लऱ्हारणी
आणखी आल्या गवळणी – अवघ्या मिळुनी साजणी
तो वनमाळी खेळे हारी शिमग्याचा आनंद गुलालाचा प्रबंध
धन्य धन्य ते गोकुळ तिथं अवतरले घननीळ
संतचरित्र महापवित्र म्हणुनी सगळ्या लागल्या हरिचरणीं
छप्पन अवघ्या गवळणी

: ५ :

पहिलीच गवळण ग पहिलीच गवळण
पहिली गवळण ग लोटित होती वाडा
कृष्ण गेलाय मारुन खडा
आता मारील ग आता मारील

आता मारील ग सासूबाई
हरी पडलाय आमच्या डायी
मोठं कठीण ग मोठं कठीण
मोठं कठीण ग सब्रजन शाही
हरी पडलाय आमच्या डायी ॥ १ ॥

दुसरी गवळण ग दुसरी गवळण
दुसरी गवळण ग सैपाकात
तिचं धरीलं दोन्ही हात
आता मारील ग आता मारील
आता मारील ग सासूबाई
हरी पडलाय आमच्या डायी ॥ २ ॥

तिसरी गवळण ग तिसरी गवळण
तिसरी गवळण ग घाशीत होती भांडी
कृष्ण मारून गेलाय दांडी
आता मारील ग आता मारील
आता मारील ग सासूबाई
हरी पडलाय आमच्या डायी ॥ ३ ॥

चौथी गवळण ग चौथी गवळण
चौथी गवळण ग काढीत होती धार
दूध पिऊन गेला सारं
आता मारील ग आता मारील
आता मारील ग सासूबाई
हरी पडलाय आमच्या डायी ॥ ४ ॥

पाचवी गवळण ग पाचवी गवळण
पाचवी गवळण ग करीत होती ताक
लोणी खाऊन गेला पाक
आता मारील ग आता मारील
आता मारील ग सासूबाई
हरी पडलाय आमच्या डायी ॥ ५ ॥

सहावी गवळण ग सहावी गवळण
सहावी गवळण ग घालीत होती चूल
तिला खेळाया दिलं फूल
आता मारील ग आता मारील
आता मारील ग सासूबाई
हरी पडलाय आमच्या डायी ॥ ६ ॥

: ६ :

पहिली गौळण बोले हरीला
सोन्याचं घंगाळ न्हाती न्हानीला
काय रे कृष्णा लंपट झाले
मुरलीच्या नादानं धावून आले ॥ १ ।

दुसरी गौळण उभी अंगणी
हातात घेऊन आरसा फणी
पाची पदराची गुंफिती वेणी
काय रे कृष्णा लंपट झाले
मुरलीच्या नादानी धावूनी आले ॥ २ ॥

तिसरी गौळण गोष्टीवेल्हाळ
तिच्याकडेला ग तान्हे ते बाळ
तुझ्या मुरलीची ऐकून चाल
टाकुनी दिलंया तान्हं ते बाळ ॥ ३ ॥

चौथी गौळण मोठी चक्रसाळ
पिकल्या पानांचे बांधिती विडे
जाई पदरी साठा भरून
भाऊप्रीतीने देतीय विडे ॥ ४ ॥

पाचवी गौळण राधा सुंदर
गळयात फुल गजरा हात खांद्यावर
चल रे कृष्णा मजबरोबर
काय रे कृष्णा लंपट झाले ॥ ५ ॥

: ७ :

आम्ही गवळणी वरवंटा । जात होतो मथुरा हाटा
धावुनी धरिती चारी वाटा । परनारी पाहुनी करितो चेष्टा
हरीला सांगावे काही । यशोदाबाई ॥ १ ॥
दुसरी गवळण आली बाळी । सांगत जाई नंदाजवळी
माझी दुखाविली अंगुळी । ओढून फाडिली काचोळी
हरीला सांगावे काही । यशोदाबाई ॥ २ ॥
तिसरी गवळण आली सई । काय बोल बोलिता नये
तुझ्या हरीने सांडली सुई । दारात जाऊन लवंडले दही
हरीला सांगावे काही । यशोदाबाई ॥ ३ ॥
बोले चौथी गवळण । हरी कैसा म्हणावा लहान
पदर पसरूनी जगजीवना । घालितो ध्याई
हरीला सांगावे काही । यशोदाबाई ॥ ४ ॥
यशोदा बोले जननी । कैशी कृष्णा तुझी करणी
ब्रह्मा सावध झाला झणी । दास म्हणे वृन्दावनीं
वनामधीं चारितो गाई । यशोदामाई ॥ ५ ॥

: ८ :

सोड मला तू करू दे रे धंदा । सोड मला तू करू दे रे धंदा
का मशी छळशील बाल मुकुंदा ॥ धृ. ॥
कडेवरी बैस मी बाजारी नेते ।
जांभळ सिताफळ खायाला देते ।
सोड मला तू करू दे रे धंदा ॥
का मशी छळशील बाळ मुकुंदा ॥
जेवाया बैस मी दुधभात देते
साखर लोणी मिसळुनी देते
सोड मला तू करू दे रे धंदा
का मशी छळशील बालमुकुंदा ॥
पाळण्यात बैस मी पालवा देते
भुईवरी चक्र विटीदांडू देते

सोड मला तू करू दे रे धंदा
का मशी छळशील बालमुकुंदा ॥

: ९ :

सोड रविचा हात हरी रे करूं दे मंथन
लोणीसाखरेचे वाटी, उठी उठी जगजेठी
घेनु गेल्या यमुनातटी
सोड रविचा हात हरी रे करूं दे मंथन
माय म्हणे शेषशाई, नऊ लक्ष तुझ्या गाई
किती खाशी दुग्ध दही, पुरविशी कामना
सोड रविचा हात हरी रे करूं दे मंथन
माय म्हणे राजीव नयना, नको जाऊ परसदना
चोरी केली म्हणती तुज र (व्र)ज ललना
सोड रविचा हात हरी रे करूं दे मंथन
जोडूनिया दोन्ही कर, विनवितसे वारंवार
भक्ती व्हावी निरंतर, पुरविशी कामना
सोड रे रविचा हात, करूं दे मंथन

: १० :

चंद्रावळीसाठी किष्ण मातुरी झाला चाटी
परोपरीची दिंडं लुटी ॥ १ ॥

मतुरेच्या बाजारातु किष्ण देवाचं शेटेपण
पिवळया झेंड्याखाली, चंद्रावळीचं दुकासान ॥ २ ॥

मतुरेच्या बाजारातु लोणी इकत साजु इकु
सातो गवळणी तूं चंद्रावळी नाजु इकु ॥ ३ ॥

चंद्रावळीसाठी किष्ण झाला डोंबारी
येलुखुनि खेळ दिलाया मदुरी ॥ ४ ॥

हिरवा पेरवाचा पिवळा तेचा वाणु
चंद्रावळीसाठी किष्ण झालाया बागवानु ॥ ५ ॥

करनाटक्या गोविंदु रासबिदीला उबा रहातु
चंद्रावळीचा भेद घेतु ॥ ६ ॥
करनाटक्या गोविंदु रास बिदीला उबा राही
चंद्रावळीचा भेदु पाही ॥ ७ ॥
करनाटक्या गोविंदु राईच्या पड पाया
चंद्रावळीच्या महाला जाया सर्वा शिनगार मागीला ॥ ८ ॥

# काही कठीण शब्दांचा कोश

**ज्ञानदेव**

वल्लभ = आवड, प्रेम
पारू = शेवट, पलीकडील बाजू
साते = संती (का.) = बाजार
संवसाटी = साम्याकरिता
(ज्ञा. १८-१४९९)
बुंथी = आच्छादन, खोल
अरूवार = सुंदर
नीर = पाणी
उबारा = उष्णता
पिंजणवारा = पंख्याचा वारा
वलिया = बलवान, बलाढ्य
विळाचिये वेळी = एका वेळी
विंदान = कौशल्य
रया = कांती, तेज
मढविणे = आच्छादणे, लपेटणे
पाऊ = पाय
कैं = केव्हा, कधी
पढिये = आवडतो
निकी = चांगली
अवचिता = अकस्मात
झुळकणे = प्रकाशणे, झुळूक येणे
अळुमाळु = थोडा, किंचित
ठक ठेणे = स्तिमित होणे
चावळू = बोलणे, सांगणे
गोटी = प्रकार, प्रसंग
साटी = मोबदल्यात

**नामदेव**

अंदु = साखळी
मात्रा = माया, गारुड

शिळ = निवालेला
घाटा = कण्यासारखा पदार्थ
मल्हार = संगीतातील एक राग
महुडे = ढग, मेघ
खळे = अंगण
बिलवर = उंची काचेची बांगडी
दोड = द्वाड, खोडकर, खट्याळ
देहुडा = वाकडा
आबला = अबला (?)
बोलती = जीभ, वाणी
अरुता = इकडे

**एकनाथ**

नितंबिनी = सुंदरी
चाट = लबाड
पहुडली = निजली
गरसोळी = गळसरी
भिंगुले = आरसा
आंगुले = अंगडे
बुझावणी = समजावणी
बिंदली = लहान मुलाच्या मनगटात घालावयाचा पाटलीसारखा एक सोन्याचा दागिना
ढाल = मोत्यांचे तेज
ठकडा = लुच्चा, फसवा
रबडा = चिखल
बछडा = मूल

**तुकाराम**

मात = गोष्ट, हकीगत
वोसावणे = ओसरणे, कमी होणे

चोजवणे = कौतुकास्पद वाटणे
बोभाट = गवगवा, हाकाटी
शुद्धी = शोध, वार्ता
अवसरू = वेळ
पानसरा = जकात वसूल करणारा
नाट लागणे = अडथळा, अपशकुन
संचित = कर्माचा साठा
वोडवणे = ओढवणे, प्राप्त होणे
पिशुन = दुष्ट
वाखा = नाश
निस = सोबती
रळी = थट्टा, मस्करी
चटा = चटक

## निळोबा

आरजा = युवती

## राम जोशी

अंबर = आकाश, वस्त्र
पयोधर = मेघ, स्तन
मारुत = वारा
अधर = ओठ
पट = वस्त्र
कुच = स्तन
वंचक = फसव्या, लबाड
दस्यु = चोर
मन्मथ = मदन
व्यजन = पंखा, विंजणवारा
हाकम = वैद्य
मात = वार्ता, कथा
सिका = शिक्का
तमाम = सर्व
उत्संग = मध्यभाग, आलिंगन
कुंज = लतामंडप

फुंज = ताठा, गर्व
सरोज = कमल
मरुत्कृती = वारा
रामा = स्त्रिया
लाग = संधी
पामा = खुस्त्रा
हुली = हुलकावणी
वामा = सुंदर स्त्री

## होनाजी बाळा

चिरा = मंदिल
राजीव = कमल
क्षीराब्धिवासा = विष्णु
शकटांतक = शकट राक्षसाचा नाश करणारा कृष्ण
पुतनारी = पूतनेचा वध करणारा कृष्ण
उद्भिज = वृक्ष, वनस्पती
क्षेत्रज = जमिनीतून निर्माण झालेले
पिशा = वेड्या
चाहिला = इच्छिला
कंसारी = कंसाचा शत्रू कृष्ण
बारी = खेप
बदमस्ती = धुंदी, उन्मत्तपणा
लगोरी = खेळण्यासाठी रचलेली रास, उतरंड
साखरपाड्या = मुलांचा एक खेळ
हुंबर = गुराख्यांचा सुरकाठीचा खेळ
आपाद = पायापर्यंत
स्कंधी = खांद्यावर
खर्जुरी = खजुरी
बदरी = बोरे
मदनतात = कृष्ण
शेषभ्राता = बलरामाचा भाऊ

**परशराम**

मुरवत ( मुर्वत ) = भीड, संकोच, पर्वा

मेचे = भित्रा, लाजरा

जुरत = धाडस, बिशाद

बदर = भीती बाळग

जमान = जामीन

कुरा = तोरा, ताटा, दिमाख

## काही प्रमुख संदर्भ ग्रंथ


१ ) सकल संतगाथा : खंड १ व २ ( सं. ) का. अ. जोशी

२ ) मराठी साहित्यातील मधुराभक्ती : डॉ. प्र. न. जोशी

३ ) हिन्दी साहित्य में राधा : डॉ. द्वारिकाप्रसाद मीत्तल

४ ) हिन्दी साहित्य में कृष्ण : डॉ. सरोजिनी कुलश्रेष्ठ

५ ) ललित लेणी : डॉ. राममनोहर लोहिया

६ ) गाथासप्तशती : ( सं. ) स. आ. जोगळेकर

७ ) भागवतोत्तम एकनाथ : डॉ. शं. दा. पेंडसे

८ ) एक होता राजा : ( सं. ) डॉ. सरोजिनी बाबर

## डॉ. वसंत स. जोशी यांचे साहित्य

१ ) महानुभाव संत
२ ) संशोधन साधना
३ ) मराठी गौळण
४ ) मुक्तेश्वरकृत भावार्थ रामायण : उत्तरकांड
५ ) ज्ञानदेव चिंतन
६ ) मऱ्हाटी संस्कृती : काही समस्या
७ ) भाषा व साहित्य : संशोधन खंड १
८ ) भाषा व साहित्य : संशोधन खंड २
९ ) भाषा व साहित्य : संशोधन खंड ३

**आगामी :**

१ ) शशिसेना ( सतराव्या शतकातील जगन्नाथ कवीचे स्वतंत्र प्रणयकथाकाव्य )
२ ) संशोधन लेखसंग्रह

REFBK-C025862

REFBK-0025862

२५६१ ग्रं. क्र. २५८६२